जुलै १९८८ किंमत २ रु.

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



जुलै १९८८,
गुरुपौर्णिमा विशेषांक

# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

-: कार्यकारी संपादक :-

**श्री. सदानंद चेंदवणकर**

वर्ष ६७ वे | किंमत २ रुपये | अंक ४ था

दूरध्वनी ४१२२५६१

- कार्यालय -

साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.
वार्षिक वर्गणी रु. १०/– (ट.ख. सह) किरकोळ अंक २ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



# रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

५४

ईशनाम सुलभ गोड ध्याइं मना वेंगी।
व्यर्थ खटाटोप उगा घेउं नको लागीं।। धृ.।।
प्रपंच करूनि परमार्था जन्म बरा हाची।।
साह्य होइ बापमाय आस करि कृपेची।। ईश..।।
अमृत - घडी चुकवुं नको संग्रही कराया।।
मोह दंभ करूं पाहे घात तुझा वांया।। ईश..।।
दासि म्हणे मजवरि तूं नको रुष्ट होऊं।
स्वानंदें सुरसभरित गोड नाम गाऊं।। ईश..।।

५५

जिवेंभावें तुझी करिती जे सेवा। त्यांसी महादेवा पावतोसी।।
वर वर भक्ति न साहे तुजला। तेवीं तूं भक्ताला फळ देसी।।
पूर्व भाग्याविण भाव उमटेना। जरी केले नाना उपचार।।
दास म्हणे जिचे धरिले मी पाय। तीच गुरूमाय देवोबुध्दि।।

५६

कळेना मजला तुझी देवा सत्ता। भ्रम होतो चित्ता हरघडी।।
म्हणावें जवळी किंवा तूं अंतरी। वास चराचरीं भासे मना।।
मृत्तिकेपासून देहाची उत्पत्ती। होणार निवृत्ति तियेमध्यें।।
प्रारब्धा आधीन जिवा येणें जाणें। श्रेष्टांचें बोलणें पडे ऐसें।।
शिव आणि जीव एक किंवा दोन। मजला कळून येत नाहीं।।
कसा जन्मा आलों भला मी टोणगा। जन्म हा वाउगा तोंही नसे।।
देवाची उत्पत्ती देव कर्ता हर्ता। देती आम्हां वार्ता संतजन।।
करीं तळमळ दूर या जिवाची। दास हा कृपेची वाट पाहे।।

**या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखांतील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.**


# श्री साईलीला – जुलै १९८८

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | – | ४ |
| २ | श्री साईबाबांचे अवतारकार्य | – श्री. मनोज बेंद्रे | ६ |
| ३ | हे सारं सद्‌गुरूसाठी | – श्री. बाळकृष्ण देसाई | १० |
| ४ | श्री साईबाबांची कृपा दृष्टी | – श्रीमती राधाबाई दुसंगे | १४ |
| ५ | अद्वैत | – श्री. दत्ता माने | १५ |
| ६ | श्री साईंची प्रतिकात्मक दीपावली पणती | – सौ. संगीता गोडबोले | १६ |
| ७ | अधिक मासाचे महत्व आणि व्रते | – श्री. रमेश पुंडलिक | १९ |
| ८ | श्री साईबाबा - एक विभूती | – प्रा. आय. पी. उमराणी | २१ |
| ९ | श्री खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | – साईनंद | २५ |
| १० | श्री साईबाबांची गुरूभक्ती | – श्री. चकोर आजगांवकर | २८ |
| ११ | श्री सद्‌गुरू महिमा | – श्री. आंतोन फर्नांडिस | ३० |
| १२ | श्री साईबाबांची पहिली काकड आरती | – श्री. सदानंद चेंदवणकर | ३४ |
| १३ | साईमाऊली | – सौ. प्रमिला धडाडे | ४० |
| १४ | श्री साई भाव भक्तीचा भुकेला | – श्री. बी. व्ही. सावंत | ४१ |
| १५ | श्री साई परिवारातील माणिक आणि मोती | – साईनंद | ४३ |
| १६ | जगत्‌कल्याण | – कु. शुभांगी कुलकर्णी | ४४ |
| १७ | साई पायी शरण | – कु. नीता लिंगरकर | ४६ |
| १८ | मी पाहिलेले साईबाबा | – श्री. लक्ष्मणराव नाईक | ४७ |
| १९ | विचारणा | – श्रीमती श्री शहाणे | ४८ |
| २० | इति श्री साई उवाच | – श्री. डी. जी. देशपांडे | ४९ |
| २१ | शिरडीची वारी | – श्री. जयवंत कुलकर्णी | ५२ |
| २२ | जगजेठी सखा | – श्रीमती अन्नपूर्णा कुळकर्णी | ५३ |
| २३ | श्री साईबाबांच्या व्यक्तिमत्त्वाचा व चिंतनाचा उमटलेला ठसा | – श्री. आप्पासाहेब पाटील | ५४ |
| २४ | नाथ अमुचे साईबाबा | – कुमार संभाजीराव भोगण | ५५ |
| २५ | जगाच्या कल्याणा संतांची विभूती | – श्री. विनोद पतिंगे | ५६ |
| २६ | साई स्मृति | – श्री. श्याम नर्से | ५६ |
| २७ | ग्रंथ परिक्षण | – साईनंद | ५७ |
| २८ | सद्‌भाव | – सौ. वासंती नांदेडकर | ५८ |
| २९ | श्री साईबाबांविषयक सामान्य ज्ञान | – सदानंद चेंदवणकर | ५९ |
| ३० | भगवान श्री साईबाबा | – कु. संतोष राणे | ६० |
| ३१ | साक्षात्कार म्हणा अग चमत्कार म्हणा | – श्री. पां. शं. भुजबळ | ६१ |
| ३२ | साई परब्रह्माचा शब्दब्रह्मात अवतार | | ६३ |
| ३३ | शिरडी वृत्त | | ६४ |

## संपादकीय

# गुरूपौर्णिमा? व्यासपौर्णिमा? नव्हे विचारपौर्णिमाच!



यंदा गुरूपौर्णिमा जुलै महिन्याच्या अखेरीस चौथ्या आठवड्यात येत आहे. आपल्या धार्मिक जीवनात प्रत्येक पौर्णिमेला नावे आहेत. आषाढ महिन्यातील पौर्णिमेला गुरूपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा असे नाव आहे. जिथे जिथे ज्ञानदानाचे परम पवित्र कार्य चालू असते त्या त्या ठिकाणी गुरु पूजनाचा सोहळा या दिवशी होतो. व

गुरु ब्रम्हा गुरुर्विष्णुर्गुरूदैवो महेश्वरः।
गुरूः साक्षात्परब्रम्ह तस्मै श्रीगुरूवेनमः।।

म्हणून त्यांचे शिष्य आपल्या गुरूचा आदरपूर्वक सत्कार करतात.

**अज्ञान तिमिरान्धस्य**
**ज्ञानाञ्जन शलाकया।**
**चक्षुरुन्मीलितं येन तस्मै**
**श्रीगुरूवे नमः।।**

या श्रध्देने वर्षातून एकदा गुरूंविषयीचा आदर या दिवशी उत्स्फूर्तपणे व्यक्त होतो. आषाढ महिन्यातील कुंद हवेत हा दिवस चैतन्य लेवून येतो, अंतर्मुख करतो. जीवनाचे अनुशासन करणाऱ्या जेवढ्या व्यक्ती, जी तत्वे त्यांच्या ठायी मन विनम्र होते, भावांजली, आदरांजली अर्पण करते.

आमच्या भारतीय संस्कृतीने विश्व संस्कृतीला अनेक विचार प्रणालींची सनातन सत्यांची लेणी लेवविली आहेत. भारताचे गुरू महर्षि व्यास हे विश्वगुरू म्हणून अखिल मानव जातीला वंदनीय आहेत. श्रीकृष्ण उक्तीला त्यांनी गीतेचा आधार दिला म्हणून हा "विश्वासि आला उपकारू" असा श्रीसंत ज्ञानेश्वरांनी व्यासांचा गौरव केला आहे.

**ना तरी सकळ धर्मांचे माहेर**
**सज्जनांचे जिव्हार**
**लावण्यरत्न भांडार**
**शारदेचे।।**

या शब्दांत श्री ज्ञानेश्वर माऊलीने भगवान व्यासप्रणित भारत ग्रंथांचा महिमा वर्णन केला आहे. महामुनी व्यासांच्या प्रतिभेचा स्पर्श झाला नाही असा एकही विषय विश्वात नाहीच. या अर्थाचे "व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्"। हे वचन तर सुप्रसिध्दच आहे. विशालता हा व्यासांच्या सर्वच जीवनकार्याचा विशेष आहे. या वाङ्मयाच्या मूलस्त्रोताशी मानवतेचा विचार आहे. व्यासांनी मानवाचा अतिंद्रियांशी, अलौकिकाशी,

असंभवाशी, अनिर्वाच्याशी संबंध तोडला आहे यातच श्री व्यासांच्या विश्वगुरूत्वाचे मर्म आहे. परिमित मानवाला अपरिमित ज्ञानाचा लाभ व्यासांनी करून दिला. हे कार्य त्यांनी मातृ वात्सल्याने मेघांच्या दातृत्वाने कळवळ्याने केले. क्षीणमेधा म्हणजेच बुध्दी असलेल्या लोकांसाठी व्यासांनी वेदांची संगती लावली, व्यवस्थापना केली, अठरा पुराणे लिहिली. भागवत पुराणातून श्रीकृष्णभक्तीचे महात्म्य पटविले. ब्रम्हसूत्रे लिहिली व्यासांनीच. व्यासांनी प्रतिपादलेला वैदिक धर्म हा विश्वधर्म आहे. सर्व मानव कुल एक आहे, मानव हे सर्वश्रेष्ठ मूल्य आहे. असा जयघोष महर्षी व्यासांनीच केला. मनुष्याहून या जगात दुसरे काहीही श्रेष्ठ नाही. पुरूषार्थाने मनुष्याने आपले जीवन समृध्द करावे, स्वाभिमान जागृत करून अर्थलाभ करावा. कोणत्याही कारणांसाठी माणसाने श्रेयपूर्ण धर्माचा त्याग करू नये असा समस्त मानवमात्राला व्यासांनी उपदेश केला आहे. व्यासांच्या प्रत्येक कृतीत मानवतेचे भान आहे. त्यांचे कार्य हे ईशकार्य आहे. त्यांच्या रूपात साक्षात विष्णू अंश रूपाने अवतार घेऊन कार्य करतो अशी कल्पना आहे. व्यास कार्याचा परिचय होणे, व्यास या शब्दाचा अर्थ कळणे आणि व्यास तत्वांचा आचरणाला कुठेतरी स्पर्श होणे हीच या गुरूपौर्णिमेची सार्थता आहे.

आजच्या परिस्थितीत आपण अराजकाच्या उंबरठ्यावर उभे आहोत. व्यक्तिगत जीवन भ्रष्ट आणि भकास करणारे झाले आहे. सामाजिक जीवन उध्वस्त करणारा नीतिमूल्यांचा ऱ्हास सज्जनांची अंत:करणे भयग्रस्त करीत आहे. अशा परिस्थितीत महर्षि व्यासांच्या वरील विचारांचे स्मरण करणे खरोखरच मार्गदर्शक ठरेल.

जीवनाचा अर्थ काय? जीवनाचे साफल्य कशात आहे? स्वाभिमानाने, आत्मीय तेजाने आपण आज जगत आहोत काय? उद्या जगू शकू काय? या प्रश्नांबद्दल स्वत:ला जागृत करण्याची आवश्यकता आज आहे. भीती, अविश्वास, संशय या कनिष्ठ भावना समाजात सर्वत्र फोफावू लागल्या आहेत. त्या नष्ट करून त्यांची जागा धैर्य, प्रेम व श्रध्दा यांनी घेतली पाहिजे. या त्रयींची नितांत आवश्यकता आज आहे.

तेव्हा प्रत्येकाने वर्षातून एकदा तरी अंतर्मुख व्हावे. आपल्याच जीवनाचे अवलोकन करावे. ध्येयाची व प्रत्यक्ष कृतीची संगती शोधावी या आत्मशोधनात काही नवीन जाणवावे यासाठीच महर्षिंची आठवण करण्याचा गुरूपौर्णिमेचा दिन आहे. समस्त मानव जातीला ज्ञानदीप दाखविणाऱ्या अशा महर्षी महामुनी व्यासांना त्यांच्या स्मृतीदिनी सर्व साईभक्तांचे कोटी कोटी प्रणाम, प्रणाम, प्रणाम

— जय साईराम.



# ॥ श्री साईबाबांचे अवतारकार्य ॥


— श्री. मनोज शंकर बेंद्रे

सहाय्यक कार्यकारी अभियंता,

सिडीओ क्वार्टर्स, ८–६/११, मेरी कॉलनी,

दिंडोरी मार्ग, नाशिक–४.


महाराष्ट्राची भूमी संतांच्या वास्तव्याने पावन झालेली भूमी आहे. महाराष्ट्राच्या कणाकणात संतांच्या मांदियाळीने भगवत्प्रेमाचा, भावभक्तीचा सुगंध पेरलेला आहे. संताची ही परंपरा सुरु होते, संत ज्ञानेश्वरांपासून. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत रामदास, संत तुकाराम, संत मुक्ताबाई, जनाबाई, गोरा कुंभार, सावता माळी... अशी किती किती नावे घ्यावीत! संतांची ही मांदियाळी हे महाराष्ट्राचे भूषण आहे, महाराष्ट्राचे चैतन्य आहे.

या सर्व संतपरिवारातला एक आगळा-वेगळा संत म्हणून श्रीसाईबाबांचे नाव घ्यावे लागेल. श्री साईबाबांना त्यांचे भक्त केवळ संत म्हणून मानत नाहीत, तर प्रत्यक्ष परमेश्वराचा– श्री दत्तात्रेयांचा अवतार म्हणून मानतात. अशी प्रतिष्ठा फक्त संत ज्ञानेश्वरांना मिळाली आहे. संत ज्ञानेश्वरांना महाविष्णूंचा अवतार समजले जाते.

शिर्डीच्या साईबाबांनी शिर्डीत राहून भक्तीमार्गाच्या प्रसाराचे जे कार्य केले, त्याला तोड नाही. परमेश्वराप्रत जाण्याच्या अनेक मार्गांपैकी भक्तीमार्ग हा एक मार्ग! संत ज्ञानेश्वरांनी या भक्तीमार्गाचे द्वार महाराष्ट्राला खुले केले. नामदेव, तुकाराम, रामदास यानी हा मार्ग समृद्ध केला. या भक्तीमार्गावर कळस चढविला श्रीसाईंनी!

१९ व्या शतकाची अखेर व २० व्या शतकाची सुरूवात या काळात साईबाबांचा अवतार झाला. या कालखंडाकडे लक्ष दिल्यास आपल्याला दिसून येईल की, इंग्रजी सत्तेच्या अंमलाने भारतियांची विशेषतः महाराष्ट्रीयनांची मने गुलाम बनली होती. साहेबाचा धर्म श्रेष्ठ आहे, आपला धर्म त्या मानाने कनिष्ठ आहे, असा काहीसा एक विचारप्रवाह त्या काळच्या सुशिक्षित विचारवंतांमध्ये वाहत होता. इंग्रजी शिक्षण घेऊन नास्तिक बनलेल्या समाजसुधारकांचा असा एक वर्ग महाराष्ट्रात निर्माण होऊ लागला होता, जो ईश्वराला मानायला तयार नव्हता. ईश्वरविषयक विचार हे एक थोतांड आहे, माणसाला धर्माची जरुरी नाही, हिंदू धर्म म्हणजे अंधश्रद्धांचे एक कडबोळे आहे, अशी काहीशी मते या वर्गाची होती. आणि तात्कालिक तरुण वर्ग या विचारांनी भारावून जाऊन त्याप्रमाणे वागतही होता. आपल्या धर्माचा त्याग केल्याची काही उदाहरणेही त्या पूर्वीच्या काळात घडली होती. रेव्ह. टिळकांचे उदाहरण या दृष्टीने बोलके आहे.

ईश्वरविषयक विचारांना टवाळी समजणारा असा सुशिक्षितांचा वर्ग फार धोकादायक असतो. या वर्गाच्या विचाराने समाजाचे भले तर होत नाहीच, पण ईश्वराचा विसर पडल्याने समाज अधःपतीत व्हायला सुरुवात होते. एका प्रकारे

समाजाच्या अध:पतनाचीच ती सुरुवात असते. समाजातली नीतीमत्ता खालावते. समाज अधिकाधिक भोगवादी बनायला लागतो. अशा जडवादी, भोगवादी विचारांचा पराभव करण्यासाठीच परमेश्वराच्या अवताराची गरज असते. आणि प्रत्येक कालखंडात परमेश्वराने हे अवतारकार्य केलेले आहे. भगवद्गीतेमध्ये भगवंताने जे अभिवचन दिले आहे,

"यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत

अभ्युत्थानम्धर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ हे या अर्थाने खरेच आहे.

या पार्श्वभूमीवर श्रीसाईबाबांचे अवतारकार्य अलौकिक असेच आहे. इंग्रजी शिक्षण घेऊन सुशिक्षित झालेल्या व्यक्तींना भक्तीमार्गाला लावण्याचे जे कार्य साईबाबांनी केले,ते फार महत्वाचे आहे. साईबाबांच्या भक्तपरिवरातील सर्व मंडळी ही सुशिक्षित आणि उच्च विद्या-विभूषित होती, हे विशेष.

१८९३ मध्ये शिकागोच्या धर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदांनी सनातन वैदीक धर्माची ध्वजा सबंध जगभर फडकावली आणि हिंदू धर्माच्या पुनरुत्थानाचा संकल्प केला. त्याच तोडीचे कार्य साईबाबांनी शिरडीत राहून केले आणि कुठेही न जाता केले हे विशेष.





इंग्रजी शिक्षणाच्या योगाने भक्तीमार्गाचा जो प्रवाह आटण्याची शक्यता होती, त्याला साईबाबांनी नवसंजीवनी दिली आणि भक्तीचा हा प्रवाह अधिक समृद्ध केला, चिरस्थायी केला.

आपले हे कार्य करताना साईबाबांनी कुठलाही नवा संप्रदाय निर्माण केला नाही की नवा ग्रंथही लिहिला नाही. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली, रामदासांनी दासबोध लिहिला, तुकारामांनी गाथा लिहिली, पण असा कुठलाही ग्रंथ साईबाबांनी लिहिला नाही. त्यांना जे तत्त्वज्ञान शिकवायचे होते, ईश्वराचे जे महत्त्व लोकांच्या मनावर बिंबवायचे होते,ते त्यांनी चमत्कारांच्या माध्यमातून बिंबवले.

२० व्या शतकाच्या सुरुवातीच्या ज्या कालखंडाचा निर्देश वर केला आहे,त्या काळात इंग्रजी शिक्षणाच्या योगाने सुशिक्षितांची मने जडवादी बनत होती. या सुशिक्षितांना रामदासांसारखा दासबोध लिहून किंवा ज्ञानेश्वरी लिहून भक्तीमार्गाला लावता आले नसते. अशा प्रकारे परमेश्वराचे महत्वही त्यांच्या मनावर बिंबले नसते. कारण त्यांची मने तार्किक झाली होती. परमेश्वर जर दिसत नसेल,तर त्याला मानायला आम्ही तयार नाही,असा बहुतेकांचा सूर होता. अशा वेळेस चमत्काराशिवाय नमस्कार नाही,ही मेख साईबाबांनी अचूक ओळखली आणि प्रसंगांच्या ओघाने चमत्कार दाखवून आपल्या भोवती माणसे गोळा करुन त्यांना भक्तीमार्गाला लावले. या संस्कृतीवर येऊ घातलेले जडवादाचे विनाशी आक्रमण मोठ्या कुशलतेने परतवून लावले. भक्तीचा प्रदीप तेवता ठेवला. या संस्कृतीचे रक्षण केले. हे करीत असताना मूर्तीपूजेतून मिळणाऱ्या अध्यात्मिक आनंदाची प्रचिती त्यांनी आपल्या भक्तांना आणून दिली. केवळ निर्गुणाची उपासना करणे सामन्यांना कठीण जाते म्हणून सगुणोपासनेचे महत्वही आपल्या संपर्कात येणाऱ्यांवर बिंबवले.

हे सर्व करत असताना साईबाबांनी आणखी एक कार्य कुशलतेने केले,ते म्हणजे सर्वधर्मसमन्वयाची कल्पना रुजविली. केवळ हिंदूंनाच त्यांनी आपल्याकडे आकर्षून घेतले असे नाही,तर हिंदूंबरोबर पारशी, खिश्चन, शीख, बुद्ध, मुस्लिम वगैरे इतर धर्मांच्या अनुयायांनाही त्या त्या धर्मातले सर्वश्रेष्ठ तत्व आपल्यात पाहण्यास शिकवले. अशाच प्रकारचे कार्य श्री रामकृष्ण परमहंसांनी बंगालमध्ये केलेले आपल्याला आढळते.

श्री साईबाबांच्या शिकवणुकीचे थोडक्यात सार असे--

१) प्रत्येकाने आपला स्वधर्म पाळावा. स्वधर्माचे योग्य आचरण करावे. स्वधर्माचे आचरण करताना परधर्माचा आणि परधर्मियांचा आदर करावा.

२) स्वधर्माचे आचरण करताना परमेश्वरावर 'श्रद्धा' ठेऊन निष्काम-भावाने कर्म करावे.

३) संकटे आली तरी भिऊ नये. परमेश्वरावर विश्वास ठेऊन त्यांचा मुकाबला करावा.

४) उतावीळपणा दाखवू नये. सबूरी ठेवावी.

५) सर्वांभूती परमेश्वर पाहायला शिकावे.

६) आहे त्यात समाधानी असावे.

७) सबका मालिक एक आहे.

८) परमेश्वराच्या भक्तीत नियमितपणा असावा.

आपले हे संसारी जनांना समजण्यास आणि आचरण्यास सोपे असे तत्त्वज्ञान शिकवितांना त्यांनी आपल्या भक्तांना जी वचने दिली,ती वाचली की साईबाबांच्या अलौकिकत्वापुढे नास्तीकही नम्र होईल,इतके सामर्थ्य त्या वचनांत आहे. ती वचने साईभक्तांच्या नियमितपणे पठणात असतात.

शिरडीस ज्याचे लागतील पाय
टळती अपाय सर्व त्याचे ॥१॥
माझ्या समाधीची पायरी जो चढेल
दु:ख हे हरेल सर्व त्याचे ॥२॥
जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी ॥३॥
नवसास माझी पावेल समाधी
धरा दृढ बुद्धी माझ्या ठायी ॥४॥
नीत्य मी जिवंत जाणा हेची सत्य
नित्य घ्या प्रचित अनुभव ॥५॥
शरण मज आला आणि वाया गेला
दाखवा दाखवा ऐसे कोणी ॥६॥
जो जो मज भजे जैशा जैशा भावे
तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥७॥
तुमच मी भार वाहीन सर्वथा
नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥८॥
जाणा येथे आहे साहाय्य सर्वांस
मागे जे ते त्यास ते ते लाभे ॥९॥
माझा जो जाहला काया वाचा मनी
तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥१०॥
साई म्हणे तोचि, तोचि झाला धन्य
झाला जो अनन्य माझ्या पायी ॥११॥

श्री साईबाबांच्या भक्तीगंगेने निव्वळ महाराष्ट्रच नव्हे,तर अवघा भारत पावन केला आहे. या भक्तीगंगेत सर्व विश्व पावन करण्याचे सामर्थ्य आहे.

पुढेमागे जर ज्ञानेश्वरांनी पसायदानात सांगितलेला विश्वधर्म उदयाला आलाच तर त्या विश्वधर्माच्या अग्रपूजेचा मान श्री साईबाबांना मिळाल्याशिवाय सहणार नाही. येऊ घातलेल्या या विश्वधर्माचे सूतोवाच श्रीसाईनीं महाराष्ट्रातल्याशिर्डी या छोट्याशा गावी २०व्या शतकाच्या सुरुवातीसच करुन ठेवले आहे. शिर्डी हे त्या अर्थाने सर्व जगाचे तिर्थक्षेत्र बनले आहे.

साईबाबांनी प्रतिपादलेला 'श्रद्धा व सबूरी' हा महामंत्र २१व्या शतकातल्या मानवाला आपल्या जीवनातल्या समस्यांना तोंड देण्यासाठी संजीवन मंत्र ठरण्याची शक्यता आहे. २१व्या शतकातल्या मानवीजीवनाचे सोने करणारा हा मंत्र आहे, हे निश्चित!....

आपल्या रोजच्या जीवनात श्री साईबाबांची शिकवण आचरणात आणून, परमेश्वराचे नामस्मरण करीत आपण सर्व पावन होऊ या!...

॥ॐ श्री समर्थ सद्‌गुरु साईनाथाय नमः ॥

# हे सारं सद्‌गुरुसाठी

– श्री. बाळकृष्ण अ. देसाई
सी/३, हरमेस पार्क,
३० बंड गार्डन रोड, पुणे–४११ ००१.

कॉलेज सुटलं. एक विद्यार्थी इतरांप्रमाणं आपल्या घराकडं न वळता हिमालयाच्या दिशेनं पायी जाऊ लागला. खूप खूप चालला. शेवटी सायंकाळ झाली. सूर्य मावळला. रातकिडे 'किर्र sss' आवाज काढू लागले. पण हा 'एम्.ए.'च्या वर्गातील विशीच्या वयातला विद्यार्थी त्या काळोखाला किंवा रातकिड्यांच्या किरकिरण्याला न भिता हळूहळू पुढंच जाऊ लागला. त्याच्या मनात उद्‌भवलेल्या प्रश्नांचा त्याला शोध घ्यायचा होता.

सायंकाळ होऊन गेली. काळोख वाढू लागला. मुलगा घरी परतला नाही, त्या काळजीनं त्याच्या माऊलीचं हृदय कासावीस झालं. तिनं आपल्या तीन मुलांना हाका मारुन जवळ बोलाविलं, नि सांगितलं, "अरे, अद्याप नरेंन्द्र घरी आला नाही, जा पळा, नि त्याच्या सोबत्यांना विचारुन या!"

नरेन्द्राचे वडील तीन भाऊ आजूबाजूला गेले. त्यांना त्याचे मित्र भेटले. पण कुणालाही तो कुठं गेला, हे सांगता आलं नाही. जो तो म्हणे, "कॉलेज सुटताच घाईघाईनं बाहेर पडून कुठं गेला, हे आम्हाला कळलं देखील नाही!"

मुलं घरी आली. आईला सारी हकीगतं कळताच, ती माऊली रडू लागली. सर्वात लहान, फार हुशार, बोलका नि देखणा होता तो! बंगालमधील कलकत्त्याचं ते एक रत्न होतं. सर्वांनाच काळजी वाटू लागली. दुसऱ्या दिवशी कॉलेजात ही वार्ता पसरली. तिथंही तीच परिस्थिती! प्रत्येकजण आपापल्यापरी हळूहळू लागला.

इकडं नरेन्द्राला त्या हिमालयाच्या अरण्यात कितीतरी बैरागी भेटले. प्रत्येकाला तो विचारी, "तुम्हाला देव भेटला का?" पण प्रत्येकाकडून त्याला 'नाही!' ह्या शब्दापलिकडं दुसरं काहीच उत्तर मिळालं नाही.

जवळ जवळ दीड–दोन महिने हिमालयाचा परिसर पायाखाली घालून, निराशेनं नरेन्द अलाहाबादला गंगा किनारी आला. तिथं कित्येक भाविक लोक गंगेत स्नान करताना त्याला दिसले. त्यांना त्यानं विचारलं, "काय हो! तुम्हाला देव कधी दिसला का?" प्रत्येकाचे नकारार्थी उत्तर ऐकून त्याला फार वाईट वाटलं. शेवटी एकानं म्हटलं, "अरे मुला, कलकत्त्याला 'काली मातेचं'मन्दीर आहे ना! तिथल्या पुजाऱ्याशी, 'रामतीर्थ परमहंस' यांच्याशी देवी बोलते, असं आम्ही ऐकलं आहे. तेव्हा तू तिथं जा, नि त्यानाच विचार!"

कलकत्त्याला घरी आईनं नरेन्द्राची महिनो महिने वाट पाहून आपलं रत्न काळानं गडप केलं, असं मानून खूप रडली नि शेवटी दु:खी हृदयानं आयुष्य कंठू लागली.

नरेन्द्राच्या कानावर पुजारी रामतीर्थ परमहंसाचं नाव पडताच तो कलकत्त्याच्या दिशेकडं वळला, नि अखेर काली–मातेच्या मन्दिरी आला. रामतीर्थांची पूजा चालू

होती. ती आटोपल्यावर नरेन्द्रानं पुढं होऊन नम्रतेनं विचारलं, "स्वामी, आपणाशी कालीमाता बोलत असते, असं ऐकलंय मी! खरं का हे!"

"होय! आमचं संभाषण नेहमीच होत असतं!"

"मला तुम्ही ते दाखवू शकाल का?" नरेन्द्रानं अधीरतेनं विचारलं.

"हो! पुढं ये!" अन् तो पुढं येताच, त्याच्या मस्तकावर परमहंसांनी हात ठेवताच, विजेचा 'शॉक्' बसावा, तसं त्याचं सर्वांग सळसळून गेलं. ताबडतोब नरेन्द्रानं त्यांच्या पायावर मस्तक ठेवून, "ह्या वेळेपासून मी तुमचा शिष्य, अन् तुम्ही माझे गुरु," असं म्हणून, त्यांच्या पायाशी अखंड बसून त्यांच्या सेवेला प्रारंभ केला.

यानंतर नरेन्द्र आपल्या आईला भेटून आला. आपलं हरवलेलं रत्न पाहून माऊलीचा आनंद गगनात मावेनासा झाला.

नरेन्द्र, रामकृष्ण परमहंसांचा पट्टशिष्य झाला. इतर त्यांचे सात-आठ शिष्य होते पण नरेन्द्राच्या तोडीचा त्यात एकही नव्हता. परमहंसाकडून नरेन्द्र खूप शिकला शेवटी गुरु म्हातारे झाले. त्यांच्या हालचाली मंदावत गेल्या. त्यातच त्यांना घशाचा 'कॅन्सर' झाला. रात्री शिष्यांना भोवती घेऊन, क्षीण आवाजात त्यांचं बोधामृत चालत असे. मध्येच त्यांना उबळ येऊन ओकारी येई. जवळ भांडं ठेवलेलंच असे! ते शिष्यांपैकी कुणीही उचलून दूर एक खड्डा खणला होता, त्यात जाऊन ते ओती, नि वर माती लोटी.

असं वारंवार होत असे. एकदा ते ओकारीनं भरलेलं भांडं नरेन्द्रानं उचलून बाहेर नेऊन टाकण्याऐवजी स्वतःच्या तोंडात ओतून रिकामं केलं. सर्व घाबरले, नि नरेन्द्राच्या प्रकृतिबद्दल चिंताग्रस्त झाले. पण नरेन्द्राला त्याचं काहीच वाटलं नाही. उलट त्याची प्रकृति होती, तशी शेवट पर्यंत कायम राहिली. आत्मविश्वास, हिंमत नि गुरूवरील एकनिष्ठ भक्ती पाहून रामकृष्ण त्याला नरेन्द्राऐवजी 'विवेकानंद' नावानं हाक मारु लागले. नि तेच नाव आजतागायत लोकांच्या मुखी लागून अजरामर झालं.

१८९३ च्या सप्टेंबरात अमेरिकेतील शिकागो शहरी जगातील सर्व धर्म परिषद भरली. त्या परिषदेला हजर राहाण्यासाठी रामकृष्णांनी हिंदुधर्माचा प्रतिनिधी म्हणून विवेकानंदाची निवड केली. कॉलेजातून बाहेर पडलेला हा पंचवीशीतील तरुण मुलगा अमेरिकेला गेला. पण शिकागो शहर कुठं आहे, तिथं कसं जायचं,ह्याचं त्याना मुळीच ज्ञान नव्हतं. शिवाय जवळ पुरेसे पैसेही नव्हते. त्याकाळी प्रवास आगबोटीनं करावा लागे, अन् त्याला सुमारे एक महिन्याचा काळ लागे. अमेरिकेतील त्या उंच पन्नास, साठ मजल्यांच्या इमारती पाहून कुणाचंही मन थक्क होऊन जाई.

अमेरिकेला पोहोचल्यावर कोणत्या रस्त्यानं कसं नि कोणत्या साधनानं जायचं,हे न कळल्यामुळं,ते दुपारच्या वेळी एका फूटपाथवर बसून विचार करु लागले. शिवाय जवळ तितके पैसेही नव्हते. तेवढ्यात रस्त्यापलिकडील एक पासष्ट मजली उंच इमारतीतील एक स्त्री आपल्या गच्चीत आली, नि खाली सभोवती पाहू लागली. तेव्हा तिला फूटपाथवर भगवी वस्त्रं अंगात घातलेला अन डोक्याला फेटा बांधलेला

कुणीतरी एक बसलेला तिच्या नजरेला पडला. तिनं आपल्या नोकराला हाक मारून बोलाविलं, नि म्हटलं, "तो पाहा, कुणीतरी तरुण त्या समोरच्या फूटपाथवर बसला आहे. खाली जा, नि त्याची माहिती काढून ये! बहुधा तो अगदी नवशिका असावा!"

नोकरानं खाली येऊन सारी माहिती विचारून आपल्या मालकिणीला जाऊन सांगितली. तेव्हा ती स्वत: खाली आली, नि विवेकानंदाला आपल्या घरी घेऊन गेली. नि म्हणाली, "मलाही परिषदेला जायचं आहे. आपण दोघं एकदमच जाऊ!"

आंधळा मागतो एक डोळा, नि देव देतो दोन! ह्या न्यायानं विवेकानंदाना बरं वाटलं. नि ती स्वत:च्या मोटारीनं शिकागोला परिषदेच्या ठिकाणी विवेकानंदासह गेली.

सर्व धर्माच्या विद्वान वृद्ध मान्यवरांनी सभागृहाचा हॉल चिक्कार भरगच्च भरून गेला होता. पोरवयाचा हिंदुधर्म प्रतिनिधी एकीकडं जाऊन बसला. इतर सारे अद्यावत पोषाखात होते. स्टेजवर उंच जागी अध्यक्ष नि इतर चार विद्वान बसलेले होते. त्यांच्या पुढ्यात टेबलावर घंटा नि घड्याळ होतं. देशाचं नाव पुकारताच त्या प्रतिनिधीनं स्टेजवर जाऊन आपलं नांव, देश नि कोणत्या धर्मावर बोलणार,हे थोडक्यात पाच मिनिटाच्या आत सांगून आपल्या जागेवर येऊन बसायचं. वेळ समजण्यासाठी घड्याळ नि घंटा पुढं ठेवण्यात आली होती.

एकेका देशाचं नाव पुकारलं जाई, तो प्रतिनिधी स्टेजवर जाऊन आपल्या देशाची अन् स्वत:ची माहिती सांगून घंटा होताच खाली उतरे. अखेर पाळी आली 'हिंदुस्थान'! हिंदुस्थानचं नाव कानी पडताच पायघोळ भगवा झगा, भगवा फेटा नि हातात काठी घेतलेला पंचविशीचा तरुण स्टेजवर जाऊन उभा राहिला. लोक अचंबित झाले. एवढा मोठा देश, नि त्यात वयोवृध्द विद्वान ह्या तरूणाव्यतिरिक्त कुणीच का नव्हतं दुसरं? विवेकानंदानी सुरुवात केली. "माझ्या विद्वान स्त्री, पुरूष भगिनी बंधूंनो!" ह्या शब्दांनी सारे लोक विचलित झाले. त्या काळच्या प्रथेनुरूप **'Ladies and gentlemen'** अशी सुरूवात न करता, माझ्या बंधुभगिनींनो ही सुरूवात नवी होती. **'My brothers and sisters'** अशी करताच प्रचंड कडकडाट झाला. त्यात पाच मिनिटं कधीच निघून गेली. ते प्लॅटफॉर्मवरून खाली उतरण्यास सुरूवात करणार, तो सर्वांनी ओरडून सांगितले, "बोला, बोला! होऊ दे वेळ!"

विवेकानंदांनी सुरूवात केली. "माझ्या भारतात जगात प्रचलित असणाऱ्या सर्व धर्माचे लोक गुण्या-गोविंदानं सुखात नांदत आहेत! आम्ही हिन्दु त्यांना परके न मानता, आपलेच बंधु आहेत,असं मानून,त्यांना मदत करणं, काय हवं नको ते पाहाणं नि त्यांच्याशी बंधु-भगिनींचं नातं जोडून जीवन कंठणे, हेच करीत आलो आहोत!" अशाच प्रकारचं मन वेधून घेणारं बोधप्रद भाषण करुन ते खाली उतरायला लागले, तेव्हा मोठमोठ्या विद्वानांनी, धर्मोपदेशकांनी नि अनेक देशोदेशींच्या मान्यवरांनी त्यांना आणखी बोलण्याचा आग्रह केला. त्यांचं भाषण अत्यंत बोधप्रद अन् श्रुति मनोहर होतं.

त्यांच्या भाषणातील काही उल्लेखनीय अवतरणं– "भारत हा एक चिरंजीव देश आहे. अध्यात्मिक अनुभूति, देवाचा ध्यास हेच मानवी जीवनाचं ध्येय आहे. ही धारणा जोपर्यंत भारतीय अंतःकरणात दृढ आहे, तोपर्यंत भारत अमर आहे.– 'India is immortal if she persists in her search for God.'

"मानवकुलाचा अभ्यास केला, तर असं दिसतं, शांत नि सौम्य हिंदु कुलाइतकं जग अन्य कुणाचंही नाही. हे सौजन्य उपहास विषय बनेल, दुबळेपणाचा आरोप केला जाईल, निंदा होईल, असं जरी घडलं तरी ईश्वरी प्रेमाला पात्र,असं हे एकच आमचं कुळ आहे. धर्म हा माणसात असणाऱ्या अभिजात दिव्यत्वाचा आविष्कार आहे, हे कसं चूक ठरेल!".... अशा प्रकारं अगदी सडेतोड भाषण केल्यानंतर टाळ्यांचा जो कडकडाट झाला, तो दहा मिनिटं थांबलाच नाही! त्यानंतर त्यांची सर्व अमेरिकेतील ४७ परगणे, युरोपातील अनेक देश, तसंच जपानमध्येही तिकिटं लावून त्यांची भाषा झाली, नि लाखो रुपये घेऊन विवेकानंद सात-आठ महिन्यांनी स्वदेशी परतलं रामकृष्ण परमहंसांना अत्यंत, आपल्या कर्तबगार शिष्याच्या विद्वत्तेचं समाधान झालं.

त्यानंतर आणलेले सर्व पैसे 'रामकृष्ण परमहंस' मठ सर्व भारतभर स्थापन करण्यात खर्च केले. ह्या मठात मोठमोठे विद्वान प्रचारक काम करीत आहेत. त्यांनी रामकृष्णांचा उच्च ध्येयवाद 'योगाभ्यास नि अध्यात्म' यांच्या द्वारा साऱ्या जनतेत व्याख्यानांद्वारे पसरविला. हे कार्य अहर्निश आजही चालत आहे. परमहंसांनंतर विवेकानंदानी कन्याकुमारीच्या समुद्रात एका बेटावर आपलं कायम वास्तव्य करुन तिथंच ते समाधिस्थ झाले. आज त्या ठिकाणी त्यांचं अति भव्य स्मारक तुम्हाला पाहायला मिळेल!

साईभक्तांनी आज सर्व भारतभर विवेकानंदांप्रमाणं 'साई मन्दिर' बांधून त्यांच्यावरील अनन्य भक्तीचं सर्वांना दर्शन घडविण्याचं मोठं श्रद्धायुक्त कार्य केलं आहे. रामकृष्णांप्रमाणं साईबाबांनी भक्तांचं कल्याणतर केलंच, शिवाय धर्मा धर्मातील मतभेद मिटवून त्यांना एका ठिकाणी आणून, खाणं पिणं घालून त्यांच्या ठिकाणी प्रेम वृद्धिंगत केलं.

श्री साईबाबा एक थोर महान संत पुरुष होते. प्रत्यक्ष देवच होते ते! रामकृष्णा प्रमाणं लोकांत नांदून मिळून मिसळून लोकांचं कल्याण तर केलंच, शिवाय त्यांच्या ठिकाणी प्रेम नि सद्भावना निर्माण केली. सन्त ह्या शब्दाचा धात्वर्थ 'सद्वस्तु' असा आहे. तीनही काळी ज्याच्या स्वरुपात– वागण्यात, बोलण्यात– बदल होत नाही, अशी जी वस्तु तिला सन्त म्हणतात. म्हणून सन्तांचा उल्लेख 'आत्मा' ह्या अर्थानंच केला जातो.

माणसाच्या ठिकाणी पाच दुर्गुणांचं वास्तव्य नांदत असतं. अभिलाषा, चिंता, अशांतता, विषमता, अन् वैरभाव, ह्या पाच दुर्गुणांनी मानवाचं जीवन मलीन होतं. ह्या पाचांचा नाश करण्याचं एकच साधन म्हणजे संतकृपा. तुकारामादि संतानी देवाजवळ हेच मागितलं. श्रीएकनाथ म्हणतात, "संत आणि देव यात देव निर्धार धाकुला!" सन्तांपेक्षा देव केव्हाही लहानच आहे.

संत आधी देव मग । हाचि उगम आणा मना ।
देव निर्गुण संत सगुण । म्हणोनि महिमान देवासी ।
एका जनार्दनी संत थोर । देव निर्धारे धाकुला ।।

श्रीसाईबाबा देव होते, हे म्हणणं केव्हाही चूक ठरुच शकत नाही. कारण त्यांची कृति, भक्ताबद्दलची आस्था, प्रेम अन् त्याच्या कल्याणाची ओढ ह्या गोष्टी त्यांच्या वागण्या बोलण्यावरुन नेहमीच दिसून येत असत. म्हणूनच ते देव.

माणसाचा आत्मा हा देवानं दिलेला दीप होय. तो सारखा तेवत ठेवला पाहिजे. अन् म्हणून कुत्र्या, मांजरांनी अन् पक्ष्यांनी उष्टावलेलं अन्न बाबा सहजगत्या खात असत. आपणाला ते चमत्कारिक वाटत असे. त्यावर बाबार म्हणत, "त्यांचा नि माझा आत्मा एकच आहे! तेव्हा माझं करणं गैर कसं ठरु शकेल?"

सर्वांच्या अंतःकरणात वास्तव्य करणारा खरा देव श्रीसाईबाबा! म्हणूनच ते थोर अन् त्रिवार वंदनीय! जय बोला, जय श्रीसाईबाबा!

# श्री साईबाबांची कृपादृष्टी

**– श्रीमती राधाबाई दुसंगे.**

आम्ही साठ वर्षांपासून हैद्राबादला राहतो. माझ्या मुलांची दोन घरे हैद्राबादला आहेत व एक मुलगा मुंबईला १९५६ पासून स्थायिक झाला आहे. तो मंत्रालयात असिस्टंट सेक्रेटरी आहे. दुसरा हैद्राबादला अध्यापक आहे. तिसरा युनियन बँकेत मॅनेजर आहे. आमचे घराणे विठ्ठल भक्ताचे वारकरी संप्रदायाचे. प्रथम मला भजनात रस नव्हता, पण पुढे पुढे नकळतच मला भजनाचा खूप नाद लागला आहे. त्या कारणाने मी भजनानंदात नेहमीच सहभागी होते. असेच एकदा ६.४.१९७९ रोजी मी रामनवमीला इसामिया बाजारच्या साई मंदिरात भजनासाठी गेले होते. तेथे आम्हाला साईंच्या फोटोची प्रत मिळाली. बरेच साई वाङ्मय वाचनात आले. मग साईंच्या दर्शनाची ओढ लागली. आणि मी दर्शनाला जाण्याचा संकल्प केला. "सत्य संकल्पाचा दाता भगवान" या उक्तिप्रमाणे त्यानंतर तीन वेळेस मला साईकृपेने दर्शनाचा योग अचानक घडून आला. आमच्यावर बरीच संकटे आली, कोर्ट कचेरीची वेळही आली. परंतु ह्या सर्व दुस्तर अशा अडचणींतून साईकृपेने आम्हाला तारले. साईंची कृपा हाच आमचा आधार आहे.

# अद्‌वैत

– श्री. दत्ता गणपत माने
'आनंद', ब्लॉक नं. ३,
हवा हीरा पार्क,
कुरार, मालाड (पूर्व),
मुंबई – ४०० ०९७.

शिरडी हे आज लाखो भक्तांचे सुखधाम झाले आहे. तेथे जाऊन आलेली मंडळी एक वेगळा अनुभव आपल्या जीवनात अनुभवतात. परब्रहम साईबाबा या नावाने लाखो लोकांना आनंदाकडे जाण्याचा मार्ग दाखवून दिला आहे. श्री.अरविंद योगी म्हणतात त्याप्रमाणे "आम्ही सुख आणि दु:ख भोगले आहे, आनंद नाही. शाश्वत आनंदाकडे आम्हाला जायचे आहे." हा शाश्वत आनंद समजाविण्यासाठी धर्मग्रंथ व अवताराचा जन्म आहे व आपले अंतिम ध्येय ते आहे. अवतारी व्यक्तींनी शब्द व कृतीद्वारे आम्हाला मार्गदर्शन केले आहे.

श्री साईबाबा हा भगवंताचा अवतार. त्यांनी शब्दाद्वारे दिलेला संदेश "सबका मालिक एक, श्रध्दा व सबुरी". हिंदु, मुसलमान, खिश्चन, पारशी, जैन, बौध्द इ. धर्मांची मंडळी ही आपापल्या परीने त्या त्या ईश्वराची भक्ती करीत असले, तरी 'त्या' एकालाच भजतात, असे श्रीसाईबाबांनी आपणास सांगितले. प्रत्येक धर्म म्हणजे त्याला शोधून काढण्याची वेगवेगळी पध्दत. पध्दतीत फरक असला, तरी ईश्वरात फरक नाही.तो एकच आहे. आपल्या हिंदुशास्त्रांनी सांगितलेले अद्‌वैत ते हेच-द्वैत म्हणजे दोन व जे दोन नाहीत, ते अद्‌वैत.

श्री साईबाबांनी सांगितले, सर्व प्राण्यांवर दया करा. त्याप्रमाणे त्यांनी मानव, कुत्री, मांजरे, वाघ, पक्षी, मुंग्या, वृक्षवल्ली यांवर स्वत:च्या कृतीतून उपदेश करून लोकांना शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. रोगी, महारोगी पिडितांवर स्वत: उपचार करून मानवधर्म, दयाधर्म शिकविला. धनसंपत्ती व भोग यांना त्यांनी तुच्छ मानले. भिक्षा मागून आयुष्य कंठले. कसलाही संग्रह केला नाही. निर्वाहापुरते अन्न, आच्छादन! झोपण्यासाठी कोपी गुहा!! असे जीवन जगले.

सुशिक्षितांना ज्ञानाने उपदेश केला, अशिक्षितांना कृतीने उपदेश केला व संशयाने पछाडलेल्यांना चमत्काराने उपदेश केला. विविध स्वभावाच्या लोकांना विविध प्रकारे उपदेश केलेला आपणास आढळतो. शेवटी माझ्याशी योग्य आचारविचाराने वागून अनन्य व्हा, असे सांगितले. साई म्हणे तोचि झाला धन्य। झाला जो अनन्य माझ्या ठायी॥ अनन्य होणे, म्हणजे स्वत:चे मीपण अहंभाव नष्ट करणे मी प्रपंच करतो, मी पैसे कमावतो, मी मुलाबाळांना मोठे करतो, हा मीपणा नष्ट करणे. त्याऐवजी तो सर्व करतो, माझ्या अंतर्यामी असलेला, तो हे सारे करतो. मी जन्मलो, हे माझ्या हातात

नव्हते. माझा मृत्यू कधी येईल,तेही माझ्या हातात नाही. ते जसे त्याच्याकडे आहे,तसेच हे मी करतो, ते सुध्दा तोच करीत आहे. मला त्याचा विसर पडला आहे. सर्व कर्म करीत असताना त्याला न विसरता राहणे, म्हणजेच अनन्य होणे होय. असे अविरत चिंतन सुरू झाले,म्हणजे अनन्यभाव, ईश्वरभाव आपल्यात उतरलाच म्हणून समजा, मग आपल्या हातून शुध्द कर्मच घडतील व कर्मासक्ती राहणार नाही.

तेव्हा साईभक्त मंडळी, आपण दया, धर्म, शुध्द आचारविचार व एक देव ही साईबाबांची शिकवण आपणामध्ये उतरविण्याचा जोरदार प्रयत्न करून अनन्य होणे, म्हणजेच साईभक्त म्हणवून घेण्यास योग्य होणे, असे तुम्हाला वाटत नाही काय? वाचा आणि विचार करा! या लेखाचा अहंभाव मी लिहिला,असा माझ्याकडे होत नाही. सर्व तो करतो. मग लेखाचे कर्तेपण मी माझ्याकडे कशाला घेऊ! आचार, विचार, कृतीतून अनन्यभाव उतरून आमची जीवननौका पैलतीराला नेण्यासाठी साईबाबांकडे प्रार्थना करू या. ॐ श्री साई। तुझ्या विना मला कोणी नाही। असे म्हणू या.

# श्रीसाईंची प्रतिकात्मक दीपावली-पणती!

– सौ. संगीता गोडबोले
एम्. ए., बी. एड्.
प्लॉट नंबर ३७२, सेक्टर २८,
प्राधिकरण, पुणे ४११ ०४४.

'काव्यस्य आत्मा ध्वनिः।'
(आनन्दवर्धन - ध्वन्यालोक)

'काव्याचा आत्मा म्हणजे ध्वनी' (व्यङ्ग्यार्थ) होय, असे ध्वन्यालोक नामक संस्कृत ग्रंथात आनन्दवर्धनाने नमूद करून 'ध्वनि' सिध्दांताचे प्रतिपादन केले आहे. पुढील अनेक ग्रंथकारांनी हा सिध्दांत मान्य केला आहे. 'काव्य' ही संज्ञा प्राचीन कालात गद्य व पद्य अशा वाङ्मयप्रकारात होती. सध्या 'काव्य' शब्दाने फक्त पद्यात्मक अंशाचाच बोध होतो.

'शब्द' वाचिक, लाक्षणिक, व्यंजक अशा तीन प्रकाराने संभवतो. त्याचे त्याप्रमाणे तीन अर्थ संभवतात १) वाच्य- वरवर दिसून येणारा २) लक्ष्य व ३) व्यङ्ग्यार्थ- ध्वन्यार्थ म्हणजेच 'प्रतिकात्मक' अर्थ. हा वाच्यार्थातून सूचित होणारा असतो. हा व्यङ्ग्यार्थ काव्यातून म्हणजे गद्य-पद्य वाङ्मय प्रकारातून जितका अधिक,तितकी ती रचना अधिक मोलाची, असे पूर्वीच्या साहित्यकारांनी विशद केले आहे.

ही सर्व प्रस्तावना सांगण्याचा उद्देश इतकाच की, हा साहित्यकारांचा विचार-विमर्श पाहिल्यावर माझ्यासारख्या साईवेड्या मनाने साई 'सच्चरित्रा'चा या दृष्टीकोनातूनही विचार करून पाहिला व मला जाणवले की, 'साईनाथ' हे भोळ्या भाबड्या भाविकांचे देव आहेतच, सर्व जगताचे 'गुरू' आहेत, ते तर परब्रह्म स्वरूपच आहेत, यात तिळमात्र शंका नाही. पण त्याचबरोबर साहित्यकारांच्या बैठकीत सुध्दा साईनाथांचा अग्रक्रमच लागेल! कारण त्यांच्या साईसच्चरित्रातून हा व्यङ्ग्यार्थ (प्रतिकात्मक अर्थ) पदोपदी भरून राहिला आहे. आपण फक्त त्याचा वैचारिक दृष्टीकोनातून विचार करून, मनन करून, अभ्यास करून, आचरणात आणण्याचा प्रयत्न करावा.

मी या 'प्रतिकात्मक' म्हणजे ध्वन्यार्थाविषयी फक्त साईभक्तांना परिचित असणारे एकच उदाहरण देणार आहे. साईनाथांनी 'दिपावली' कशी साजरी केली, हे सर्वांना माहीत आहेच. साईनाथ जिवंत असताना वाण्याने तेल नाकारले व 'झिपरी' नावाची जी लहान मुलगी, तिच्या बालहट्टास्तव साईंनी पणत्यांत पाणी घालून दिवे लावले. हे सर्व पाहिल्यावर वाणी व इतर लोक आश्चर्यचकित झाले. व या चमत्काराने साईंची महती सर्वांना पटली.

असे चमत्कार साईनाथांनी अनेक दाखविले आहेत. पण येथे साईभक्तांनी व इतरांनी सुध्दा हे पाहिले आहे की, हे चमत्कार साईंनी वारंवार दाखविलेले नाहीत. एकदा पणत्या पाण्याने पेटविल्या, म्हणून त्या वारंवार पेटविलेल्या नाहीत. तसेच, चिमट्याने एकदा अग्नी प्रज्वलित केला, म्हणून वारंवार तो प्रज्वलित केलेला नाही. म्हणजेच, खरे साधुसंत हे चमत्कार दाखवितात, पण त्या चमत्कारांनाच ते चिकटून राहत नाहीत. काही साधना केल्यानंतर व्यक्तीला अरिमा, गरिमा आदी अष्टसिध्दी प्राप्त होतात. पण त्या शक्तींनाच चिकटून न राहता, जे त्यापलिकडे जाऊन परमतत्वाचा, आत्म्याचा शोध घेतात, अनुभव (साक्षात्कार) प्राप्त करून घेतात, व इतर लोकांवर अनुग्रह करून त्यांना सन्मार्गाला लावतात, तेच विश्वात अजरामर होतात. नाहीतर चमत्कार दाखविणारे लोक सध्याच्या कलियुगातही काही कमी नाहीत. ते साईनाथांसारखे 'गुरू' होऊ शकत नाहीत. कारण त्यांचे कार्य फक्त चमत्कारापुरतेच राहते. त्यापलिकडे जे गेले, तेच जगाचे गुरू होतात, जसे 'साईनाथ' सर्व विश्वाचे गुरू झाले. थोडेसे विषयांतर झाले. क्षमस्व.

आता या 'चमत्कारा'कडे आपण 'प्रतिकात्मक' दृष्टीने पाहू या.

१) 'दीपावली' म्हणजे दिव्यांचा उत्सव, आपण प्रत्येक वर्षी दिवे लावून साजरा करतोच की! पण ते लावताना थोडासा विचार करून पहा. साईनाथांनी 'दिवे' प्रज्वलित करून आपल्या अज्ञानाची कवाडेच (द्वारेच) खोलायला सांगितली आहेत.

'तमसो मा ज्योतिर्गमय।'– असे श्रुतीमधून आले आहे. 'तमस्' म्हणजे अंध:कार. 'तू अंध:काराकडे जावू नकोस, प्रकाशाकडे जा. हा प्रकाश ज्ञानाचा आहे. यामधील 'दिवा' किती प्रतिकात्मक आहे पहा! दिवा दुसऱ्यांना प्रकाश देतो. त्याचप्रमाणे तुम्ही

ज्ञान प्राप्त करा आणि त्या ज्ञानाचा प्रकाश, म्हणजे उपयोग दुसऱ्यांनाही करून द्या. साईनाथांनी वाण्याचे अज्ञान दूर केले. पण समस्त जगताला पारमार्थिक ज्ञानाचा प्रकाश प्राप्त करून घेण्यास सूचित केले असावे.

२) या उदाहरणाद्वारे दुसरी एक बाजू दृष्टोत्पत्तीस येते. 'साईनाथ' हे परब्रह्म स्वरूप होते! पण लोकांच्या उध्दाराची ज्यांना कळकळ लागून राहिली आहे व त्यासाठीच ज्यांनी विश्वात जन्म घेतला, ते सुध्दा या जगात जन्म घेतल्याने लोकांसारखेच वागले.

'सूर्याच्या घरी, सण दिपावली,
आली खरी!
परि ती त्याने, साजिरी करावी,
कोणत्या द्रव्ये।।' — स्तवन-मंजिरी.

असे दासगणूंनी स्तवनमंजिरीत लिहिलेले खूप सूचक आहे. 'दिपावली' जर सूर्याच्या घरी आली, तर ती त्याने कोणत्या द्रव्याने, म्हणजे कशा रितीने दिवे लावून साजरी करावी? हे उदाहरण ह. भ. प. दासगणू महाराजांनी जे जे पदार्थ पूजेचे आहेत, ते ते साईनाथांच्या आत्म्याचेच आहेत, हे सांगताना घेतले आहे. पण यातूनही वरील घेतलेल्या उदाहरणाच्या संदर्भात ध्वन्यार्थ प्रतीत होतो.

'साईनाथ' हे स्वतःच ज्ञानाचा सूर्य होते. ते बाहेरील कोणत्या दिपकाने लोकांना प्रकाशित करणार होते? पण स्वयंप्रकाशी असणाऱ्या या साईनाथरूपी सूर्याने 'मानव' म्हणून जन्म घेतल्याने, ते मानवासारखेच राहिले व त्यांनी लोकांना ज्ञानप्रकाश दिला, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. नाहीतर वाण्याकडे तेल मागण्याची गरजच काय होती? रोज ते स्वतःच्या सामर्थ्याने दिवे लावू शकत होते.

३) आता या प्रतिकात्मक उदाहरणाची तिसरी बाजू पाहू या.

'तमा निरसि भानु हा, गुरूहि नासि अज्ञानता, परंतु गुरूचि करी, न रविही कधी साम्यता, पुनः तिमिर जन्म घे, गुरूकृपेनि अज्ञान ना।।' असे श्री. कृ. जा. भीष्म यांनी साईनाथ सगुणोपासनेत लिहिले आहे. त्यांनी सूर्याचे उदाहरणच दिले आहे. सूर्य हा अंधःकार नष्ट करतो. गुरूही अज्ञान रूपी अंधःकार नष्ट करतो. पण गुरू व सूर्याची कधी तुलनाच होऊ शकत नाही. कारण अंधःकार पुनः पुनः जन्म घेतो. पण एकदा 'गुरूकृपा' झाली की, अज्ञान पुनः जन्म घेत नाही, या अज्ञानरूपी अंधःकाराचा नाश एकदाच होतो.

४) आता या प्रतिकात्मक उदाहरणाची चौथी बाजू पाहू. ह. भ. प. दासगणू महाराजांनी कल्पनेने साईनाथांचे पूजन कसे केले आहे? पहा—

"दीप माया मोहाचा,
पाजळीतो मी हा साचा,
तेणे वैराग्य प्रभेचा,
होवो गुरूवरा लाभ मजसि।"

येथे माया, मोह आदि षड्रिपुंचा 'दीप' मी ओवाळून टाकीत आहे, असे म्हटले आहे. म्हणजेच, या षड्रिपुंचा मी त्याग करतो व त्यामुळे निर्माण होणारी 'प्रभा' म्हणजेच 'प्रकाश' त्याचा हे सद्‌गुरू मला लाभ होऊ दे, अशी प्रार्थना केली आहे. पण हा प्रकाश वैराग्याचा आहे. बरोबरच आहे. माया, मोह आदि षड्रिपूंचा अंध:कार नष्ट झाल्यावर 'वैराग्य' रूपी प्रभेचा लाभ न झाला तर नवलच!

अशा रितीने साईनाथांच्या 'प्रतिकात्मक' पणती मध्ये किती ध्वन्यार्थ सामावलेला आहे, याचा साईभक्तांनो विचार करा, मनन करा व आचरणात आणण्याचा प्रयत्न करा. असा 'ध्वन्यार्थ' साईनाथांच्या सच्चरित्रात पदोपदी भरून राहिला आहे. म्हणून साहित्यिक दृष्टीकोनातूनसुध्दा आपल्या साईनाथांचा व त्यांच्याच कृपेने साईंचे चरित्र लिहिणाऱ्या परमसाईभक्त, साईसच्चरित्राचे आद्य शिल्पकार कैलासवासी श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांचा अग्रक्रमच लागेल.

# अधिकमासाचे महत्व आणि व्रते

**– श्री. रमेश पां. पुंडलिक**
द्वारा काशिनाथ दारूणकर, तेलीखुंट,
डाळमंडई रोड, अहमदनगर.

तीन वर्षानंतर येणारा हा अधिकमास हिंदुंमध्ये अत्यंत पवित्र आणि महत्वाचा मानला जातो. या अधिक मासालाच 'पुरूषोत्तम' महिना, 'मलमास' किंवा 'धोंड्याचा' महिना, असेही म्हणतात. या महिन्यात जेवढे सत्कर्म, पुण्यकर्म केले जाईल, ते दुपटीने वाढते, असे या मासाचे विशेष महत्व आहे. भगवान श्री. गोपालकृष्ण यांना प्रिय असा हा महिना आहे. म्हणून या कालावधीत श्रीकृष्णाचे भजन-पूजन केले जाते.

साधारणपणे पावणेतीन वर्षाच्या कालावधीनंतर, म्हणजेच ३२ महिने, १६ दिवस व ४ घटिका इतक्या कालावधीनंतर जे वर्ष येते, ते तेरा महिन्यांचे असते. त्यावेळी अधिकमास येतो. चैत्र महिन्यापासून आश्विन महिन्यापर्यंतच्या आठ महिन्यांपैकी कोणताही एक अधिक मास असू शकतो. पौष, माघ, फाल्गुन हे महिने मात्र कधीच अधिक होऊ शकत नाहीत.

**अधिक मासाची कथा–**

ज्यावेळी एकदा अचानक हा १३ वा महिना उत्पन्न झाला, त्यावेळी सर्व लोक त्याची निंदा करू लागले. मलमास म्हणून त्याची हेटाळणी करू लागले. त्यामुळे तेव्हा अत्यंत दु:खी होऊन अधिकमासाने गो-लोकात राहणाऱ्या सुंदर, सगुण व हातात

मुरली घेऊन बालरूपाने नटलेल्या पुरूषोत्तमास आपले दु:ख सांगितले. त्या तपोनिष्ठ उदार असणाऱ्या पुरूषोत्तमाने ह्या महिन्याचा स्वीकार केला आणि वरदान दिले की, 'मी स्वत: या मासाचा स्वामी असून जो कोणी या 'पुरूषोत्तम' मासाचे पूजन व व्रत करील, त्याचे सर्व मनोरथ सफल होतील. तीन वर्षांनी एकदा येणाऱ्या ह्या अधिकमासात जो कोणी पवित्र तीर्थक्षेत्री स्नान करील, तसेच दान-पूजा, तप इत्यादी कर्मे करील,त्याच्यावर भगवान पुरूषोत्तमाची कृपा होईल.' या अधिक मासाचे महत्व पाच पांडवांना स्वत: श्रीकृष्णांनी सांगितले आहे.

**हे व्रत कसे करावे?**

हा अधिक महिना भगवान श्रीकृष्णाचा आवडता महिना म्हणून ओळखला जातो. या पवित्र अशा महिन्यात मनुष्याने आपल्या शरीराला, मनाला काही नियम लावून घ्यावेत. या महिन्यात दररोज प्रात:स्नान करावे. तसेच स्नान करताना अंगाला आवळ्याचा कल्क लावून स्नान करावे. या स्नानाला 'धात्री'स्नान असे म्हणतात. स्नान झाल्यावर आपल्या घरात गाई-वासरांसह असलेली गोपाळ कृष्णाची मूर्ती चौरगावर मांडावी, चौरंगावर पांढरे शुभ्र वस्त्र टाकून त्यावर ही मूर्ती स्थापन करावी. स्नान करून शुध्द अंत:करणाने गंध, अक्षता व फुले अर्पण करून मूर्तीची पूजा करावी. मूर्तीसमोर संपूर्ण महिनाभर तुपाचा दिवा तेवत ठेवावा. पूजा संपल्यावर शुध्द अंत:करणाने श्रीकृष्णाचे ध्यान करून खालील मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**मंत्र—** 'गोवर्धनधरं वन्दे गोपालं गोपरूपिणम्।
गोकुलवत्स भगवन् गोविन्दं गोपिका प्रियम्॥

या महिन्यात उपवास करावा, कारण उपवासाचे देखील फारं फल सांगितले आहे. या व्रताचे पालन केल्याने आपल्या घरातील दु:ख, दारिद्र्य, पीडा नष्ट होऊन घरात सुख, शान्ती व समृध्दि निर्माण होते.

**या महिन्यात करावयाची व्रते—** या महिन्यात जेवढी सत्कर्मे केली जातील,तेवढे त्याचे जास्त फळ मिळते. गो-लोकात राहणाऱ्या पुरूषोत्तमाचा हा आवडला महिना आहे. गायी वासरे गोपालकृष्णाला फार प्रिय होती. म्हणून या महिन्यात गायीचे पूजन व दान केले जाते.

**गो-दानाचे विशेष महत्व:—** संपूर्ण त्रिभुवनात गायीसारखे पवित्र आणि श्रेष्ठ दैवत नाही. गो-मातेच्या शरीरात चौदाभुवने वास करतात. गायीची पूजा करून तिला नमस्कार व स्पर्श केल्यास दु:ख, दारिद्र्य, रोग, पाप, क्लेश नष्ट होऊन मनुष्य पवित्र व सुखी बनतो. गायीच्या मिळणाऱ्या दुधापासून मनुष्याच्या शरीरास पुष्टी व शक्ती मिळते. दही, दूध, तुपाने यज्ञयागादी कर्मे पार पडतात. तिच्यापासून मिळणाऱ्या शेणाने होमाची जागा सारवतात. गाईला प्रदक्षिणा केल्यास पृथ्वी प्रदक्षिणेचे पुण्य मिळते.

**दीपदान—** या मासात आपल्या घरात अखंडपणे दिवा तेवत ठेवावा. दिवा प्रकाश देऊन सौख्य, आनंद निर्माण करतो. अंध:काराचे प्रतीक असणारे नैराश्य, दु:ख तो आपल्या प्रकाशाने नष्ट करतो. म्हणून या महिन्यात सत्पात्र ब्राम्हणास तांब्याच्या

दीपाचे दान द्यावे. त्यामुळे स्त्रियांचे सौभाग्य वर्धमान होऊन त्यांना सौख्य प्राप्त होते.

**अन्नदान–** हल्लीच्या युगात सर्वात मोठे आणि सर्वांना करता येण्यासारखे दान कोणते असेल तर ते म्हणजे अन्नदान होय. जे कोणी गरीब, अनाथ, पंगु व सज्जन आहेत, त्या लोकांना अन्नदान करावे. जे गरीब व भुकेलेले आहेत, अशा लोकांनाच अन्नदान करण्यात खरे पुण्य आहे.

**उपवास व मौन भोजन–** या महिन्यात उपवास केल्याने आरोग्य चांगले राहून मन सात्विक व पवित्र राहते. आपल्या शरीरास मानवेल, झेपेल हा विचार करूनच उपवास करावा. ज्यांना उपवास अगदीच शक्य नसेल, अशा लोकांनी प्रमाणशीर आहार सेवन करावा, मौन भोजन म्हणजेच जेवताना कोणाशीही न बोलणे.

**नामस्मरण–** या महिन्यात ज्या लोकांना स्नान, दान, उपवास, व्रते करणे अशक्य असतील, अशा लोकांनी हरिनामाचा जप करावा, गोपालकृष्णाचे स्मरण करावे. तात्पर्य,हा महिना सर्वोत्तम मास म्हणूनच ओळखला जातो. मनाला व इंद्रियांना चांग वळण लागण्यासाठी व सुसंस्कार होण्यासाठी , तसेच उत्तम आरोग्य प्रा होण्यासाठी हे नियम असतात.

# श्री साईबाबा – एक विभूती

– प्रा. आय. पी. उमराणी
१४४२ अ/सी वॉर्ड, शाहू रोड, लक्ष्मीपुरी,
कोल्हापूर - ४१६००२.

संतांच्या माध्यमातून प्रत्यक्ष ईश्वरच सगुण साकार होत असतो. देश, काल, परिस्थितीनुरूप अशा धर्माची संस्थापना करण्याकरिता ईश्वरच संतरूपाने अवतरतो. अलिकडील काळात श्री साईबाबा हे अशा थोर अवतारी महापुरूषांपैकी एक होऊन गेले. अष्टमहासिध्दी त्यांच्या चरणी लोळत होत्या. चौदा विद्या, चौसष्ट कला त्यांना साध्य होत्या. चारी मुक्ती त्यांच्यापायी विश्रांती घेत होत्या.'कर्तुमकर्तुम् अन्यथा कर्तुम्' असा त्यांचा अधिकार होता.

त्यामुळे त्यांचे लौकिक चरित्र अघटित घटना-प्रसंगांनी शृंगारलेले आहे. निजानंदबोधाने ते सतत स्वानंद सुखात डोलत राहिलेले होते. अहंकार, काम, क्रोध, लोभ आदि षड्रिपूंचे त्यांनी संपूर्ण निर्दालन केले होते. अंतरी प्रेमाचा जिव्हाळा ओसंडत होता 'नाही देहस्मृती निमाली वासना। मावळली कल्पना भावाभाव। अखंड विदेही रजतमा वेगळे। भोगती सोहळे प्रेमसुख' अशा अलौकिक पातळीवरच ते सतत विराजमान झालेले होते. क्रियाकर्म, वर्णाश्रम, धर्म, सुखदुःख, जातिकुळभेद यांच्या पैलतीर जाऊन अखंड आनंद ऐक्यतेचा सोहळा भोगणारे संत म्हणून त्यांची योग्यता

होती. इ. स. १९०० ते १९१८ या दीड तपाच्या कालावधीत त्यांनी केवळ महाराष्ट्रीयच नव्हे,तर भारतीय समाज मनावर आपल्या अवतार कार्याचा प्रभावी ठसा उमटवला होता.

अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील 'शिर्डी' या गावी ते एक दिवस अकस्मात प्रकट झाले. त्यांचा जन्म कोठे झाला, त्यांचे आईवडील कोण होते, इतकेच काय पण ते धर्माने हिंदु होते की मुसलमान या गोष्टीसंबंधाने निर्णायक मत देण्यासारखा पूर्ण विश्वसनीय असा कोणताच पुरावा उपलब्ध नाही. मात्र हे निश्चित की, माणसाला खऱ्या सुखाची आणि नित्य समाधानाची प्राप्ती कशी होते,याचा मार्ग त्याला दाखविण्यासाठी व सुखांच्या लोभाने चुकीच्या मार्गाला अज्ञानाच्या अंध:कारात धाचपडत चाललेल्या मानवजातीला सत्याचा प्रकाश दाखवून सन्मार्गावर आणण्यासाठी श्री साईबाबांनी अवतार घेतलेला होता.

शिर्डी येथे श्री साईबाबा जेव्हा प्रकट झाले तेव्हा त्यांचे वय अंदाजे पंधरा-सोळा वर्षांचे होते. सुरूवातीला बाबा बहुतेक वेळ निंब वृक्षाखाली बसत असत. सध्या ही जागा "गुरूपादुका स्थान" म्हणून शिर्डीत प्रसिध्द आहे. काही वेळा बाबा तेथील एका पडक्या मशिदीत बसत असत. कालांतराने बाबांनी नेहमीचे ते विश्रांती स्थान केले. व त्या जागेला त्यांनी "द्वारकामाई" असे नाव दिले. बाबा प्रेमाने असे म्हणत असत की, "हीच आपुली द्वारका माता॥ मशिदीचे या अंकी बैसतां। लेंकुरां देई ती निर्भयता। चिंतेची वार्ता नुरेचि॥ मोठी कृपाळू ही मशीदमाई। भोळ्या भाविकांची ही आई। कोणी कसाही पडो अपायी। करील ही ठायींच रक्षण॥ एकदा हिचे जो अंकी बैसला। बेडा तयाचा पार पडला। साउलींत हिचे जो पहुडला। तो आरूढला सुखासनी॥ हीच द्वारका द्वारावती" (श्री साईसच्चरित,अध्याय २२) बाबांच्या मुखी 'अल्लामालिक' हेच एक पालुपंद असे. त्याच्या बोलण्यात नेहमी 'अल्ला का बंदा' (अल्लाचा सेवक) असे शब्द प्रयोग असत. ते स्वत: असे म्हणत की, "माझ्यावर माझ्या गुरूची पूर्ण कृपा आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे. गुरूच्या कृपेने आणि आशीर्वादाने मी भक्तांची संकटापासून मुक्तता करतो आणि त्यांना सन्मार्गाची दिशा दाखवून देतो." कोणाही व्यक्तीजवळ बाबांनी "अनलहक्क" म्हणजे मी "स्वत: परमेश्वर", असे उद्गार काढले नाहीत. "मी परमेश्वराची ओळख करून देतो, स्वत: मी देखील दयाधन परमेश्वराचा बंदा (सेवक) आहे," असेच ते सर्वांना म्हणत.

बाबांची स्थिती "फाटके तुटके नेसतो रे। मन मानेल तेथे बसतो रे। वेड्या वेड्या परी दिसतो रे। परि ब्रम्हांड गिळून असतो रे।" अशी होती. ते कधीकधी ओढ्यावर भटकत फिरत. कधी निंबवृक्षाखाली आकाशाकडे टक लावून ध्यानस्थ बसत, तर कधी लहर लागल्यास कोणत्याही मळ्यात शिरून चिलीम फुंकीत गप्पा मारीत बसत. अंगावरील कपड्यांची त्यांना कधी शुध्द नसे. एखाद्या वेड्या, भ्रमिष्ट माणसासारखे त्यांचे वागणे होते. लोक त्यांना 'वेडा फकीर' समजत व त्यांच्याकडे शक्यतो दुर्लक्ष करीत. पण संतांच्या उन्नती मार्गातील हा एक टप्पा समजला जातो.

प्रेमळपणा हा त्यांच्या चित्ताचा स्थायीभाव होता. त्यामुळे ते लहानथोर सर्वांवर प्रेमकृपेचा वर्षाव करीत हिंडत असत. व्याधीग्रस्त लोकांबद्दल त्यांच्या मनी अपार करूणा होती. लोकोपकारार्थ त्यांनी आपले दैवी सामर्थ्य प्रकट करण्यास प्रारंभ केला. प्रारभी ते लोकांना औषधे देत. पुढे पुढे कृपादृष्टीने, विभूतीने किंवा केवळ स्पर्शाने असह्य रोग ते बरे करू लागले. वैद्यकशास्त्रदृष्ट्या विक्षिप्त वाटाव्यात अशा उपचारामधूनही जेव्हा रोगी बरे होऊ लागले, तेव्हा त्यांचा लौकिक सर्वत्र पसरू लागला. विश्वास देखील बसणार नाही, अशा चमत्कारांची नोंद त्यांच्या चरित्रात पानोपानी आलेली आहे. त्या असंख्य कथा केवळ अद्‌भुत आहेत, तर्कापलिकडील व मानवी प्रयत्नापलिकडील आहेत, यात शंका नाही. बाबा ज्या मशिदीत रहात, तेथे त्यांनी एक धुनी पेटविलेली होती. या धुनीतील उदी संबंधाने हजारो लोकांना विलक्षण अनुभव आले आहेत व येत आहेत.

श्रीसाईंच्या लीलांचा जेवढा आपण सूक्ष्मपणे अभ्यास करू तेवढी मती गुंग होते. अमरावतीचे बाबांचे एक भक्त दादासाहेब खापर्डे एकदा सहकुटुंब शिरडीला रहावयास गेले. प्रथम त्यांचे काही दिवस बाबांच्या सहवासात आनंदाने गेले. पुढे एक दिवस त्यांच्या मुलाला एकदम ताप चढला आणि त्याचे रूपांतर प्लेगच्या गाठीत झाले. दादासाहेबांच्या आणि त्यांच्या पत्नीच्या तोंडचे पाणी पळाले. सायंकाळची वेळ होती. बाबा नुकतेच वामकुक्षी उरकून लेंडीबागेकडे हळूहळू चालले होते. खापर्ड्यांची पत्नी धावत बाबांच्या पुढे गेली आणि त्यांची वाट अडवून गहिवरलेल्या आवाजाने हुंदके देत म्हणाली, "बाबा, आता काय करू? बाळाला प्लेग झाला," बाबा क्षणभर तिच्याकडे पहात उभे राहिले आणि धीर गंभीर शांत आवाजात वर आकाशाकडे पहात म्हणाले, "सर्व आकाश काळ्याकुट्ट ढगांनी भरले आहे, पण थोड्याच वेळांत सर्व ढग निघून जातील. आकाश निरभ्र होईल. सर्व काही ठीक होईल." इतके म्हणून बाबांनी भर रस्त्यात तेथे जमलेल्या जनसमुदायासमोर आपली कफनी वर केली तेव्हा बाबांच्या कमरेच्या वरच्या भागावर अंड्याच्या आकाराचे चार मोठे गोळे ठसठशीतपणे आलेले सर्वांना दिसले. त्या गोळ्यांकडे पहात बाबा पुनः सर्वांना उद्देशून म्हणाले, "भक्तांसाठी मला किती त्रास सहन करावा लागतो तो पहा. भक्तांचे दु:ख मला सोसावे लागते". खापर्ड्यांच्या मुलाचा ताप आणि प्लेगच्या गाठी बऱ्या झाल्याच, पण बाबांनी दाखविलेल्या चमत्कारांनी इतर लोकांच्या मनातील शंकांचे आपोआप निरसन झाले.

बाबा भक्तमंडळींकडून हक्काने दक्षिणा मागून घेत आणि तिचा उपयोग नेहमी योग्य त्या कार्यासाठी करीत. वारंवार लाकूडफाटा गोळा करीत आणि आपली पवित्र अखंड जळणारी धुनी सतत जळत ठेवीत. या जळणातून खाली पडलेली राख आपली उदी म्हणून बाबा सर्वांना निरोप घेताना प्रसाद म्हणून देत. बाबांच्या या विचित्र कृतीत अत्यंत गहनगूढ अर्थ भरलेला होता. या जगातील सर्व चराचर वस्तू नाशवंत आहेत. आपल्या अत्यंत प्रिय अशा हाडामासाच्या देहाचे देखील शेवटी राखेतच रूपांतर होणार आहे. आज दिसणारा आपला भव्य देह, आपले सौंदर्य, आपली बहुमोल

मालमत्ता इतकेच काय पण ज्यांच्यावर आपण प्राणापलिकडे प्रेम करतो,ते आपले आप्तइष्ट, सगेसोयरे वगैरे सर्व भावीकाळात नाश पावून शेवटी त्या सर्वांची राख होणार आहे.तेव्हा या नाशवंत वस्तूंवर जीवापाड प्रेम करण्यात आपण किती वेडेपणा करीत आहोत,याची जाणीव प्रत्येक भक्ताच्या हृदयात सदैव जागृत रहावी,म्हणूनच बाबा त्यांच्या हातावर प्रसाद म्हणून उदीभस्म ठेवीत असत. या जगात शाश्वत आणि निरंतर टिकणारे असे भस्म ब्रम्ह आहे आणि मनुष्यजन्मात येऊन आपण गुरूकृपेने त्या ब्रह्मज्ञानाची ओळख करून घेतली नाही,तर आपला जन्म व्यर्थ जाईल. पुन्हा पुनः जन्म घ्यावा लागून या जन्ममरणाच्या चक्रात आपला आत्मा असाच सुखदुःख भोगीत घुटमळत राहील. आपण एकटे आहोत. प्रत्येकाच्या प्रारब्ध भोगाप्रमाणे तो एकटाच जन्म घेतो आणि एकटाच मरण पावतो. आपल्या धर्मातील हे महान तत्वज्ञान बाबांच्या उदी प्रसादात गोवलेले होते आणि म्हणूनच बाबांच्या उदीचे महत्व त्या वेळेस लोकांना पटलेच, पण आज या क्षणीदेखील बाबांच्या हस्तस्पर्शाने पुनीत झालेल्या धुनीतील उदी म्हणजे भक्तांना अत्यंत बहुमोल असा ठेवा वाटतो. या उदीने अनेक भक्तांच्या शारीरिक व मानसिक व्यथा दूर करण्याचा अजब चमत्कार करून दाखविला आहे. सर्व विश्वातील सत्य आणि असत्य वस्तूंची योग्य कल्पना भक्ताच्या मनात रूजविण्याकरिताच श्री साईबाबांनी उदीचा आणि दक्षिणेचा मार्ग स्वीकारला. बाबा स्वहस्ताने प्रेमळ भक्तांच्या डोक्याला उदी लावत आणि मुक्त हस्ताने उदी भंडारा लुटण्याची परवानगी देत. त्या प्रसंगी भक्तांच्या अंतःकरणात आनंदाच्या लहरी उफाळून येत. स्वतः बाबादेखील अशा प्रसंगी स्वर्गीय आनंदात रममाण झालेले दिसत. आनंदाने त्यांचे हृदय इतके भरून येई की, प्रेमानंदाने ते आपल्या गोड सुरेल आवाजात गाऊ लागत, "रमते राम आयोजी आयोजी। उदीयांकी गोनिया लावोजी॥"

श्री साईबाबांनी कधी स्वतंत्र तत्वज्ञान सांगितलेले नाही. परंतु त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला ते ईश्वरावर श्रध्दा ठेवा व सबुरी (धीर) धरा,या दोन गोष्टींचा वारंवार उपदेश करीत असत. ईश्वरकृपाप्राप्ती ही बाह्यप्रयत्न साध्य गोष्ट नाही. ती दृढ, श्रध्दाळू भक्तांस सहजप्राप्त अशी गोष्ट आहे. स्थिरचित्त, अंतःकरणाची पवित्रता ज्याच्याजवळ आहे, तोच निष्ठावंत भक्त होऊ शकतो. निष्ठाच भक्तांना ईश्वराकडे प्रवाहित करते. त्यांचे आंतरिक जीवन उत्तम, उन्नत, उदात्त करते. आंतरिक जीवन प्रकाशमान होणे, हीच ईश्वरकृपा होय. ईश्वर ही व्यक्ती नाही, ती अनुभूती आहे. ती परिपूर्ण अनुभूती प्राप्त होण्यासाठी 'सबुरी' (धीर) धरली पाहिजे. ईश्वराचे सतत नामस्मरण, चिंतन, मनन, ध्यान याद्वारे भक्ताने आपला अहंकार नष्ट करावयाचा असतो. ईश्वर निजभक्ताचा अंकित आहे. तो भक्तप्रेमाला विकला गेला आहे. सतत सहृदय आनंदाने शरण जाऊन त्याचे जे भजन, पूजन, किर्तन करतात, त्यांना तो निश्चित करून पावतो, पूर्ण समाधानी करतो. खऱ्या भक्तास ईश्वरी सत्तेची अनुभूती चराचरामधून अखंडितपणे येत राहते. त्यामुळे तो स्वतः प्रेममय होतो. ही परिपूर्ण प्रक्रिया घडून येणे, म्हणजे ईश्वरीय दिव्य जीवन जगणे. त्यासाठी सबुरी धरता आली

पाहिजे, सद्‌गुरू व संतवचनावर दृढ श्रध्दा ठेवता आली पाहिजे. श्री साईबाबांनी जीवनभर दयाशील होऊन हाच अनुग्रह लहानथोर सर्वांवर केला.

श्रध्दा व सबुरी या दोन तत्वांचा अवलंब केल्याने श्रीसाईबाबांच्या सर्व भक्तांना सुख, समाधान, धन प्राप्त होते, हे कदापिही खोटे ठरणार नाही. श्री साईबाबांच्या चरणी लीन झाले असता बाबा आपल्या भक्तांना आजन्म कमी पडू देणार नाहीत. माझी शिर्डीला जाण्याची व बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्याची लहानपणापासूनची इच्छा होती,ती बाबांनी १९८४ साली पूर्ण केली. तेव्हापासून मी वर्षातून किमान दोन वेळा तरी शिर्डीला जाऊन श्रीसाईबाबांच्या समाधीचे दर्शन घेण्याचा संकल्प केला व तो आजपर्यंत तरी श्रीसाईबाबांच्या कृपादृष्टीने कोणत्याही प्रकारची अडचण न येता पूर्ण होत आलेला आहे. यापुढील माझ्या उर्वरित आयुष्यात देखील अंतापर्यंत पूर्ण होत राहील, असा माझा पूर्ण विश्वास आहे. बाबांची माझ्यावर लहानपणापासून कृपादृष्टी आहे. मला अनेक अडचणींतून त्यांनी सोडविले आहे व सोडवित आहेत. आणि म्हणूनच मी कोणतीही गोष्ट त्यांच्या कृपादृष्टीने व आशीर्वादाने करीत असल्यामुळे त्यामध्ये मला बाबा निश्चित यश देतात. अशीच कृपादृष्टी याही पुढे राहो, ही श्री साईचरणीं प्रार्थना.

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

**— साईनंद**

शुक्रवार दिनांक २-२-१९१२

मी काकड आरतीसाठी उठलो आणि त्यानंतर पंचदशीचा वर्ग आयोजित केला. परंतु पंचदशीच्या विषय वस्तूवर बोलून त्यातील पाठांवरच वाचन सुरू केले. या विषयावरची ही सर्वोत्तम रचना होय. या विषयावर अन्य दुसरी कोणतीही रचना तिचे स्थान घेऊच शकणार नाही. त्यानंतर मी साईमहाराज ते बाहेर पडण्यापूर्वी त्यांचे दर्शन घेण्यासाठी म्हणून गेलो व त्यांचेबरोबरच साठे वाड्यापर्यंत गेलो. त्यानंतर दुपारच्या आरतीला हजर राहिलो. आज अमरावतीहून मला एक पत्र आले. त्यात मी पुन प्रॅक्टिस करावी असे सुचविले आहे. मी माधवराव देशपांड्यांच्या वतीने साई महाराजांच्या कानावर ही गोष्ट घालण्यास सांगितले आणि मी तसे करावे असा निरोपही त्यांनी पण मला कळविला

शनिवार ता. ३-२-१९५२

मला आज सकाळी उठावयास उशीर झाला आणि त्यामुळे सुस्तीची लाट आल्यासारखे वाटत होते. बापूसाहेब जोगांनाही उशीर झाला होता. त्यामुळे श्री. दिक्षित पण आणि जवळजवळ प्रत्येक जणच उशीर करीत होता.

आपली प्रार्थना संपवल्यावर मी मशिदीत गेलो परंतु साईबाबांनी मशिदीत न जाता उदी घे असे सांगितले. मी त्याप्रमाणे केले. नंतर मी बापूसाहेब जोगांच्या खोलीवर गेलो व तिथे उपासनी आणि श्रीमती कौजलगी यांचेबरोबर पंचदशीच्या पाठांचे वाचन केले. आम्ही मध्यान्ह होईपर्यंत वाचत बसलो आणि नंतर साईबाबांच्या आरतीला गेलो. त्यानंतर आम्ही दुपारचे भोजन घेतले. मी थोडा वेळ नंतर विश्रांती घेतली व त्यानंतर दासबोधाचे वाचन करीत बसलो. दुपारी श्री. दिक्षितांनी रामायणाचे वाचन केले. श्रीसाईबाबांचे एक स्थानिक भक्त गणोबा आबा रामायण ऐकण्यास आले होते. त्यांना रामायणातील बरीचशी पदे माहित आहेत इतकेच नव्हे तर काही मुखोद्‌गतही आहेत. साईबाबा सायंकाळच्या रपेटीस बाहेर जाताना ते त्यांच्या दर्शनास गेले. माधवराव देशपांडे यांनी सांगितले की आपण आज साईबाबांच्या जवळ आपणास अमरावतीस परत जाण्याच्या बाबतीत विषय काढला होता. त्यावर साईबाबा उत्तरले की आपण स्वतः एक वयोवृध्द व्यक्ती आहात व अशा परिस्थितीत आपल्या अब्रूला जरासुध्दा धक्का लागता कामा नये अशी इच्छा व्यक्त केली. याबाबतीत आवश्यक ती स्वीकृती त्यांनी दिली. साईबाबा म्हणाले, सुमारे दोनशे व्यक्ती शेजारच्याच शहरात गेल्या व तिथे त्यांनी दंगामस्ती केली व स्वतःला अटक करवून घेतली. त्या दंगेखोरात माधवराव देशपांडे यांचे नाव निष्कारण गुंतविले गेले. आणि मग त्यामुळे खूपच त्रास झाला. रात्री वाड्यातील आरती आणि शेजारती पण झाली. मी दोन्ही आरत्यांना हजर होतो. भीष्माने आज भजन केले नाही पण त्याऐवजी भागवतातील पाठांचे वाचन केले. रात्री नित्याप्रमाणे दिक्षितांनी रामायणाच्या पाठांचे वाचन केले.

रविवार ता. ४-२-१९१२

आज सकाळी मी लवकर उठलो. काकड आरतीस हजर राहिलो आणि नंतर माझी प्रार्थना संपविली. मी आंघोळ करीत असताना दोन सद्‌गृहस्थ नारायणराव बामण गावकरांची चौकशी करीत आले. ते लिंगायत शास्त्री होते. शिवानंद शास्त्री या नावाने थोरला ओळखला जात असे. त्यांच्याबरोबर दोन महिला पण आहेत. त्या स्त्रिया ब्राम्हण आहेत. थोरलीला ब्रम्हानंद बाई या नावाने हाक मारली जाई. सुमारे तीन वर्षापूर्वी तिला नाशिक येथे एक लिंगायत स्त्री भेटली तिचे नाव नित्यानंद बाई. ती एक प्रगतीशील योगिनी होती. आणि तिला या ब्रम्हानंद बाईकडून सूचना-मार्गदर्शन मिळत असे. आम्ही सर्वांनी साई महाराजांना ते बाहेर जाताना आणि पुन्हा बाहेरून मशिदीत परत येताना पाहिले. ब्रम्हानंद बाईंनी त्यांची पूजा केली व उत्कृष्ट प्रकारे दोन आरत्या म्हटल्या. दुपारच्या आरतीनंतर मी भोजन घेतले, आणि

अमळसा विसावलो. नंतर दिक्षितांचे पुराण वाचन झाले व त्यानंतर आम्ही साईबाबांना ते सायंकाळचे रपेटीस निघताना त्यांचे दर्शनासाठी गेलो. रात्री वाडा आरतीनंतर दिक्षितांनी पुराणाचे वाचन व त्यानंतर भीष्मांनी भजन केले. महिलांपैकी ब्रम्हानंद बाईने व तिच्या बरोबरच्या सोबत्याने फारच सुंदर गाणी म्हटली. त्यांच्या भजनाने व आम्ही खूपच सुखावलो. शिवानंद शास्त्री पण गायिले. शास्त्री व त्या महिला नाशिकहून आल्या होत्या. ते तेथील कायमचेच रहिवासी आहेत.

सोमवार दि. ५-२-१९१२

आज सकाळी मी प्रार्थना संपविली नाही तोच नागपूरहून राजारामपंत दिक्षित आले. ते काकासाहेब दिक्षितांचे थोरले बंधू. ते साईसाहेबांच्या दर्शनास गेले. मी माझ्या वर्गास गेलो. तिथे पंचदशी आणि अमृतानुभवातील ओव्यांचे वाचन बापूसाहेब जोग, उपासनी शास्त्री, शिवानंद शास्त्री, ब्रम्हानंद बाई आणि इतर यांचे बरोबर केले. आम्ही साईसाहेबांना ते बाहेर जाताना आणि बाहेरून पुन्हा ते मशिदीत परतताना पाहिले. त्यांची आज मजवर कृपा होती. ते मजबरोबर काही मोजकेच शब्द बोलले. आरतीनंतर त्यांनी सर्वांनाच जाण्यास सांगितले. आणि नंतर माझ्या न ावाने मला हाक मारून आळस टाकून देऊन सर्व स्त्री मुलांकडे लक्ष देण्यास सांगितले.

सौ. लक्ष्मीबाई कौजलगीला त्यांनी आज एक पावाचा तुकडा दिला व राधाकृष्ण आईबरोबर तो खाण्यास जाण्यासाठी म्हणून सांगितले. खरोखरच तिचे हे सद्भाग्य होय. ती यानंतर सुखी होईल. मी आज शिवानंद शास्त्री, ब्रम्हानंद बाई आणि त्यांचेबरोबर असलेल्या सर्वांना आमच्याबरोबर दुपारच्या भोजनासाठी येण्यास म्हणून आमंत्रण दिले. भोजनानंतर मी काही मिनिटे लवंडलो. त्यानंतर दिक्षितांनी रामायणाचे वाचन केले. व त्यानंतर आम्ही साईबाबा सायंरपेटीस निघताना त्यांचे दर्शनास गेलो. वाडा आरतीनंतर शेजारती झाली आणि रात्री ब्रम्हानंद बाईंनी सुरेख भजन केले. मध्यरात्रीनंतरही ते चालूच होते. माझा जाण्याचा विषय तसाच राहिला. कदाचित उद्या त्याच्यावर विचार होईल.

# श्रीसाईबाबांची गुरुभक्ती

– श्री. चकोर आजगांवकर, एम्. ए.
वाय ११/१७०, सरकारी वसाहत,
वांद्रे (पूर्व), मुंबई – ५१.

श्रीबाबांच्या तत्वज्ञानाचे सार श्रीगुरूंच्या भक्तीत होते. श्री साईचरित्रात बाबांनी जी चार शिष्यांची कथा सांगितली आहे, तिच्यात एकच अर्थ सामावलेला आहे, तो म्हणजे ज्ञान, कर्म, योग या सर्व मार्गाहून श्री गुरुभक्तीचे महात्म्य सर्वात अधिक आहे.

**मी विनम्र झालो विकल अति शरणार्थी**
**गुरूदेव प्रकटले एकाएकी पुढती**
**पुरविली माझिया तृषार्त मनीची आर्ती**
**तेजात बुडविला हृदयातिल अंधार।**
**अर्पिला माझिया गुरूंच्या चरणी देह**
**मन, बुध्दी आणिक अहंकार संदेह**
**बांधिली मनाची मोट शमविला दाह**
**सच्चिदानंद मी उरलो विश्वाकार।।**
**(श्री साईगीतायन)**

श्रीगुरूंना प्रेमभावाने शरण गेल्यावर, मन, बुध्दी, देह, अहंकार यांचे गुरूंच्या चरणी समर्पण केल्यावर श्री गुरूदेवांनी त्यांच्यावर कृपा केली व सच्चिदानंद पथावर त्यांना आरूढ केले. ही गुरूशरणता, गुरूसमर्पणभाव बाबांच्या "तू मजकडे पहा, मी तुझ्याकडे पाहीन" या त्यांच्या वचनात भरलेला आहे. गुरूमूर्तीचे ध्यान गुरूगीतेने प्रसादिले आहे. तेच गुरुध्यान बाबा शिकवितात. हे नाम स्मरणाहून मोठे तप आहे.

श्रीबाबा आपल्या पूर्णावतारातही असेच सांगतात– आपल्या कबीर अवतारातील अमृतमय वाणीत बाबा सांगतात–

**"तो सद्‌गुरू मजला मोहितसे**
**मनभ्रमरा जो घरि आणितसे."**

भटकणाऱ्या मनाचे भ्रमण थांबवून श्रीगुरू त्याला स्वगृही आणतात व स्वपदी स्थिर करतात. असे श्रीगुरू हे किमयागार आहेत. ते थोर लाघव करणारे जादूगार आहेत.

**"घरात होते अखंड मीलन**
**घरीच मुक्ती, घरीच बंधन**
**काही न गवसे घरास त्यागुन**
**तो अलख गुरू मज ओढीतसे।।"**

घरातील आपल्या मूर्तीमय प्रतिमामय अस्तित्वातून तो अलखनिरंजन गुरू भक्ताला आपल्या स्वरूपाकडे खेचून घेतो, असे कबीर म्हणतात.

**"सहजशून्यता व्यापितसे मन**
**सहजसमाधित होतो उन्मन**
**आत्मज्योती येते उजळुन**
**ते परमनिरंजन प्रगटतसे॥"**

गुरूमीलनाच्या सहजतादात्म्यात मन उन्मन बनून सहजसमाधीवश होते व परमनिरंजन ज्योती प्रगट होते, असे बाबांचा नाथपंथ वा कबीर पंथ सांगत असतो.

**"प्रेमविरक्तित गुरू समरसती**
**अनहत वेणू-गुरू वाजविती**
**सकळ सिध्दी मग घरी नांदती**
**ठायीच सर्व गुरू देत असे॥"**

गुरूंच्या प्रेमात संसाराची विरक्ती भरलेली असते. एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत. गुरूंच्या कृपेचा वर्षाव झाला की सर्व सिध्दी भक्ताच्या मागेपुढे नांदतात **"तयाच्या मी मागे पुढे। चोहीकडे उभाचि॥"** असे साईबाबा सांगतात. जेथे गुरू तेः सिध्दी।

एकदा श्री गुरूला जवळ केले की कल्पवृक्ष हाती आलाच. श्री कबीरांनी स्वशब्दात वर्णिलेल्या गुरूमहिम्यात आपण सारे श्रीबाबारूप कल्पवृक्ष पाहू या व त्याच्या छायेत वसूं या.

ध्यानमूलं गुरोमूर्ति (श्री गुरूगीता)

## लेखक - कवींस निवेदन

**'श्री साईलीला' मासिकाकरिता साहित्य पाठविताना लेखक - कवींनी पुढील गोष्टींची दक्षता घेणे आवश्यक आहे.**

*** अंतर्देशीय पत्रावर, पोस्टकार्डवर लेखन करू नये.**

***आमच्याकडे आलेल्या कवितांचे प्रमाण खूपच असल्याने, पुढील सूचना मिळेपर्यंत, कृपया, कविता पाठवू नयेत.**

*** सुवाच्य अक्षरात, कागदाच्या डाव्या बाजूस भरपूर समास सोडून, दोन ओळींच्या मध्ये पुरेशी मोकळी जागा ठेवून लिखाण असावे, ते पाठपोठ असू नये, शक्यतो टंकलिखित असावे, लेखनासाठी वापरात येणारा कागद जीर्ण-विजीर्ण, टाकाऊ असू नये.**

*** हयात असलेल्या संतांविषयीचे लेख, सामान्य दर्जाचे अनुभव पाठवू नयेत.**

*** अभ्यासपूर्ण, तर्कशुध्द, मीमांसक व वैचारिक स्वरूपाच्या लेखांना प्राधान्य दिले जाईल.**

**- का. सं.**

# – श्री सद्‌गुरू महिमा –

– श्री. आंतोन शायेर फर्नांडीस
मुक्काम - उभादांडा, चमणकर वाडी,
पोष्ट - वेंगुर्ला, ता. वेंगुर्ले,
जि. - सिंधुदुर्ग - ४१६ ५१६.

"विवेका ऐसा गुरू। चित्ता ऐसा शिष्य चतुरू॥
जीवा ऐसा मित्र उदारू। भुवनत्रयीं मिळेना॥१॥"

आत्मविचारासारखा गुरू, मनासारखा चतुर शिष्य आणि जीवासारखा उदार मित्र त्रिभुवनात सुध्दा मिळावयाचा नाही. "सबसे सुनना और दिलसे करना" ही म्हण प्रसिध्दच आहे. सल्लामसलत सर्वांची घ्यावी, परंतु जे काम करावयाचे, ते आपल्या स्वतःच्याच विचाराने करीत असावे. स्वतःचाच विचार जितका उपयोगी पडतो, तितका दुसऱ्याचा विचार कधीही उपयोगी पडत नाही.

"माप आणि गोणी। तुका म्हणे रिती दोन्ही॥"

हरिदास आणि पुराणिक यांची माया आणि ब्रहम ही काथ्याकुट ऐकता ऐकता कान किटून जातात. परंतु उपयोग काय? पुराणिक बुवा व कथेकरी बुवा हे स्वतःच संसारात गटांगळ्या खात असतात, आणि इतरांस संसार हा निरासार असल्याचे डोळ्यांत आंसवे आणून सांगतात. त्याचा उपयोग काय! तुकोबा रायांनी वर म्हटले आहे, तशीच फलश्रुति होते.

विषयाची गोडी सुटत नाही, संसाराची व मायापाशाची बेडी तुटत नाही आणि हृदयात वतनदार होऊन बसलेला स्वार्थ काही हालत नाही. ब्रहमज्ञान पाहिजे असेल, तर विषयांचा विट आला पाहिजे, संसाराची आसक्ती दूर झाली पाहिजे आणि हृदयात स्वार्थाचा लेशही राहता उपयोगी नाही. ब्रहमज्ञान मिळवायचे असेल, तर त्याला मनाची चांगली तयारी पाहिजे.

मी ज्ञाता आहे, असे जो म्हणतो, तो मूर्ख होय. कल्पनातीत वस्तूची कल्पना करणारा कोण?

"श्रुती न्याय मीमांसकें तर्कशास्त्रें। स्मृती, वेद, वेदांत वाक्यें विचित्रें॥
स्वयें शेष मोनावला स्थिर पाहें। मना सर्व जाणीव सांडून राहें॥"

वेद, न्याय, मिमांसा, तर्कशास्त्र, स्मृती, वेदांतील भिन्नभिन्न वाक्यें ह्यांची तरी ब्रह्मज्ञानाविषयी एकवाक्यता कोठे आहे. फार काय सांगावे, पण प्रत्यक्ष शेषसुध्दा सांगता सांगता थकला आणि मौन धरून बसला. ह्याकरिता हे मना, तू आपला मीपणा कशाला मिरवतोस? तो सोडून दे. अहंता, अहंपणा, अहंकार हाच गोत्यात घालणारा आहे, असे समर्थ रामदास सांगतात.

"जरी वेदवेदाङ्‌ग अध्ययन। केले श्रुतिशास्त्र पारायण॥
गुरूकृपेवीण नाही ज्ञान। इतर तो शीण केवळ॥ श्री साईसत्‌चरित्,अध्याय ३२, ओवी १७.

आपण चारी वेद, शास्त्रें यांचे अध्ययन केलें, पुराणे यांचा अभ्यास केला, सर्व ग्रंथांचे पारायण केले, तरी गुरू उपदेश - सद्गुरू कृपा झाल्याशिवाय आपल्याला कोणतेही पक्के 'ज्ञान' मिळत नाही.

ज्याला जो देव आवडतो, त्याची तो पूजा करीत असतो. परंतु खरा देव कोण? ह्याचा कोणी विचार करीत नाही. जगामध्ये देव शोधू लागलो, तर देव कोट्यावधी आहेत. परंतु ज्याला, ज्या देवाच्या भक्तीची आवड उत्पन्न होते, त्याचीच भक्ती त्याला प्रिय वाटते. खरा देव आहे, तो सद्गुरू शिवाय कळत नाही.

तिन्ही लोक जेथुनि निर्माण झाले।
तया देवरायासी कोणही न बोले।
जगीं थोरला देव तो चोरलासे।
गुरूवीण तो सर्वथाही न दिसे॥

ज्याच्यापासून हे त्रैलोक्य उत्पन्न झाले, त्या देवाधिदेवाला कोणीच विचारीत नाही. खरोखर सर्व ब्रम्हांडामध्ये जो श्रेष्ठ देव आहे, तो तर दडूनच बसलेला आहे. तो सद्गुरूशिवाय दिसावयाचा नाही. मग सद्गुरू तरी कोण? भलत्यालाच सद्गुरू समजू नये. कारण पुष्कळ लोक ढोंगी असतात.

"गुरू पाहातां पाहातां लक्ष कोटी।
बहू साल मंत्रावळी शक्ति मोठी।
मनीं कामना चेटकें शाश्वत माता।
जनीं व्यर्थ रे तो नव्हे मुक्ति दाता॥"

गुरूच शोधावयास लागलो, तर लक्षावधी नव्हे, कोट्यावधी सुध्दा दृष्टीस पडतात. पुष्कळांपाशी नाना प्रकारचे मंत्र असतात. त्यांचे सामर्थ्यही मोठे असते. परंतु त्यांच्या पोटामध्ये आशा भरलेली असते. ते नाना प्रकारची चेटके करतात. किमया करून दाखवितात. असे जगामध्ये अनेक-प्रकारचे गुरूदृष्टीस पडतात. परंतु अशा प्रकारचे गुरू सारे व्यर्थ होत. आपणास मुक्ती देणारा गुरू, त्यापैकी कोणी एकही नाही. मग सद्गुरू असावा तरी कसा?

भगवद्गीता, अध्याय १४ व्या च्या शेवटी अर्जुनाच्या प्रश्नाला श्रीकृष्ण परमात्मा उत्तर देतात. हे अर्जुना! जो मनुष्य अत्यंत एकाग्र चित्ताने, निष्कामपणाने, निरिच्छ हेतूने माझी, म्हणजे सद्गुरूची भक्ती-सेवा करतो, तोच या मायारूपी जाळ्याच्या पलिकडे जाऊ शकतो. याशिवाय ही गहनमाया त्याला तरून जाता येणार नांही. "हाच सद्गुरू भक्तीचा सोपा उपाय आहे."

मानवजन्मास आलेल्या स्त्री-पुरूषांनी आपले सर्व आयुष्य अखेरपर्यंत मजेत, चैनीत फुकट न घालविता विवेक, वैराग्य व सद्गुरूकृपेचा लाभ घेऊन सद्गुरूकडून जन्माचे सार्थक करावे.

धन-धान्य, पुत्र-दारा। परिग्रहाचा जया पसारा।
देहबुध्दिमुळे या थारा। तया आधारा तो वर्ते॥२५॥ श्री साईसत्चरित, अध्याय ३२, ओवी २५.

धनधान्य, वस्त्र, निवारा, पुत्र, दारा (पत्नी) आदी वैभवाचा रमणीय मनमोहक संसार आपल्याला चांगला वाटतो. या संसारामध्ये अखेरपर्यंत आनंद मानून राहतो. देहबुध्दीमुळे मनुष्य असा वागतो. त्याला खरे समाधान नसते. तो मनुष्य वर वर समाधान दाखवित असतो. अशा मनुष्यास बध्द असे म्हणतात. उत्तम मानव जन्मास येऊन मरेपर्यंत अज्ञानी राहातो. जेव्हा पक्क्या सद्‌गुरूशी भक्ताची भेट होते, तेव्हाच हा निःसार, नश्वर संसार हा ''मृगजळ'' आहे, असे वाटते.

श्रीकृष्ण परमात्म्याने संसाराला सागराची उपमा दिली आहे. या संसाररूपी समुद्राच्या काठावर दूर उभे राहून, या संसाररूपी समुद्राची गंमत पाहाण्यात त्यांना आनंद वाटतो. जो प्रापंचिक मनुष्य या संसाररूपी समुद्रात पडून गटांगळ्या खातो, त्याच्या नाकातोंडात पाणी जाते. त्याला या संसाररूपी समुद्राचा काय आनंद!

संत हे या संसाररूपी समुद्रापासून दूर उभे राहून खरा आनंद लुटीत असतात. संसारापासून अलिप्त राहाण्याची, ही जी संताची वृत्ती, ती अंगी मुरल्याशिवाय खरा आनंद नाही. कमलपत्राप्रमाणे अलिप्त राहा, असे त्यांनी म्हटले आहे. संत उंच अशा पर्वत शिखरावर उभे राहून तेथून ते खाली संसाराकडे पाहात असतात. तेथून त्यांना हा संसार क्षुद्र वाटतो. भगवान श्रीकृष्ण म्हणतात, ''तुम्हीही वर चढून पहा. म्हणजे हा अफाट पसारा क्षुद्र वाटेल. म्हणून तुम्ही संसाराची चिंता करू नका. तुमच्या निःस्वार्थ भक्तीमुळे परमात्मा तुमच्या संसाराची काळजी घेईल. प्रथम तू मुक्त हो. पुढचे मागचे पाहू नको. तुझी नैतिक शक्ती वाढव. काम, क्रोध, लोभ झिडकारून टाक. वेळोवेळी या संसारात व परमार्थात ज्ञानाने व भक्तीध्यानाने पूर्ण विचार कर,'' असे भगवंतांनी गीतेत सांगितले आहे. त्याप्रमाणे यत्न करावा व निष्काम भक्तीने वागावे.''

पूजक जेथवर साकारू।
देहधारीच आवश्यक गुरू॥
निराकारास निराकारू।
हा निर्धार शास्त्राचा॥१०॥ साईसत् चरित्र, अध्याय ११, ओवी १० वी.

गुरू हा निराकार असावा की आकारी, सगुण की निर्गुण असावा, हे तत्व भक्ताच्या मनावर पूर्ण बिंबलेले असावे. प्रथम आपण आपल्या भोवती असलेल्या गुरूच्या अस्तित्वाकडे लक्ष पुरवावे.

अगदी पहिल्या प्रथम परमेश्वराची मूर्ती म्हणजे आई! श्रुती म्हणते ''मातृदेवो भव, पितृ देवो भव, आचार्य देवो भव, गुरूर्देवो भव'' आई तू वत्सलतेच्या रूपाने परमेश्वराची मूर्ती उभी असते. आईच्या सेवेने मोक्ष मिळणे, अशक्य नाही. आई, बाप, शिक्षक आणि गुरू यांना आपण देवाच्या ठिकाणी पूज्य मानावे. देवाचे सर्व कार्य व मार्गदर्शनाचे कार्य, हे ईश्वराने या माध्यमावरच सोपविलेले आहे. ईश्वराला आई या शब्दानेच, या नावानेच हाक मारावी. आई शब्दाहून दुसरा शब्द-उच्च शब्द आहे कोठे? मग पिता, गुरू यांच्या ठिकाणी ईश्वर पहा. पिता हा मुलाचे पालन पोषण करतो, गुरू आपणाला शिक्षण देतो, पशुवृत्तीचा आपणास मनुष्य करतो. गुरू हा स्नान, संध्या, ध्यान, भजन, शिक्षण व योग्य आचरण इ. ची. शिकवण देतो. संत हे आपणास

सत्संग समागम, ईश्वर नामस्मरण, शेजारधर्म, समाजकार्य, देशकार्य इ. गोष्टी शिकवितात. संत हे आपणास मोक्षप्राप्ती करू देतात.

एकलव्याने मातीच्या पुतळ्याला गुरू मानले व आपले इच्छित साध्य केले, त्याने धनुर्विद्या मिळविली. ध्रुवबाळाने कठोर तप केले व ईश्वरालाच गुरू मानले. तसेच आपण श्रीसाईबाबांनाच सद्‌गुरू स्थानी पूज्य मानावे. आपण साईबाबांस प्रत्यक्ष पाहिले नसले तरी त्यांच्या विषयीचे भक्तांनी लिहिलेले अनुभव, कथा, दृष्टान्त व स्वप्न अनुभव ऐकलेले, वाचलेले आहेत. त्या साईलीलांवर आपण पूर्ण विश्वास ठेवावा कथा, किर्तने वाचून, ऐकून मनात दृढ भक्तीभाव ठेवून श्री साईबाबांना सद्‌गुरू स्थानी आदराने पाहावे, एका गुरूच्यापुढे ज्यांना कशाचीही पर्वा नाही, अशी दृढ श्रध्दा सद्‌गुरूवर असली पाहिजे. तरच आपणावर सद्‌गुरू प्रसन्न होतो. ज्याची निष्ठा, प्रेम गुरूपायी अढळ आहे, जो गुरूवचनांवर धीर धरतो, सबुरी धरतो, त्यालाच सर्व गोष्टींचा लाभ होतो. पारमार्थिक, आध्यात्मिक अभ्यासात गुरूचरणी अढळ निष्ठा, प्रेम असले पाहिजे, तरच आपणाला सर्व गोष्टी साध्य होतात.

संतांचे अस्तित्व त्यांच्या देहात नसून वचनांत आहे. श्री साईबाबांची वचने ही साईभक्तांना मार्गदर्शक आहेत. वचनांवर आपण चिंतन, मनन करावे. त्या वचनांवर विश्वास ठेवून तसे आपण आचरण करावे. मानाची अपेक्षा करू नये. आणि फारसा वेदान्त बोलू नये. तोंडापर्यंत आले तरी दाबून टाकावे. संतांची आज्ञा (वचन) प्रमाणं मानणे, हेच प्रचिती येण्याचे साधन आहे. तेल व वात असल्यावर दिवा लावायला जसा वेळ लागत नाही, त्याचप्रमाणे आपली भूमिका थोडी तयार झाल्यावर सत्संगतीचा परिणम व्हायला वेळ लागत नाही.

श्रीसाईबाबा परमात्मा स्वरूप होते, आहेत. संत, सद्‌गुरू हे सारे ईश्वर स्वरूपच होत. साईबाबा हे स्वतःच्र "सद्‌गुरू" योग्यतेचे होते, तरीसुध्दा कोणताच अधिकार व मोठेपणा ते स्वतःकडे घेत नसत. ते स्वतःला परमेश्वराचा "सद्‌गुरूचा" बंदा सेवक म्हणवून घेत. मी अल्लाचा बंदा सेवक आहे व त्याचे स्मरण मी करतो, असे ते म्हणत. साईबाबा आपल्या भक्तांना आशीर्वाद देताना म्हणत असत की, "अल्ला भला करेगा!" आपल्याला अल्लाचा आशीर्वाद पूर्ण आहे व त्याचेच कृपेने भक्तांची संकटे दूर होतात, त्यांचे कल्याण होते, असे बाबा म्हणत असत.

"श्रध्दा व सबुरी" हा मंत्र आपणास बाबांनी दिला. हा मंत्र सर्व श्रेष्ठ आहे. आपण हा मंत्र समोर ठेवावा. एकदा श्रध्दा, एकदा सबुरी असे पठण केले, तर निश्चितच आपणास जीवनाचे सार्थक झालेले दिसेल. आपण साईभक्तांनी श्री साईबाबांना "सद्‌गुरू" स्थानी मानून त्यांना पूर्ण शरण जावे. त्यांचे अनुकरण करावे, श्री साईसत्‌चरित्राचा मनःपूर्वक अभ्यास, मनन, चिंतन केले तर श्रीसाई सद्‌गुरूची आपल्यावर पूर्ण कृपा झाल्याशिवाय राहाणार नाही. तसेच साईकृप्रेने आपण आपला

जीवनपथ यशस्वी रितीने, आलेल्या संकटांना पार करून पुढील मार्ग क्रमू शकू, अशा तऱ्हेने आपल्या जीवनाचे सार्थक करता येईल.

अशा परब्रहमस्वरूप श्री सद्गुरू श्रीसाईबाबांना माझे शतशः प्रणाम!

॥ॐ श्री साई समर्थ॥ श्री सद्गुरूसाईनाथाय नमः॥

# शिरडी समाधी मंदिरातील श्री साईबाबांची पहिली काकड आरती

— श्री. सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक, श्रीसाईलीला
श्रीसाईबाबासंस्थान, शिरडी

श्रीसाईबाबांचे संस्थान असलेल्या शिरडी या जगप्रसिध्द तीर्थक्षेत्री दररोज पहाटे चार वाजता एक चांगला जोरदार आवाजाचा भोंगा वाजविला जातो. हा भोंगा मुख्य समाधी मंदिरालगत असलेल्या एका खोलीतून, जिथे श्रींच्या अंगावरील वस्त्रांचा जाहीर लिलाव व विक्री केली जाते, त्या लगतच असलेल्या खोलीतून विद्युत बटन दाबून वाजविला जातो. हा भोंगा वाजविण्याचा मुख्य उद्देश असा की, या भोंग्याच्या सूचनेवरून संस्थान कर्मचारी वर्ग जागा व्हावा, तसेच दर्शनार्थ आलेल्या भक्त मंडळींना पण जाग येऊन ती उठून त्यांना आपली सकाळची नित्य कर्मे उरकून श्रीबाबांच्या पहिल्या काकड आरतीला येणे सोयीच व्हावे.

पहाटे ठीक ४-३० वाजता समाधी मंदिराच्या मुख्य दरवाजाजवळ समाधी मंदिरातच ज्या कर्मचाऱ्यांना सेवा आहे, असे कर्मचारी येऊन थांबतात. नंतर मुख्य पुजारी व एक सेवक सुरक्षा विभागाकडून समाधी मंदिरास रात्री लावलेल्या कुलुपाची चावी घेऊन येतात व ती चावी मंदिर प्रमुख व्यवस्थापकांकडे दिली जाते.

बरोबर ४-४५ वाजता श्रींच्या समाधी मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार उघडले जाते, व फक्त सेवकवर्गच आत प्रवेश करतो. त्यांनी प्रवेश केल्यावर प्रथम समाधी मंदिरातील लोखंडी जाळीचा दरवाजा, नंतर मंदिरातील आतील दरवाजे व नंतर मागील दरवाजे क्रमशः उघडले जातात. मंदिरात सर्वत्र विद्युत दिवे लावले जातात. नंतर तळघराचा दरवाजा उघडला जातो. या दरवाजाचे दार समाधी मंदिरातच, महिला भक्त मंडळी जिथे उभी राहतात तिथे आहे. तळघरातील 'स्ट्राँग रूम' उघडून श्रींची नित्य पूजेची चांदीची भांडी, देवाचे दिवसभरातले घालावयाचे सोन्या-चांदीचे दागिने, मुकुट मौल्यवान वस्त्रे ही सर्व व्यवस्थित मोजून काळजीपूर्वक ती सर्व पूजा कोठीत आणून

ठेवली जातात. या तळघरात फक्त जबाबदार सेवेकऱ्यांनाच प्रवेश आहे. इतरांना प्रवेश निषिध्द आहे. तसेच कोणत्याही भक्ताला तळघरात प्रवेश दिला जात नाही.

येथवर पहाटेचे पाच वाजलेले असतात. गुरूस्थानाबाहेरचा सुरक्षा सेवेकरी पाचचे टोले देतो व त्या टोल्याबरोबरच ध्वनी तबकडीवरील तीन छानदार गाणी एका मागोमाग एक भक्तांना ऐकविली जातात. या तबकड्या समाधी मंदिराच्या बाहेर न्यानेच वाढविलेल्या दालनाच्या उजव्या अंगास असलेल्या संगीत खोलीतून लावल्या जातात. तबकडीवरचे पहिले गाणे—

१) उठा उठा हो सकळ जन....
२) घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरूणोदय झाला ..... ही भूपाळी
३) ओम जय जगदीश हरे .... हे भजन

ही गाणी चालू असतानाच श्रीमूर्ती व समाधी यांचे सभोवती लावलेली मच्छरदाणीची फक्त पुढील दोन टोके सोडून ती वरती अडकवली जातात. मंदिरातील गायक सेवेकरी तबला-पेटीच्या वाद्यांची योग्य ती तयारी करतात. इतर सेवेकरी स्त्री-पुरूष भक्त समाधी मंदिरात उभे रहाण्याच्या जागी मर्यादा म्हणून साखळ्या-दोरखंड लावतात. मधली जागा फक्त मुख्य पुजारी, सेवेकरी व इतर सहाय्यक पुजारी नि तबला पेटीची साथ करणारे वादक व ध्वनीक्षेपकावरून सूचना देणारे मंदिर प्रमुख यांच्यासाठीच संपूर्णपणे मोकळी ठेवली जाते. समाधी मंदिरात सर्वत्र विजेच्या दिव्यांचा चकचकाट असतो पण त्याशिवाय चार गॅसच्या बत्या पेटविल्या जातात. त्यापैकी दोन समाधी स्थानाच्या उभय बाजूस असतात. अलिकडे विजेचे दिवे पटकन् काही वेळा पुरते जातात. हे प्रकार वेळोवेळी होऊ लागल्याने ही पर्यायी गॅसबत्यांची तरतूद करावी लागते.

येथवर ५ वाजून १० मिनिटे होत असतात; व बाहेर प्रतिक्षा करीत असलेल्या भक्तमंडळींना समाधी मंदिरात घेतले जाते. पहाटेसच भक्तांना, भगवे वस्त्र ल्यालेल्या श्रीमूर्तीच्या मुखकमलाचे दर्शन घडते व त्यामुळे ते कृतकृत्य होतात. काय आश्चर्याची गोष्ट आहे पहा! रात्री शेजारतीच्या वेळी, "आता स्वामी सुखें निद्रा करा, अवधूता। करा साईनाथा".... ही आरती म्हणताना श्रीबाबांच्या मुखकमलावर खरोखरच निद्रा देवतेची आभा पसरलेली दिसते;तर सकाळीच त्यांच्या मुखमंडलावर ते जणू काय नुकतेच झोपेतून उठल्यागत दिसून येतात. भक्तांनो, तुम्ही जर मन एकचित्त ठेवाल तरच तुम्हाला श्रींच्या मुखकमलावरचे हे भाव अगदी स्पष्टपणे अनुभवता येतील.

पहाटे ठीक ५-१५ वाजता मच्छरदाणीची पुढील दोन टोके वर अडकवलेली असतानाच श्रींची दिवसभरातली पहिली आरती, जी मिळण्यासाठी भक्त धडपडत दूरदूरून येतात ती सुरू होते. या पहाट आरतीला भक्तमंडळी मोठ्या संख्येने हजर असतात. प्रत्यक्ष आरती सुरू होण्यापूर्वी दोन तेवती निरांजने समाधी मंदिरावर उभय बाजूंना ठेवली जातात. त्यांच्या मध्ये दोन चांदीच्या पातेल्यातून लोणी व साखर मिश्रित

प्रसाद ठेवला जातो. त्यावर झाकण्या ठेवल्या जातात, व त्या झाकण्या[...] लाल-गुलाबी-पिवळी गुलाबांची फुले ठेवली जातात.

आरती सुरू होण्यापूर्वी क्षणभर मुख्य पुजारी देठविरहीत एक गुलाब पुष्प घे[...] प्रातःकालीन प्रसाद-नैवेद्य बाबा, आपण ग्रहण करावा असे मंत्र पुष्पाद्वारे कथन क[...] ते फूल समाधीवर वहातात. मंदिर प्रमुख श्री बाबांची काकड आरती आता सुरू [...] आहे, सर्वांनी एक साथ आरती म्हणावी अशी विनंती मराठी व हिंदीतून भक्त[...] करतात; व तबला-पेटी वाद्यांच्या मंगल साथीत श्रींची आरती सुरू होते.

आरतीच्या वेळी मुख्य पुजारी उजव्या हातात तेवते पंचारती निरांजन व दुस[...] डाव्या हातात चांदीची घंटा वाजवून आरती सुरू करतात. प्रत्येक नवे पद, अ[...] भजन संपले की घंटा वाजवून सूचना देऊन पुढील नवे पद सुरू केले जाते.

प्रथम– "जोडूनियां कर चरणी ठेविला माथा ....

नंतर

"उठा पांडुरंगा आतां प्रभातसमयो प्रातला।" ....

नंतर

"उठा उठा श्रीसाईनाथ गुरू चरणकमल दावा" ....

व नंतर

"उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकलां" .....

या चार भूपाळ्या म्हणून देवाला आळविले जाते.

नंतर

"घेऊनिया पंचारती करू बाबांची आरती" .... हा अभंग गायिला जात[...]

नंतर "काकड आरती करीतो साईनाथ देवा! चिन्मयरूप दाखवी घेउ[...] बालक लघुसेवा" ही व

"भक्तिचिया पोटी बोध कांकडा ज्योती".... ही कांकडआरतीची पदे म्हट[...] जातात.

नंतर "साईनाथ गुरू माझे आई मजला ठाव द्यावा पायी दत्तराज गुरू माझे आ[...] मजला ठाव द्यावा पायी" हे भजन म्हणून श्री साईनाथ प्रभाताष्टकास सुरूवात के[...] जाते. या प्रभातअष्टकाची सुरूवात

"प्रभात समयी नभा शुभ रवि प्रभा फाकली। अशी असून शेवट–

करो सतत सत्कृती मतिही दे जगत्पावना।

समर्थ गुरू साईनाथ पुरवी मनोवासना।।"

असा आहे.

प्रभाताष्टकानंतर "साई रहम नजर करना बच्चों का पालन करना ...." व नंत[...] "रहम नजर करो, अब मोरे साई, तुम बिन नहीं मुझे माँ बाप भाई" अशी दोन हिंदी प[...] म्हटली जातात. व त्यानंतर–

"तुज काय देऊ सावळ्या मी खाया तरी" व

"श्री सद्गुरू बाबा साई तुज वांचुनी आश्रय नाही, भूतली" ही दोन मराठी पदे गायिली जातात, पुजारी हातातील निरांजन खाली ठेवतात व काकड आरतीचा सुश्राव्य असा कार्यक्रम संपतो. लगेच वादकांच्या समोर उभे असलेले गणवेशातील तीन भालदार चोपदार खड्या सुरात– "ओम् राजाधिराज योगिराज परब्रम्ह श्री सच्चिदानंद सद्गुरू साईनाथ महाराज" अशी ललकारी म्हणतात. ही बिरुदावली चारही आरत्यांच्या समाप्तीनंतर होत असते.

येथवर सकाळचे ५-४० झालेले असतात. आरती संपल्याबरोबर मुख्य मंदिर व्यवस्थापक ध्वनिक्षेपकावरून आजच्या दिवसाचे समाधीमंदिरातील सारे कार्यक्रम, व प्रसाद वाटपाची निश्चित जागा व इतर सूचना मराठी व हिंदीमधून कथन करतात. पाकिटमारांकडून सावध राहण्यासाठी खिसा-पाकीट सांभाळणे अशी सूचनाही मिळते.

काकड आरती संपल्यावर स्त्री-पुरूष भक्तमंडळींना श्रींचे दर्शन घेता येते. हा दर्शन सौख्य- लुटण्याचा सोहळा सहा वाजेपर्यंत चालू असतो. या १५ मिनिटांच्या काळात संस्थान गवई साईभजने पेटी तबला वादकांवर मंद चालीत गात असतात.

श्रीसाईबाबांचे मंगलस्नान सकाळी ६ वाजता सुरू होते. प्रथम समाधी, चौथरा साफ केला जातो. तो प्रथम साध्या पाण्याने धुवून काढतात. मच्छरदाणीची मागील दोन्ही टोके सोडली जातात व मच्छरदाणी नीट घडी करून ती रात्री लावण्यासाठी म्हणून ठेवली जाते. श्रींच्या सिंहासनावरील उभय बाजूचे रौप्य सिंह काढले जातात. श्रींची अंग वस्त्रे काढली जातात. सिंहासनाचे पाठीमागे चॉकलेटी रंगाच्या मखमलीवर पाणी जाऊ नये म्हणून नारिंगी रंगाचे प्लॅस्टिकचे आवरण लावले जाते. बाबांचे मंगलस्नान पाहता यावे म्हणून समाधी मंदिरात स्त्री-पुरूष भक्तमंडळी दाटीवाटीने बसलेली असतात.

प्रथम बाबांना साधारण कोमट पाण्याने स्नान घातले जाते. हे पाणी सध्या हिटरवर गरम केले जाते. उष्णोदक स्नानानंतर दुग्धस्नान घातले जाते. या मुरलीधराच्या मंदिरात श्रीबाबा हे साक्षात् श्रीकृष्णाचाच अवतार आहेत व म्हणूनच दुग्धस्नान घातले जाते. नंतर पुन्हा उष्णोदक स्नान घातले जाते. समाधीवरही उष्णोदक स्नान नंतर दुग्धस्नान व पुन्हा उष्णोदक स्नान या क्रमाने स्नान घातले जाते. भक्तांनाही समाधी स्नानाचा लाभ घेता येतो. श्रींच्या दोन्ही बाजूस उभे असलेले पुजारी तांब्यातून समाधीवर पाणी घालतात तेव्हा क्षणभर आपणही त्यांना पाणी घालण्यास सांगून आपला हात समाधीवर अशा वेळी फिरवून घेतात. भक्तमंडळींना परमसंतोष होतो. बाबांचे मंगलस्नानाचे वेळी पुरूष सूक्तातील व त्यानंतर विष्णूसहस्त्र नामावली ध्वनिफितीकेवरून ऐकविली जाते. ती संपताच वार दैवतांवरील गाणी ऐकविली जातात. सोमवारी– श्री शंकराची गाणी-पदे-भजन, मंगळवारी- शुक्रवारी - श्री देवीची पदे-गाणी, गुरूवारी- श्री दत्तप्रभूंची गीते, शनिवारी श्री पवनपुत्र हनुमानावरील पदे प्रामुख्याने ऐकविली जातात.

श्रीमूर्तीचे मंगलस्नान, समाधी स्थान स्नान होत असतानाच वाहाणारे जे पा
श्रीमूर्तीचे पाठीमागे असलेल्या गोमुखातून बाहेर येते ते भाविक हे दुग्ध-मिश्रित
श्री तीर्थ म्हणून प्राशन करतात तर काही मंडळी जी बाहेर गावाहून आलेली अस
ती बाटलीतून तीर्थ म्हणून भरून नेतात.

नंतर समाधी स्नानाचा परिसरही धुवून स्वच्छ केला जातो.

श्रीबाबांचे मंगलस्नान आटोपल्यावर स्वच्छ टॉवेलने श्रींचे अंग साफ पुसून को
केले जाते. मस्तकी भगवा रूमाल लपेटला जातो. अंगावरून प्रथम पांढरे वस्
त्यावरून छानदार शाल ओढून ती पांघरली जाते. भालप्रदेशावर अष्टगं
दुबोट ओढले जाते. खाली टेकलेल्या चरणाच्या अंगुष्टावर अष्टगंध ला
जाते. गळ्यात छांनदार हार घातला जातो व रूमालावर सोन्याचा मुगुट चढ
जाते. समोरची समाधी ही चांगली स्वच्छ पुसली जाते. त्यावरून भगवी चादर ओ
जाते. अक्षरशः यावेळी भक्तमंडळीकडून गुलाब पुष्पांचा वर्षाव समाधीवर
असतो. समाधीला हार घातला जातो. फुलांची चादर घातली जाते. श्रींचे मंगलस्
श्री समाधी मंगलस्नान, श्रींना वस्त्रालंकार समाधीवर चादर असा वेशभूषा, गंध ले
इ. चा संपूर्ण कार्यक्रम ठीक ६ वाजून ५० मिनिटांनी आटोपतो व "शिरडीस ज्या
लागतील पाय, टळती अपाय सर्व त्याचे..." ही बाबांची ११ वचनांची तबकडी ला
जाते.

नंतर श्रींची पंचोपचार पूजा केली जाते. या पुजेत गंध, अक्षता, पुष्प हे एक नंतर
धूप, ३) दीप, ४) नैवेद्य व ५) आरती या गोष्टी समाविष्ट आहेत.

पंचोपचार या पूजेच्या वेळी पुजारी श्री सद्गुरू साईनाथ देवताभ्यो न
सकलोपचारार्थे गंधाक्षत पुष्पैः संपुज्य पुज्यते' असं म्हणून श्रीसाईनाथांना नमस्का
करून सर्व उपचार करून गंध, अक्षता फुलांनी पूजा करतात. नंतर धुपारती के
जाते ती अशी–

वनस्पत्यो रसोद्धुपो गंधाढ्यो गंध उत्तमः। आघ्रेयः सर्व देवांनां धुप
प्रतिगृह्यताम्॥ श्री साईनाथ देवताभ्यो नमः। धुपं आधरापयामी साज्यंच वर्तिसंयु
वन्हीना योजितं मया भक्तयादीपं प्रयच्छामि देवाय परमात्मने। त्राहीमाम् निरयात घो
दिपोयं प्रतिग्रह्यताम॥ श्री साईनाथ देवताम दीपदर्शयामि उपहार नैवेद्यम् चतु
मंडलम् कृत्वा नैवेद्यम् गायत्री मंत्रेण प्रोक्ष्य सत्यंत वर्तेन परीषींचामि धेन्नुमुद्रां
असा मंत्र म्हणतात, व नमस्कार करतात.

नंतर नैवेद्य श्रीपुढे ठेवल्यावर –

ओम प्राणाय स्वाहा
ओम् अपानाय स्वाहा
ओम् व्यानाय स्वाहा
ओम् उदानाय स्वाहा
ओम् समानाय स्वाहा
ओम् ब्रम्हणे नमः

ओम् पुर्न नैवेदम् समर्पयामि, हस्त प्रक्षालनम्, मुखप्रक्षालनम् समर्पयामि, करोद्वर्तनार्थे चंदनम् समर्पयामि अथ उत्तर निरोजनम् असे म्हणतात. इथेही पंचोपकार पूजा संपते. ही पंचोपचार विधीयुक्त पूजा, सोपस्कारसहित अशी "ब्रम्हनित्यकर्म समुच्चय" या धार्मिक ग्रंथातून जशी वर्णिलेली आहे तशी केली जाते. हा ग्रंथ गीर्वाण भूषण शास्त्री स्वर्गीय दुर्गाशंकर उमाशंकर शर्मा यांनी सादर केलेला आहे. त्यांचा जन्म संवत् १९३१ आश्विन शुक्ल पौर्णिमा असून देहावसान संवत् १९९१ भाद्रपद शुक्ल षष्ठी असा आहे.

श्री बाबांची ही पंचोपचार पुजा ठीक ७ वाजता संपते. शंख वाजविला जातोव देवाला संस्थान मुख्याधिकाऱ्यांच्या वतीने पहिला हार घातला जातो. बरोबर सात वाजता "शिरडी माझे पंढरपूर, साईबाबा रमावर" ही गीत तबकडी लावली जाते.

ठीक सात वाजता भक्तमंडळींना उभय बाजूने देवदर्शनासाठी सोडले जाते. साडे सात वाजता भक्तमंडळींचे अभिषेकाचे कार्यक्रमांना सुरवात होते. दर दिवशी ८०० च तिकिटे अभिषेकासाठी आठ आणे प्रवेश दर देऊन दिली जातात. ११ वाजेपर्यंत हा अभिषेकाचा कार्यक्रम चालू असतो. प्रत्येक अभिषेक तुकडीला जाळीच्या दरवाजातून कूपन-तिकिटांवरील क्रमांक पुकारून आत घेतले जाते. प्रत्येक तुकडीचे वेळी २५०, २५० व नंतर ३०० अशी भक्तमंडळी आत घेतली जातात. एका वेळी वैयक्तिक अभिषेक समाधीस्थळावर बसून भक्तमंडळींकडून केला जात होता पण आता भक्तांची संख्या अतोनात वाढल्याने च मर्यादित वेळेतच सर्व काही आटोपते घ्यायचे असल्याने हा सामुदायिक अभिषेक भक्तांना करावा लागतो. व तो पण अत्यंत शिस्तबध्द होतो. अतिशय व्यवस्थितच होत असतो.

विशेष लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की पहाटे श्रीमंदिर उघडल्यापासून तो श्रींचे मंगलस्नान आटोपेपर्यंत म्हणजे ७ वाजेपर्यंत कुणाही भक्ताला श्रींची छायाचित्रे घेता येत नाहीत व तशी परवानगीही दिली जात नाही.

मंदिर उघडल्यापासून तो काकड आरती व संस्थान पूजा होईपर्यंत श्रींचे सर्व ते काही सोपस्कार अगदी वक्तशीरपणे होत असतात. त्यात कुठेही बाधा येऊ नये म्हणूनच की काय पावला पावलावर सुरक्षा कर्मचारी वर्ग भक्तांना सूचना देऊन मार्गदर्शन करतात. अत्यंत शिस्तीत व मिनिट-मिनिट अगदी वेळेवर आजवर हा काकड आरतीचा संपूर्ण कार्यक्रम पार पडत आलेला आहे व तो यापुढेही असाच पार पडणार आहे असा सर्व भक्तांचा ठाम विश्वास आहे. अर्थात् हे सारे श्री साईनाथांच्या कृपा प्रसादावरच चालू आहे यात शंकाच नको.

श्री बाबा असताना काकड आरतीचा मान श्री. बापूसाहेब जोगांनाच होता. उत्तम वस्त्रे प्रिधान करून अलंकारांनी सुशोभित झालेली श्रींची अशी ही मूर्ती दररोज रात्री साडेदहा वाजेपर्यंत आपल्या भक्तांना दर्शन देत असते. ही श्रीमूर्ती म्हणजे शिल्पकलेचा एक प्रख्यात अजब नमुना म्हणून जगभर प्रसिध्द आहे. मुंबईतील गिरगावात रहाणारे कै. श्री. वसंत बाळाजी तालीम यांनी अतिशय मेहनतीने व

तितक्याच श्रध्देने ही इटालियन कराका मार्बलची मूर्ती तयार केलेली असून ती तयार करता करता त्यांना साक्षात् श्रीसाईनाथांनी दर्शन दिलेले आहे. श्री बाबांची ही नयनमनोहारी मूर्ती केलेल्या या शिल्पकाराचेही कौतुक करावेसे वाटते व त्यांचेही स्मरण श्रींचे दर्शन घेता घेता होते.

# साईमाऊली

साईमाऊली माझी साईमाऊली
स्वप्नात माझ्या आली sऽऽ ss
तुझ्या कृपेची आली प्रचिती
ठेविता श्रध्दा नि सबुरी
अशी ही दीनांची साऊली sऽऽ ss
साईमाऊली .... ॥१॥

म्हणता मंत्र 'साई-साई'
दु ख सर्व विलया जाई
किमया अशी त्या माऊलीची sऽऽ ss
साईमाऊली.... ॥२॥

अहोरात्र भक्तांसाठी
तळमळ करिते ही जगत्‌जननी
अशी ही कृपेची साऊली sऽऽ ss
साईमाऊली.... ॥३॥

प्राशन करिता तव उदी
दूर पळे भक्तांची व्याधी
महिमा अशी त्या उदीची sऽऽ ss
साईमाऊली... ॥४॥

सांपडी भक्त जरी संकटी
सोडविण्या त्या संकटातूनि
झणी घेई धाव साईमाऊली sऽऽ
साईमाऊली .... ॥५॥

साईचरणी एक विनवणी
सुटो न संगत तुझी जीवनी
देई मज ठाव तवचरणी sऽऽ ss
साईमाऊली.... ॥६॥

— सौ. प्रमिला लिलाधर धडाडे
एम. ए., बी. एड
एन. आय. टी. क्वार्टर नं. ३१/ब
अशोक नगर, नागपूर-१७

# "श्री साई भावभक्तीचा भुकेला"

– श्री. बी. व्ही. सावंत
(बी. ए., एस्. एच्. एस्. एस्.
साहित्य-विशारद, अनु. पंडित)
रॉबर्ट मनी हायस्कूल, कंपाऊंड,
स्टाफ क्वॉर्टस्, ग्रँटरोड,
मुंबई - ४०० ००७.

सदर ललित लेख "श्री साईसच्चरित्र" या अलौकिक व असामान्य चरित्र ग्रंथावर आधारित आहे. हा ग्रंथ ज्ञानेश्वरी व नाथ भागवत या ग्रंथाइतकाच श्रेष्ठ आहे. श्री ज्ञानेश्वर माऊलीने सांगितलेल्या रसाळ तत्त्वज्ञानाची आठवण करून देणारे व गुरूचे अद्वितीय महत्व वर्णन करणारे काही प्रसंग व सत्य घटना या ग्रंथातील अध्याया-अध्यायामध्ये भरपूर आहेत. "श्री साईंच्या जीवनचरित्रातील काही अलौकिक घटना सर्व भाषिकांना व सर्व धर्मियांना कळाव्यात,म्हणून काही निवडक प्रसंग व घटना त्यांच्या चरित्र ग्रंथातून क्रमाक्रमाने वर्णन करण्याचे ठरवले आहे. श्री साईकृपेने सदर लेख वाचकांना आवडतील,असा दृढ विश्वास वाटतो.

**१) घटना पहिली–** रामचंद्र आत्माराम तर्खड उर्फ बाबासाहेब तर्खड या नावाचे परम साईभक्त मुंबईतील वांद्रे या भागात रहात होते. त्यांच्या देवघरात भव्य, सुंदर, सुशोभित असा एक चंदनी देव्हारा असून त्यामध्ये श्री साईंच्या सुंदर मूर्तीची प्रतिष्ठापना केली होती. ते तिन्ही वेळा साईंची पूजा करून श्री साईस नैवेद्य अर्पण केल्याशिवाय अन्नग्रहण करीत नसत. त्यांची सुशील पत्नी व मुलगा सुध्दा साईंची परमभक्त होती. तिला एकदा शिरडीस जाऊन प्रत्यक्ष साईमहाराजांचे दर्शन घ्यावे, अशी तीव्र इच्छा झाली. म्हणून बाबासाहेबांनी मुलाला सांगितले की, तू (पत्नीला) आईला घेऊन शिरडीस जा. परंतु मुलाला वाटले की, आपण रोज वडिलांना पूजेचे कष्ट देणे चांगले नव्हे, म्हणून तो आईबरोबर जाण्याची टाळाटाळ करू लागला. वडिलांनी जास्त आग्रह केल्यावर,तो एका अटीवर जाण्यास तयार झाला. ती अशी की, वडिलांनी श्री साईंना रोज नैवेद्य अर्पण केल्याशिवाय स्वतः कधीही अन्न ग्रहण करू नये. बाबासाहेबांनी ही अट तात्काळ कबूल केली व तू निश्चिंत मनाने जा, मी या अटीचे जरूर पालन करीन,असे वचन दिले.

त्या अटीनुसार रोज बाबासाहेब त्या साईमूर्तीची पूजाअर्चा करून खडीसाखरेचा नैवेद्य दाखवून नंतरच जेवू लागले. परंतु दुर्दैवाने एक दिवस पूजेच्या वेळी कामाच्या घाईमध्ये मूर्तीला साखरेचा नैवेद्य दाखविणे राहून गेले. ज्यावेळी ते जेवावयास बैसले, त्यावेळी त्यांना अचानक नैवेद्याची आठवण झाली. त्याबरोबर त्यांनी श्री साईबाबांच्या मूर्तीला हात जोडून प्रार्थना केली की, "बाबा! आज माझ्याकडून घोर अपराध झाला, मला आज एक वेळच क्षमा करा, पुन्हा अशी चूक होऊ देणार नाही."

वांद्रे येथे हा प्रकार ज्या दिवशी दुपारी घडला, त्या ठिकाणापासून शेकडो मैल शिरडी क्षेत्र दूर असूनसुध्दा श्रीसाईमहाराजांनी त्रिकालज्ञानाने हे प्रत्यक्ष जाणले त्याच दिवशी ते बाबासाहेबांच्या पत्नीस म्हणाले, "माई! मी रोजच्याप्रमाणे 'वांद्रे' येथे गेलो, परंतु मला जेवणच काय, पिण्यास पेज सुध्दा मिळाली नाही. घराचा दरवाजा बंद असूनसुध्दा मी मुक्तपणे आत प्रवेश केला, पण आत कोणीही भेटले नाही. भुकेने माझा प्राण कासावीस झाला. उपाशीपोटी भर दुपारी मी तसाच माघारी परतलो." श्री साईंचे बोलणे ऐकताच बाबासाहेबांचा मुलगा तात्काळ समजला की; आज वडिलांनी नक्कीच साईबाबांना नैवेद्य दाखविला नसावा, ते विसरले असावेत. म्हणून त्याने बाबांना विनंती केली की, बाबा! आताच मला घरी जाऊ द्या. परंतु बाबांनी त्याला घरी जाऊ न देता, तेथेच पूजा करावयास सांगितले. पूजा केल्यावर मुलाने ताबडतोब बाबासाहेबांना पत्र लिहून सविस्तर वृत्तांत कळविला. ते पत्र वाचताच बाबासाहेबांचे अंतःकरण द्रवले, त्यांच्या डोळ्यांतून पश्चात्तापामुळे घळघळा अश्रूधारा वाहू लागल्या. असा कोण पाषाणहृदयी असेल की, ज्याचे हा वृत्तांत वाचून अंतःकरण द्रवणार नाही!

अशी होती श्री साईनाथांची अलौकिक त्रिकालज्ञान जाणण्याची किमया !!!

## "पाही भूतमाजी जो मज।
## – तोचि माझिया प्रीतीचा समज"॥

श्री साईमहाराज

याच बाबासाहेब तर्खडकरांची पत्नी त्यावेळी शिरडीत रहात असताना एके दिवशी दुपारी जेवणाची पाने वाढून जेवावयास बसण्याची तयारी झाली असताना एक भुकेने व्याकुळ झालेला कुत्रा अचानक दरवाजात आला. त्याला आपल्या पानावरची एक भाकरी बाईंनी खावयास दिली. इतक्यात एक चिखलाने माखलेला डुक्कर भुकेने कासावीस झालेला तेथे आला, त्याला सुध्दा बाईंनी दुसरी शिल्लक राहिलेली भाकरी खावयास दिली. या सर्व घटना त्यांच्या पत्नीच्या दानधर्माची कल्पना मंनात नसताना अचानक घडल्या. नंतर शिल्लक राहिलेले अन्न बाई जेवल्या.

याच दिवशी दुपारी जेवण झाल्यावर बाई नेहमीप्रमाणे मशिदीत गेल्या व साईबाबांपासून थोड्या अंतरावर बसल्या. त्याबरोबर बाबांनी त्या बाईला विचारले, माई! आज तू मला यथेच्छ पोटभर जेवावयास घातलेस, माझे प्राण जेव्हा भुकेने व्याकुळ झाले होते, तेव्हा तू मला अन्न देऊन तृप्त केलेस, जीवदान दिलेस. असेच रोज भुकेलेल्यांना अन्न-दान करावे, हेच अन्न-दानाचे पुण्य जीवनाच्या शेवटी तुझ्या कामी येईल. मी मशिदीमध्ये बसून कधीच खोटे बोलणार नाही. आजच्याप्रमाणे आपण जेवण्यापूर्वी भुकेलेल्यांना अन्न-पाणी देऊन नंतरच आपण अन्नग्रहण करावे. त्यावर बाबासाहेबांच्या पत्नी म्हणाल्या, "बाबा! मी तुम्हाला जेवावयास वाढीनच कशी

मीच पराधीन असून पैसे देऊन मिळेल ते जेवण जेवते, मग हे कसे शक्य आहे?" तेव्हा बाबा म्हणाले, "माई! तू जेवावयास बसली असताना तुझ्या दारावर एक भुकलेला कुत्रा व एक डुक्कर आला होता. त्या प्रत्येकाला भाकरी घालून त्यांचा आत्मा तू तृप्त केलास. मीच कधी कधी मांजर, कुत्रा, व डुक्कराचे रूप घेऊन फिरत असतो व अशा रीतीने भक्तांची परीक्ष घेत असतो. त्या परीक्षेत तू खरी ठरलीस. माई! तू माझी शेवटची अक्षय वाणी लक्षात ठेव की– "पाही भूतामाजी जो मज। तसेच भूती सदैव पहावा भगवन्त॥"

ज्ञानेश्वर महाराजांनी सुध्दा 'ज्ञानेश्वरी' ग्रंथामध्ये हेच अमर तत्व दुसऱ्या काव्यमय भाषेत सांगितले आहे की, "जो जे देखिजे भूत। तो ते जाणिजे भगवंत (ईश्वराचा अंश)

सदर सत्य घटनेवरून श्री साईमहाराजांचे सर्व प्राणीमात्रावर (फक्त मनुष्यावरच नव्हे) किती अगाध, अतूट व निःस्सीम प्रेम होते, हे दिसून येईल. म्हणूनच 'श्री साईसच्चरित्र' हे ज्ञानेश्वरी ग्रंथाइतकेच समदर्जाचे आहे.

★★★★★★★

# श्री साई परिवारातील माणिक आणि मोती – ८
# श्री. बापूसाहेब जोग

— साईनंद.

श्री. सखाराम हरी उर्फ बापूसाहेब जोग हे श्रीसाईबाबांचे एक निष्ठावान भक्त होते. १९०९ साली ते सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यावर कुटुंबासह शिरडीस महाराजांच्या दर्शनासाठी म्हणून आले व महाराजांनी त्यांना येथे जे ठेवून घेतले, ते कायमचेच. सामानसुमान आणण्यासाठीसुध्दा त्यांना शिरडीतून जाऊ दिले नाही. बापूसाहेब तत्त्वज्ञानी, कर्मनिष्ठ व सत्त्वशील ब्राम्हणाचे एक उत्कृष्ट आदर्श होते. त्यांच्या पत्नींना बाबा 'आई' या नावाने संबोधित असत. सुरूवातीस बापूसाहेब खूप उग्र, रागीट व तामसी वृत्तीचे होते, पण बाबांच्या सहवासात त्यांच्या वृत्तीत बदल झाला.

साईमहाराजांची आरती ह. भ. प. मेघाच्यापासून सुरू झाली. १९१२ साली मेघाच्या देहावसानानंतर महाराजांची आरती धरण्याचा मान बापूसाहेबांना मिळाला व साईभक्तांनी देहविसर्जन केल्यावर दोन-तीन वर्षांनी बापूसाहेब साकोरीस राहण्यास गेले, तेथपर्यंत तो त्यांच्याकडेच होता.

श्रीसाईनाथमहाराज अनंतात विलीन झाल्यावर त्यांच्या स्थूल देहाची मशीदमाईत पूजा व आरती याच श्री. बापूसाहेबांनी केली. पूजा झाल्यावर नित्याप्रमाणे बापूसाहेबांनी महाराजांच्या हातावर दक्षिणा ठेवली, पण तो देह निर्जीव असल्यामुळे

दक्षिणा हातात राहावी, म्हणून बापूसाहेबांनी महाराजांची बोटे वळवली व चमत्कार असा की,जरी महाराजांनी देह सोडून २१ तास लोटले होते, तरी त्यांची बोटे ताठली नव्हती. बापूसाहेबांनी दक्षिणा देऊन मूठ मिटली, ती तशीच राहिली. पुढे त्याच दिवशी देह समाधीत ठेवला व तेव्हापासून बाबांची आरती समाधीमंदिरात जी होऊ लागली, ती आजतागायत.

महाराजांच्या निधनानंतर बापूसाहेबांच्या वैभवासही उतरती कळा लागली. श्रीसाईंच्या निधनानंतर त्यांच्या संबंधीचे काही धार्मिक विधी उपासनीबाबांनी श्रीक्षेत्र काशी येथे केले. याकामी बापूसाहेबांनी पुढाकार घेतला होता. स्वतःच्या पदरचे एक हजार रूपये त्यांनी याकामी खर्च केले होते. याच बापूसाहेबांनी एकावेळी श्रीउपासनीबाबांना धोतराने बांधून शिरडीच्या खंडोबाच्या देवळातून श्रीसाईबाबांच्या पुढे मशिदीत खेचत आणले होते. बाबांच्या दोन वस्तू चिलीम व सटका, या बाबांच्या सहवासातील सेवेकरी माधव याने बापूसाहेबांच्या स्वाधीन केल्या व त्या वस्तू त्यांनी नित्य पूजेस ठेवल्या होत्या. आपले अखेरचे दिवस त्यांनी साकोरीस घालविले. साकोरीसच ते निधन पावले. त्यावेळी त्यांचे वय ७० वर्षांचे होते.

साकोरीस त्यांची समाधी एकमुखी दत्तमंदिराजवळ आहे. ती व्यवस्थित बांधलेली असून त्यावर एक देऊळही उभारलेले आहे.

# जगत्‌कल्याण

**– कु. शुभांगी कुलकर्णी**
द्वारा - श्री. जी. जे. कुलकर्णी
पोस्ट मास्तर - देगलूर,
ता. देगलूर, जि. नांदेड.

**साधू निश्चय करिती एक। आत्मा सर्वत्र व्यापक।।**
**येर हे अवघेची माइक चराचर।। चित्री लिहिली येना। त्यात कोण थोर, कोण साना।। हे तुम्ही विचाराना आपुले ठाई।।**

मानवी जीवन हे एक सुंदर गीत आहे.हे गीत निरनिराळ्या फुलाफळांनी तसेच विविध काट्यांनी बहरलेले आहे. म्हणजेच या जीवनगीतात सुखा बरोबर दुःखाचा पण समावेश झालेला आहे. म्हणून तर आपल्याला जीवनगीत हे ऐकण्यास मधुर वाटते. तरीपण मनामध्ये एखाद्या वेळेस कुठेतरी जाणीव होते की, हे जीवन अजून मधुर, समाधानी झाले पाहिजे. त्यासाठी गुरूची सेवा करणे, त्यांना भक्तीभावाने पुजणे, हे एक रामबाण औषध आहे.

भारतात अनादी काळापासूनच गुरूशिष्य परंपरा चालू आहे आणि ती आजतागायत चालू आहे. आपण ज्यांना सत्पुरूष, संत म्हणतो,त्यांनी सुध्दा आपल्या

गुरुंना पूज्य मानले होते. सर्व देवांचे गुरू बृहस्पती होते, श्रीरामाचे गुरू वशिष्ठमुनी होते, श्रीकृष्णाचे सांदिपनी गुरू होते, तर अलिकडच्या काळातील स्वामी विवेकानंदांनी सुध्दा परमहंस यांना आपले गुरू मानले होते. गुरूंच्या लीला अगाध आहेत. त्या अगाधतेमध्ये त्यांचे रहस्य दडून बसलेले आहे. आत्तापर्यंत तरी गुरूचे स्थान हे सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे.

निसर्ग-निर्मात्याने निरनिराळी वृक्षवल्ली निर्माण केली. परंतु या वृक्षांनी कधीही कुणाकडून कोणत्याही प्रकारची अपेक्षा केली नाही. तहानलेल्या, भुकेल्यांना त्यांनी जिवदान दिले, पण 'मला अमुक पाहिजे' असे कधीच म्हटले नाही. तशीच महती या गुरूची आहे. जे काही खायला मिळेल ते खायचे. झोपायला जागा मिळेल तिथे झोपायचे. अतिशय साधा जीवनक्रम चालू ठेवायचा. आपल्या भक्तांना उपदेश करायचा. आपणहून कधीही आपले मोठेपण त्यांनी दाखवून दिले नाही. -

सुखी जीवन जगणे, हे एक मानवाचे मुख्य उद्दिष्ट असते. त्यासाठी त्याला अगोदर दुःखाचा राजमार्ग चालून जावा लागतो, तरच कुठल्या तरी डोंगराच्या आडून सुखाचे सोनेरी किरण हळूच बाहेर पडतात. ज्याप्रमाणे नदीला सुध्दा खाचखळग्यातून गेल्याशिवाय तिचे सागरकुंज प्राप्त होऊ शकत नाही. खाचखळग्यातून जाताना सुध्दा तिची भेट आपोआप एखादया पवित्र स्थानाला होते आणि ती नदी पवित्र असूनही अधिक पवित्र बनते. तसेच आपले आहे. या नदीरूपी जीवन प्रवाहात आपल्याला गुरूची साथ आवश्यक आहे. बऱ्याच वेळेस आपली वाट थोडी वेडीवाकडी होते, तेव्हा गुरूमुळे आपण आपोआपच सरळ वाटेवर येतो.

सत्य, द्वापर आणि त्रेता युगात गुरूची परंपरा खूप मोठ्या प्रमाणात चाले. गुरूच्या आज्ञेशिवाय काही चालत नसे. परंतु सध्याच्या कलियुगाची गोष्ट वेगळी आहे. ह्यात मानवाला गुरूचा म्हणजेच परमेश्वराचा विसर पडलेला आहे, त्याची ओढ कर्मयोगाकडे ओढली जात आहे. त्यामुळे परमेश्वराची भक्तीही दुर्बल होत चालली आहे. सध्या विज्ञानाची प्रगती वाढत चालली आहे. म्हणून लोकांचा जास्त भर हा विज्ञानावर आहे. तरीपण लोकांनी लक्षात ठेवावे की, 'कितीही विज्ञान पुढे गेले, तरी ते परमेश्वराच्या पुढे जावू शकत नाही. म्हणून आत्तापर्यंत संत लोकांनी निरनिराळ्या पध्दतीने लोकांचे मन परमेश्वराकडे ओढण्याचा प्रयत्न केला. काहींनी आपले मोठेपण दाखवून दिले, तर काहींनी लहानच राहून दुसऱ्यांना मोठे केले. जसे शिवाजी महाराजांनी शून्यातून महाराष्ट्राची गाडी सुरळीत चालू केली, संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली, संत तुकारामांनी अभंगाद्वारे लोकांना जागृत करून परमेश्वराचे खरे रूप दाखविले.

परंतु असे काही आहेत की, ज्यांनी अभंगही लिहिले नाहीत की कोणता ग्रंथही रचला नाही. अशामध्ये शिरडीचे साईबाबा व शेगावचे गजानन महाराज मोडतात. साईबाबा एका वरातीत प्रगट झाले, तर गजानन महाराज उष्ट्या पत्रावळी खात असताना सापडले. दोघांचा जन्म आपल्याला माहीत नाही. तरीपण कोणत्यातरी

पध्दतीने प्रत्येकाने जगाच्या कल्याणासाठी आपले जीवन वाहून घेतले. प्रत्येकाचे मार्ग जरी वेगवेगळे असले,तरी त्यांचे कार्य एकच होते. ते म्हणजे जगतकल्याण.

जीवन म्हणजे एक खडतर प्रवास आहे. त्या प्रवासातील निरनिराळ्या अडचणी दूर करण्यासाठी, त्याबरोबरच आपले मन, शांत, समाधानी ठेवण्यासाठी खूप आवश्यकता आहे. असं म्हणतात की, अंगणात तुळशीचे वृंदावन असले म्हणजे वातावरण अतिशय पवित्र वाटू लागते. त्या तुळशीचा सुगंध जर आपण पूर्ण जगात पसरविला तर पूर्ण जगातील वातावरण किती पवित्र वाटेल!

**जगाच्या कल्याणा संताच्या विभूती।**
**देह कष्टविती परोपकारे॥**
**भक्ती प्रेमाचा केवळ पुतळा।**
**जयास शिष्याचा खरा जिव्हाळा॥**
**माझ्या गुरूसम गुरू विरळा।**
**सुख सोहळा न वर्णवे॥**

# साई पायी शरण

मी आले शरण तव पायी
माझ्या साता-जन्मांची पुण्याई
मजवर ठेवी कृपा-दृष्टी तू साई

मी आले शरण तव पायी
माझ्या हाकेला धावून येई
मज देई आधार तू साई

मी आले शरण तव पायी
माझा पाठीराखा होई
मज रक्षावे सदैव तू साई

मी आले शरण तव पायी
माझ्या जीवना अर्थ देई
मज भवसागर-पार नेई तू साई

मी आले शरण तव पायी
माझ्या सर्व चुका पदरात घेई
मज करी क्षमा तू साई

मी आले शरण तव पायी
माझ्या जीवनाचा सूत्रधार होई
मज घेई सांभाळून तू साई


**— कु. नीता मधुकर लिंगरकर**
७/२६८, नंद-दीप,
सायन (प.), मुंबई - ४०० ०२२

**माझ्या आठवणीतून –**

# मी पाहिलेले साईबाबा ... ७
# श्री. लक्ष्मणराव सदाशिव नाईक

– श्री. लक्ष्मणराव नाईक
१११ साईप्रसाद, धन्वंतरी नगर,
मु. पो. - इंदूर, म. प्रदेश - ४५२०१२.

**(श्री साईबाबांना भेटीदाखल आलेली आजची लाकडी पालखी ही हरद्याहून तत्कालीन साईभक्त श्री. सदुभैय्याजी नाईक यांच्याकडून आलेली आहे. याच सदुभैय्याजींचे श्री. लक्ष्मणराव हे सुपुत्र. श्रीसाईंचे तर त्यांनी दर्शन घेतलेच पण श्री साईलीलाच्या दहाव्या लेखक - कवी संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. श्रीमाऊलीचे चक्षुर्वैदर्शन घेतलेल्या श्री. लक्ष्मणरावांना आम्ही दीर्घायुष्य चिंतितो. – का. संपादक)**



मला श्री साईबाबांना शिर्डी येथे पाहण्याचा योग सन १९१४ मध्ये आला. त्यावेळी आम्ही तीन भाऊ व मोठी बहीण असे सर्व वडिलांबरोबर (सदुभैय्या वडिलांबरोबर) हरद्याहून संध्याकाळच्या रेलगाडीने निघून मनमाडला सकाळी ४ वाजता पोहोचलो. त्यावेळी थंडी फार होती. माझे वय त्यावेळी ७-८ वर्षांचे असावे. मनमाडला गाडी बदलून कोपरगावला आलो. तेथून घोड्याचा टांगा करून शिर्डीस जाण्याकरता निघालो. वाटेत गोदावरी नदी लागली. तेथे टांगा थांबवून आंघोळी केल्या व न्याहारी करून १०-११ च्या सुमारास शिर्डी येथे पोहचल्यावर वडिलांनी दिक्षित वाड्यावर नेले. तेथे सामान वगैरे ठेवल्यावर वडिलांचे मित्र आम्हास द्वारकामाईत घेऊन गेले. द्वारकामाईत श्रीबाबा चिलीम पीत असलेले पहिल्यांदा पाहिले. जवळ जाऊन आम्ही

सर्वांनी श्रींचे पायावर डोके ठेवून नमस्कार केला. श्री बाबा त्यावेळी लोडाला टेकून कठड्यावर हात ठेवून बसले होते. बाबांनी माझे डोक्यावर हात ठेवून जवळ बसविले. वडिलांचे मित्र श्री. देशपांडे (शामा) यांनी श्री बाबांस आमची ओळख करून दिली. थोड्या वेळाने दुपारच्या आरतीची वेळ झाली. आरती होईपर्यंत श्री बाबांचे गादीजवळ आम्ही उभे होतो. श्री साईबाबा आरती होईपर्यंत चिलमीचे झुरके मधून मधून मारीत होते. आरती संपल्यावर बाबांनी आम्हास उदी दिली व आम्ही वाड्यावर आलो.

दुपारचे जेवण करून थोडी विश्रांती घेतली व संध्याकाळी ४ वाजता पुन्हा द्वारकामाईत आलो व संध्याकाळच्या फेरीपर्यंत बसून होतो. त्यावेळी श्री बाबांनी आम्हास नारिंगी दिली.

दुसरे दिवशी गुरूवार पालखीचा दिवस. रात्री पालखी पहाण्यास आम्ही द्वारकामाईपासून चावडीपर्यंत श्री बाबांबरोबर चालत गेलो. चावडी मिरवणुकीत श्री राधाकृष्णाआईने चंदनाची मुद्रिका आमच्या कपाळावर लावून हातात मोरचले दिली ती घेऊन आम्ही मिरवणुकीत बाबांबरोबर चालत चावडीत गेलो. चावडीमध्ये बाबांची आरती झाली. ती पाहून आम्ही वाड्यावर येऊन झोपी गेलो. ८ दिवस आम्ही शिर्डीत राहिलो. त्यामुळे श्री बाबांना द्वारकामाईत व चावडीत पाहण्याचा योग जवळून आला. शिर्डीहून आम्ही हरदा येथे आल्यावर श्रीसाईबाबा आमचे घरी फोटो रूपाने सन १९१५ चे दासनवमीचे दिवशी बाळकराम मुलारामबरोबर आले.

"जय साईराम"

# विचारणा

कधीतरी सांग साई माझे ऐकलेस का?<br>
दावोनी पाय तुझे दर्शन दिलेस का? ॥ धृ.॥<br>
अंगात शुभ्र कफनी, डोईस शुभ्र फडका<br>
आरक्त तेज मुखी, हाती सुरेख सटका<br>
काखेस वाम झोळी, ते रूप दाविले का? ॥ १॥<br>
हाती चिलीम आणि भिक्षेस तो कटोरा<br>
पायात चालताना, जोडा सुरेख कोरा<br>
ऐसेच रूप तुझे, मज दाविलेस कां? ॥ २॥<br>
आशिष आम्हा द्याया, तैसीच दृष्टी छाया<br>
तो बाहू उंचवोनी, भक्ता शिरी धराया<br>
येशील सत्वरी तूं धावून सांग का? ॥ ३॥

**— श्रीमती श्री शहाणे**<br>
लक्ष्मी निवास, गडकरी रोड,<br>
डोंबिवली (पूर्व)

# इति श्री साई उवाच

**– संकलन - श्री. डी. जी. देशपांडे**
खूर-सिल-नाझ, कोहिनूर रोड
दादर, मुंबई - ४०००१४.

(मागील अंकावरून क्रमशः)

७४
'हू मार आता काय बघसी ।
आतां हा खास करील, घाय । ऐसें पाहोनि साईमाय ।
अंत पाहूं जाता अपाय । म्हणे रे जाय राहूं दे ॥
हां हां काका होय परता, । काय रे तुझी हे निष्ठुरता ।
ब्राह्मण होऊनि हिंसा करितां । विचार चित्ता नाहीं कां"॥

– अ. २३ वा

७५
म्हणती "याला वाईट खोडी । एकेकटें खाण्याची गोडी ।
आज बाजाराची साधूनि घडी । फुटाणे रगडीत हा आला ॥
एकेकटें खाणें बरें नव्हे । ठावी मला त्याची सवे ।
हेच फुटाणे यांचे पुरावे । उगा नवलावें कशास ॥"
सन्निध असेल तयास देसी । नसल्यास तूं तरी काय करिसी ।
मी तरी काय करावें त्यासी । आठवतोसी काय मज ॥
मी नाही कां तुझ्याजवळ । देतोस काय मजला कवळ" ।

– अ. २४ वा

७६
प्रेमें म्हणती "अरे अण्णा । उगाच कां रे मांडिला दणाणा ।
अनुचित काय तेच समजेना । मुका घेतांना आईचा ॥

– अ. २४ वा

७७
सद्गुरु माझी मूर्ति' । कृष्ण बोले उद्धवाप्रती ।
ऐसा सद्गुरु भजावा प्रीतीं । अनन्य भक्ति या नांव ॥

– अ. २५ वा

७८
"काय शामा काय घाई । कागद कसला लावितो पायीं ।
बाबा तो नगरचा दामूशेट कांही । विचारूं पाही आपणातें ॥"
"कां बरें तो काय लिहीतो । काय कसले बेत करितो ।

वाटे आभाळा हात लावितो । देव देतो ते नको ॥
वाच वाच पत्र त्याचे" ।
"अरे शामा वाच वाच । माझे काय मानितो साच ।
मी तंव आपुला आहे असाच । बोलें उगाच माने ते" ॥
चळली मती शेटीची।
सांग की तयास प्रत्युत्तरी । काय उणे तुज असतां घरीं ।
पुरे आपुली अर्धी भाकरी । लाखाचे भरी पडूं नको ॥
आपण नाहीं रे बापू किसमे" ।

— अ. २५

७९

फळें पडतां कोळंब्यांत । बाबा मुखे काय उद्गारत ।
"फळें ती दामू अण्णा प्रीत्यर्थ । असूं दे तेथ पडलेलीं" ॥
आंबे दाम्याचे न ते अतुले । खावया टपले लोकजरी ॥
ज्याचे आंबे त्यानेंच घ्यावे । किमर्थ आपणा कोणाचे व्हावे ।
ज्याचे असतील त्यानेंच खावे । मरुनि जावे खावोनि" ॥
बाबा वदती धाकटीला । दे आठ मुले होतील तिजला ।
चार मुलगे चार मुलींला । ही आम्रलीला प्रसवेल ॥

— अ. २५

८०

"झालो जरी गत प्राण । वाक्य माझे माना प्रमाण ।
माझी हाडें तुर्वतीमधून । देतील अश्वासन तुम्हास ॥
मी काय पण माझी तुर्वत । राहील तुम्हासवें बोलत ।
जो तीस अनन्य शरणागत । राहील डोलत तयासवे ॥
डोळ्याआड होईन ही चिंता । करूं नका मज करितां ।
माझीं हाडें ऐकाल बोलतां । हितगुज करितां तुम्हांसवें ॥
मात्र माझे करा स्मरण । विश्वासयुक्त अंतःकरण ।
ठेवा करा निष्काम भजन । कृत कल्याण पावाल" ॥

— अ. २५

८१

येवो म्हणती प्रसंग कांहीं । "अपना तकिया छोडना नहीं ।
सदासर्वदा निश्चळ राहीं । अनन्य पाहीं एकत्वीं ॥"

— अ. २६ वा

८२

बाबा मग तयां आश्वासिती । "धीर धरावा थोडा चित्तीं ।
मुलास उचलुनि न्या निगुती । निजावगती ती लाधेल ॥
मुलास घेऊनि जा बिऱ्हाडीं । आणीक एक भरतां घडी ।

सजीव होईल तयाची कुडी । उगीच तांतडी करूं नका ॥
कां त्या संकल्पविकल्प लहरी । शांत झाल्या कां आतां तरी ।
ठेवील निष्ठा धरील सबूरी । तयासी श्रीहरी रक्षील" ॥

– अ. २६ वा

८३
"बापू तुजला पूर्वी दोन । दिधले ती म्यां त्यांत हे तीन ।
ठेवूनि तयांचें करीं पूजन । कृतकल्याण होसील" ॥

– अ. २६ वा

८४
'भोक्तृत्व सारे पाहिजे भोगिलें' उपदशिले तयास ॥
आपुल्या पूर्व कर्माजोगा व्याधि कुष्ठ क्लेश वा रोग ।
जाहल्यावीण पूर्ण भोग । हत्यागोग काय करी ॥
हा भोग राहता अपुरा । जन्म घ्यावा लागे दुसरा ॥
म्हणूनि तैसेच साहे कष्ट जरा । आत्महत्यारा होऊं नको ॥

– अ. २६ वा

८५
प्रसाद म्हणून माघारा दिधलें । 'नीट जीव लाव' आज्ञापिले ।
हीं ते जिवाभावाला आपुले । येईल आश्वासिले काकांस ॥
हेच कामीं येईल आपुले । नको देऊं हे कोणास वहिले ।

– अ. २७ वा

८६
"पोटांत आली कळ उठुनी। आंतडी तुटूनि पडत कीं॥
जा, ही राही न पोटदुखी। आण कीं सत्वर सोनामुखी।
मारल्याविण थोडीसी फकी। जाई न रूखरूखी पोटाची"।
"शामा ही पोथी कनी। आहे पहा बहुगुणी।
म्हणुन देतो तुज लागुनी। तो त्वां वाचूनि पहावी॥
एकदां मज उपजलीं नड। काळीज करूं लागले धडधड।
झाली जीवाची चडफड। दिसे न धडगत माझी मज॥
ऐसिया त्या प्रसंगांला। काय सांगू शामा मी तुजला।
या पोथीचा जो उपयोग झाला। हा जीव तरला तिचेनी॥
क्षणैक उरीं विसावा दिला। तात्काळ हा जीव गार झाला।
अल्लाच वाटे पोटीं उतरला। जीव हा जगला तिचेनी॥
म्हणोनि शामा ही तुजला नेईं। ओजें ओजें वाचीत जाई।
रोज एकादें अक्षर घेई। आनंददायी ही मोठीं॥
"माझा शामा असेल खुळा। परी मजला तयाचा लळा।

लोभ लावी जीवा आगळा। तयाचा कळवळा मज मोठा।।
ही विष्णुसहस्त्रनामाळा। बांधीन स्वहस्तें तयाचे गळा।
करीन तया भवदु:खावेगळा। लावीन चाळा वाणीला।।
नाम पापाचे पर्वत फोडी। नाम देहाचे बंधन तोडी।
नाम दुर्वासनेच्या कोडी। समूळ दवडी लोटुनी।।
नाम काळाची मान मोडी। चुकवी जन्ममरण ओढी।
ऐसिया सहस्त्रनामाची जोडी। शाम्यास गोडी लागावी।।
नाम प्रयत्नें घेतां चोखट। अप्रयत्नेंही नाहीं ओखट।
मुखासि आलें जरी अवचट। प्रभाव प्रकट करील।।
नामापरीस सोपें आन। अंत:शुध्दीस नाहीं साधन।
नाम जिव्हेचे भूषण। नाम पोषण परमार्था।।
नाम घ्यावया नलगे स्नान। नामासि नाहीं विधीविधान।
नामे सकळ पाप निर्दळण। नाम पावन सर्वदा।।
अखंड माझेंही नाम घेता। बेडा पार होईल तत्वतां।
नलगे कांहीं इतर साधनता। मोक्ष हाता चढेल।।
जया माझे नामाची घोकणी। झालीच तयाचे पापाची धुणी।
तो मज गुणि याहुनि गुणी। जया गुणगुणी मन्नामी।।

— अ. २७

# शिरडीची वारी

शिरडीची करिती जे वारी
तयांचा साई असे कैवारी ............

शुध्द भक्ती ज्यांच्या ठायी
बंधुभाव नांदे हृदयी
देती जे भुकेल्यास भाकरी
तयांचा साई असे कैवारी ।। १।।

संत चरणी प्रीती ज्यांची
ओढ मनी सत्कार्याची
ज्यांच्या स्वार्थ नसे अंतरी
तयांचा साई असे कैवारी ।। २।।

कष्ट करूनी धन मिळवावे
जनहितार्थ काही दयावे
जाणूनी प्रभूची ही चाकरी
तयांचा साई असे कैवारी ।। ३।।

शिरडीची करिती जे वारी
तयांचा साई असे कैवारी .........

— श्री. जयवंत कुळक
कुळकर्णी कुटी
१० प्रार्थना समाज रो
विलेपार्ले (पू
मुंबई - ४०० ०५

# जगजेठी सखा

थातूनी उडी घेतली अर्जुनाने जेव्हा,
कळत पडते धनुष्य हातीचे भूमीवर तेव्हा
धावत आला तो जगजेठी पाही अर्जुनाला
सखा तो पाही अर्जुनाला .....
बोध करूनी उपदेश करतो झुंजार पार्थाला
सखा तो झुंजार पार्थाला.....
सा का रे पार्था बा तू कोमलूनी गेला
. सख्या रे कोमलूनी गेला
ग्रहणाच्या वेळी सख्या तू पावाडा केला
तार्थ वाहे अडदर तुझा ऐकूनी नावला
सा तू बा वीर वृत्तीचा का रे कोमलूनी गेला
अर्जुन म्हणे रे कृष्णा ही तर झूंज नसे मजला .....
माद वाटे सारा मजला झूंज नसे मजला......
पाहाळिले मी सगेसोयरे, आणिक गुरू बंधू
भीष्म, द्रोण आणि कृपाचार्य हे पूजनीय आम्हाला
सख्या रे पूजनीय आम्हाला ......
ण गुरूने विद्या शिकवूनी कुरूटा मज केला
णि त्यावर शस्त्र कसे धरू मी सांग मला कृष्णा
सख्या रे सांग मला कृष्णा ......
थ्वीचे जरी राज्य अनुकूल होईल आम्हाला
को नको ते राज्य कृष्णा भिक्षा रे बरवी
सख्या रे भिक्षा रे बरवी ......
पापाचा तो वसोटा आम्हां लागेल रे कृष्णा
आणि जोडीला हातीचा तू बा जाशील रे दूरी
रोशाने मी सांगे कृष्णा झुंजणार नाही
सख्या रे झुंजणार नाही ......
कृष्ण म्हणे रे पार्था झुंजवृत्ती ही तुझी तुला बा झुंजवेल पार्था
सख्या रे झुंजवेल पार्था ......
साच बा रे साई माझा
दिक्कालातही पाही श्रीकृष्णा सारखा

— श्रीमती अन्नपूर्णा कुळकर्णी.

# श्रीसाईबाबांच्या व्यक्तिमत्वाचा व चिंतनाचा उमटलेला ठसा

— श्री. आप्पासाहेब बळवंत पाटील
मु. पो. तासगाव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर

मी ज्यावेळी श्री बाबांच्या व्यक्तिमत्वाचे व त्यांनी आपल्या चरित्रातून दिलेल्या शिकवणुकीचे चिंतन करतो, त्यावेळी खालील निष्कर्षापर्यंत पोहचतो. अर्थात, माझे हे धाडस म्हणजे सूर्यदेवाला आरशात पकडण्यासारखे आहे किंवा सागराला ओंजळीत भरण्यासारखे आहे.

श्री साईबाबा हे पूर्णत्वाला पोहचलेले महापुरुष होते. महामानव होते. त्यांना लहानपण हे लाभलेच नाही. त्यांचे लहानपण हे अत्यंत संघर्षात व परिस्थितीशी झगडण्यात जाऊन त्यांतून त्यांची आध्यात्मिक उन्नती झाली. त्यांनी आपल्या जीवनात अनेक चढउतार पाहिले.

त्यांची वृत्तीही अंतर्मुख, शांत व सौम्य व एकांतप्रिय अशी होती. कर्मण्येवाधिकारस्ते मां फलेषु कदाचन या वृत्तीने ते वागत. गाजावाजा न करता आपले कार्य करीत रहावे ते भरीव असावे, ते पूर्ण करावे. कर्म करताना आळस किंवा वेळ काढूपणा अथवा कामाचे वेळी गप्पा गोष्टीत, हसण्या खिदळण्यात व्यर्थ वेळेचा अपव्यय करु नये. जे करायचे ते प्रामाणिकपणे आत्मविश्वासयुक्त व श्रद्धायुक्त असावे.

त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यालाच त्यांच्या कुसुमवत हृदयाची प्रचिती येते. श्रद्धा असणाऱ्यांनाच अंतरंगाचा ठाव घेता येतो. इतरेजन संशयाच्या भोवऱ्यात घोटाळत रहातात.

ज्यांना आपले म्हणायचे, त्यास हरप्रकारे सुखी करायचे. प्रसंगी त्याच्यासाठी बलिदानासही सिद्ध असावे, असे ते वागत. दुःखी असाध्य रोगी यांची सेवा मनोभावे करावी. सर्वांभुती परमेश्वर, ही वृत्ती असावी. जगातला कोणताही धर्म श्रेष्ठ नाही की कनिष्ठ नाही. सर्वजण एकाच ईश्वराची लेकरे आहेत.

वृत्तीमध्ये शांतपणा धीमेपणा असला पाहिजे. अंगिकृत कार्यात अनंत अडथळे आले तरी अत्यंत संयमाने चिकाटीने व सबुरीने काम तडीस न्यावे. विपन्न, असाह्य हलाखीच्या वेळीसुद्धा संयम विवेक व शांततावादी वृत्ती सोडू नये. आपली जबाबदारी काटेकोरपणेच निश्चयाने व चोखपणे पार पाडावी. प्रत्येक गोष्टीचे वैचारिक विश्लेषण शास्त्रीय दृष्टिकोनातून साधक बाधकपणे पाहून मगच ती गोष्ट करावी.

त्यांच्या चेहऱ्याकडे बघून, त्यांच्या सहवासात राहूनही अनेकांना बाबांचे अंतरंग पूर्णपणे कळले नव्हते. वारा जेव्हा मंद वाहतो, त्यावेळी हवाहवासा वाटतो. परंतु तो जेव्हा वादळाचे रुप धारण करतो, त्यावेळी भल्याभल्यांची दातखिळी बसल्याशिवाय

हात नाही, असा बाबांचा स्वभाव आहे. त्यांचे बोलणे हे अत्यंत मार्मिक अंत:करणाचा ठाव घेणारे, मर्मभेदक, अतिशय मुद्देसुद व संशयातीत असे.

एखाद्या विषयाचे प्रतिपादन अतिशय प्रभावीपणे करावे. साठवलेल्या बहुश्रुत व बहुविध ज्ञानभांडाराचा उपयोग समयसूचकपणे योग्य वेळी करावा. एखाद्याने अगदीच गळ घातली, तरच त्यास मौलिक, मार्मिक व पोक्त असा सल्ला द्यावा.

परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा असावी व सबुरीचे पालन करावे. म्हणजे सर्वांचे परम कल्याण करणारा जगदेश्वर सर्वांवर कृपा करतो!

# नाथ आमुचे साईबाबा

— कुमार संभाजीराव शिवाजी भोगण
— मामासाहेब लाड विद्यालय,
ढोलगरवाडी,
ता. चंदगड, जि. कोल्हापूर—४१६५०७.

साईबाबा या शब्दात प्रेमाचा कलंदर लौकिक भरलेला आहे. साईबाबा शिरडीत आले, तो दिवस सोनियाचा म्हणावा लागेल. बाबांच्या महानिर्वाणाला ६९ वर्षे झाली. तरी त्यांची भक्तावरील भक्ती कमी झाली नाही. साईबाबांचा भक्त जर संकटात असेल, तर त्याचे संकट साईबाबा नाहीसे करतात. इतकी ही साईबाबांची अगाध, अनंत कृपा. साईबाबांची लीला ही कोण्या माणसाला मोजता येणार नाही.

श्री साईबाबांना आपले स्वप्न साकार करण्यासाठी श्री साईबाबांवर श्रद्धा सबुरी ठेवली असता, त्यांचे नामस्मरण व जप केला असता, आपली स्वप्ने साकार झाल्याशिवाय राहत नाहीत, असा प्रत्यय येतो. साईबाबा हे सर्व जगाचे प्रशासकच म्हणायचे.

त्यांची एक अकल्पित लीला म्हणजे त्यांनी त्यांच्या गुरुकडून मागून घेतलेले दोन पैसे, ते म्हणजे श्रद्धा आणि सबुरी ही होय. ज्यांना नोकरी नाही, अशांना त्यांच्या भक्तीने नोकरी लागलेली आहे, फक्त श्रद्धा आणि सबुरी हवी! त्यांनी आपल्या वचनात म्हटले आहे की—

"जाणा येथें आहे साहाय्य सर्वांस
मागे जे ते त्यास तें तें लाभे."

# जगाच्या कल्याणा संतांची विभूती ।

– श्री. विनोद मनोहर पाटील
पो. केळशी, ता. दापोली

परमेश्वर प्राप्तीचा मार्ग अती कठीण, आणि त्याच्या प्राप्तीशिवाय तर जीवनाला अर्थ नाही. माणसाच्या कष्टप्रद जीवनात संत मार्गदर्शक ठरतात. संतांचा महिमा ग्रंथांच्या द्वारा वर्णिलेला आहे. पूर्वपुण्याईशिवाय संत संगती घडत नाही.

मनुष्य दिवसेंदिवस पशू बनत आहे. अधर्म, अनिती बोकाळत आहे. संस्कृती लयाला जात आहे. सारे जग विनाशाकडे वाटचाल करीत आहे. आता गुरुशिवाय तरणोपाय नाही. गुरुसारखे महान दैवत नाही, हे आपणास तेव्हा कळे जेव्हा गुरु भजाव्े. देवांनीही बृहस्पतींना आपले गुरु मानले. नवनाथांचे गुरुदत्त होते. गुरु महात्म्य 'देवाहून अधिक कोटिगुणे' आहे असे समर्थ रामदासांनी 'दासबोध' या ग्रंथात कथिले आहे.

साईमहिमा सुद्धा अगाध आहे. जो तनमनधनाने साईस भजतो, त्याचा चौऱ्यांशीचा फेरा टळतो. मला माझे आईपासून साईसेवेचा योग आला. साईशक्ती अचाट आहे. माझेवरील प्राणघातक प्रसंग साईशक्तीने तडीपार नेले, साईंची विभूती ही 'संजीवनी' आहे. गुरुशिवाय जीवन निरर्थक आहे.

साईगुरुंस माझे शतशः प्रणाम ।

# साई स्मृतिं

भक्ति साईबाबांची होई...।
श्रद्धेचे ध्यान होई...।
भक्तजनांचा मेळा
मशिदीत जमला सगळा...।
भक्ति रसांत न्हाला
समाधीत पावन झाला...।

फुलें वाहिली मूर्तींना
शाल अर्पिली साईना...।
पहाटे सनई वाजली
दर्शनाला मंडळी जमली...।
महा मंत्र चाले समाधीवरि
साई स्मृति घडे उरि...।

-श्याम द. नर्से
ठाणे-४

**ग्रंथपरिक्षण**

# श्रीक्षेत्र माणगाव महात्म्य

लेखक व संकलक - श्री. सुदाम दत्ताराम राणे, प्रकाशक - श्री. दत्तसेवा भक्तमंडळ, ाणगाव, मु. पो. माणगाव, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग-४१६ ५१९. ूल्य ३५ रु. पृष्ठे - २८४.

प. पू. श्री. वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंब्ये स्वामी महाराज यांची कोकणात ाणगाव येथे जन्मभूमी तर गुजरातेत बडोद्याजवळ गरूडेश्वर येथे त्यांची समाधी. ंब्येस्वामी हे थोर दत्तभक्त, इतकेच नव्हे तर एक दत्तावतारी सत्पुरूष म्हणून ोकीकास व अत्यादरास पात्र झाले होते. श्रीसाईबाबांचे ते गुरूबंधू. दक्षिणेत ाजमहेंद्रीहून त्यांनी साईंना एक नारळ आपल्या भक्ताबरोबर पाठविला. तो शिर्डीस ाईंनी अंतर्ज्ञानाने ओळखला, ही कथा सर्वश्रुत आहे. श्री माणगाव महात्म्य हा ग्रंथ ोन भागात असून एका भागात श्रीक्षेत्र माणगाव पूर्वपीठिका, श्री दत्तावतार कथा, ंब्येस्वामींचे संपूर्ण चरित्र, माणगाव येथे स्वतः स्वामीजींनी बांधलेल्या दत्तमंदिर रप्रदानाची कथा, तेथील पालखी सोहळा कार्यक्रम, काही प्रसिध्द दत्तस्थाने व त्तावतारी पुरूष यांची माहिती देण्यात आलेली आहे, तर दुसऱ्या भागात ंब्येस्वामींच्या भक्तांनी लिहिलेले काही अनुभव देण्यात आलेले आहेत. तसेच त्तभक्तीपर पदे, भजने, नित्यपाठ, गीते, आरत्या या पण दिलेल्या आहेत. ग्रंथात हाराजांची, तसेच दत्तक्षेत्राची विविध रंगीत छायाचित्रे देण्यात आलेली असल्याने, हा ंथ आणखीन वाचनीय व संग्राह्य असा झाला आहे. या ग्रंथाला श्री वासुदेवानंद सरस्वती भक्तपरिवार मंडळाचे ज्येष्ठ भक्त श्री. प. पू. मधुसूदन नारायण पित्रे गुरूजी यांची मननीय प्रस्तावना लाभली असून त्यामुळे ग्रंथाच्या आकर्षतेत आणखीन भर पडली आहे. श्री टेंब्ये स्वामींच्या प्रत्येक भक्तानेच नव्हे, तर प्रत्येक दत्तभक्ताने हा ग्रंथ अवश्य संग्रही ठेवावा व तो नित्य पठण करावा, अशी आमची शिफारस आहे.

— साईनंद.

# प्रणव

कवी - श्री. जगदीश देवपूरकर, प्रकाशिका - सौ. जयश्री देवपूरकर, कविता काशन, मिशन कंपौड, मोंगलाई, धुळे-४२४ ००१. मूल्य १५ रू, पृष्ठे ७६.)

धुळ्याचे प्रसिध्द कवी, कार्यकर्ते आणि श्रीसाईलीलाचे एक गुणी लेखक व कवी . जगदीश देवपूरकर यांचा हा काव्यसंग्रह आहे. या संग्रहात श्री. देवपूरकरांच्या ुरेख अशा ५५ कविता असून त्यापैकी बहुतेक कवितांना नितिन ढगे व दिनेश ोटोज यांनी साजेशी चित्रे रेखाटलेली आहेत. संग्रहातील सर्वच कविता एकदा ाचनीय आहेत, दोनदा वाचनीय आहेत, तीनदा वाचनीय आहेत पण शहेनशहा,

विवेकानंद, म. फुल्यांच्या घरातून, संत गाडगेबाबा, खुशी, यात्रा, रंगपंचमी या कविता तर भाषण चर्चाप्रसंगी किंवा अन्य कार्यक्रम प्रसंगी पाठ करून त्या उध्दरण करण्यासारख्या आहेत. श्री. देवपूरकरांची एरवी भाषा ओघवती व समृध्द अशी असून त्यांच्या कविताही तशाच धारावाहिक, गेय, वाचनीय व पुन्हा पुन्हा ऐकाव्याशा व स्वतःच गुणगुणाव्याशा वाटतात, इतक्या त्या बहारीच्या आहेत. यापूर्वीही त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत, पण हा संग्रह मात्र अगदी आगळा-वेगळा आहे. स्वामी प्रणवानंदांनी या संग्रहाला शुभेच्छा व्यक्त करताना, "जगात फुलांवर कविता करणारे खूप आहेत, तुम्ही जरा काट्यांकडे लक्ष द्या" अशी सार्थ मनिषा व्यक्त केली आहे. श्री. वा. रा. सोनार व प्रा. पुरूषोत्तम पाटील यांना हा संग्रह अर्पण करण्यात आला आहे. छपाई ऑफसेट पध्दतीवर झाल्याने आकर्षतेत भरच पडली आहे. आपल्या एका लाडक्या साईभक्त कवीचा हा काव्यसंग्रह श्री. देवपूरकरांना ओळखणाऱ्या प्रत्येक परिचिताने स्वतः विकत घेऊन तो आपल्या पुस्तक संग्रहातील एक मौलिक संग्रह म्हणून ठेवावा, अशी आमची पुन्हा पुन्हा शिफारस आहे.

— साईनंद

# सद्‌भाव

शिरडीची माती बोलली माझ्याशी
वृथा कशास्तव तू चिंता वहासी?
माझा अधिपती आहे भक्तांपाठी
घेता ना प्रचिती, याची क्षणोक्षणी!
तरी का हे तुझे, कातर अंतर
जप मनी एकमेव 'साई' चा मंतर!
त्याला आहे आस, खऱ्या भक्तिप्रेमाची
जडो चित्ता आवड निखळ साईनामाची!
शिरडीची रजधूळ, लागली पायांना
हेच पुण्य थोर, मज पामराला!
अहंभावाचा कर्पूर, जळू दे देहातून
सद्‌भावाचा सुगंध दरवळो मनातून!!

**— सौ. वासंती नांदेडकर**
महिंद्र ॲण्ड महिंद्र,
रोड नं. १३, वरळी, मुं. १८.

# तुमचे श्रीसाईविषयक सामान्य ज्ञान किती आहे?

(पुढीलपैकी आठ प्रश्नांची उत्तरे बरोबर देता आल्यास तुमचे सामान्य ज्ञान बरे, दहांची देता आल्यास चांगले व सर्वच्या सर्व बरोबर देता आल्यास उत्कृष्ट समजावे.)

१) हेमाडपंतांनी श्रीसाईसच्चरित शके ...... मध्ये लिहिण्यास आरंभ केला.
   अ) १८५१, ब) १९३०, क) १८३३, ड) १८४४

२) श्री साईबाबांना........ पाहून हेमाडपंतांना साईसच्चरित लिहिण्याची इच्छा झाली.
   अ) गहू दळताना, ब) पणत्या लावताना, क) कुस्ती खेळताना, ड) मशीद झाडतांना.

३) धुरंधर बंधूंना बाबांनी सांगितले की, तुमची आमची .... पिढ्यांपूर्वीची ओळख आहे.
   अ) ७२, ब) २५, क) ६०, ड) ४०

४) श्रीबाबांनी ..ना चल हट' अशी संभावना केली.
   अ) नूलकर, ब) सपटणेकर, क) गव्हाणकर, ड) रासने

५) श्री. काकासाहेब दिक्षित मरतेसमयी ...... होते.
   अ) आगगाडीत, ब) बोटीत, क) विमानात, ड) बैलगाडीत

६) .... पौर्णिमेला बाबांनी ब्रम्हांडी प्राण चढविला.
   अ) पौष, ब) मार्गशीर्ष, क) श्रावण, ड) चैत्र

७) बाबा ..... टेकून प्रहरचे प्रहर मशिदीत घालवित.
   अ) दगडाला, ब) कटड्याला, क) तक्याला, ड) बिछान्याला.

८) तुझ्या खाकेला मी झोळी पाहीन तेव्हा तुला मी भाग्यशाली मानीन, असे बाबा .... म्हणाले.
   अ) जोगांना, ब) म्हाळसापतींना, क) देवांना, ड) हेमाडपंतांना

९) "मी तुला विमान धाडीन" असे बाबा ..... म्हणाले होते व ते अक्षरशः खरेही झाले.
   अ) तेंडुलकरांना, ब) दिक्षितांना, क) हाटेना, ड) भाटेना

१०) शिरडीला रामनवमीचा उत्सव प्रथम शके ..... मध्ये सुरू झाला.
   अ) १८५२, ब) १८३०, क) १८३३, ड) १८०२

११) वणीच्या सप्तशृंगी देवतेने ..... यांना श्रीबाबांकडे जाण्याचा दृष्टांत दिला.
   अ) नूलकर,, ब) काकाजी वैद्य, क) रोहिला, ड) नानावल्ली

१२) माधवराव देशपांडे उर्फ 'शामा' यांना त्यांची आई ..... या लाडक्या नावाने हाक मारीत असे.
   अ) सोन्या, ब) बब्या, क) बन्या, ड) मन्या.

**— सदानंद चेंदवणकर**

**उत्तरे:**

१)-ब, २)-अ, ३)-क, ४)-ब, ५)-अ, ६)-ब, ७)-ब, ८)-अ,
९)-ब १०)-क, ११)-ब, १२)-ब.

## बालसाईभक्तांसाठी

# भगवान श्री साईबाबा

– कु. संतोष अनंत राणे
मु. पो. मुटाट, मोहूळवाडी
ता. देवगड,
जि. सिंधुदुर्ग - ४१६८०३.

जेव्हा प्रत्यक्ष बाबा शिरडीत होते तेव्हा बाबांनी स्वतःकडे कधीच मोठेपण घेतले नाही. स्वतःला कधीच देव म्हटले नाही. तसेच दुसऱ्यांकडून देव म्हणवूनही घेतले नाही.


जे भक्त साईबाबांना देव म्हणत, त्यांना बाबा सांगत की, मी देव नाही, मी एक साधा फकीर आहे, परमेश्वराचा मी गुलाम आहे. परमेश्वराच्या कृपेनेच हे सर्व घडते, त्याची तुम्ही भक्ती करा. तो सदैव तुमच्या पाठीशी उभा राहील.

बाबा स्वतः साक्षात ईश्वर असूनसुद्धा, त्यांनी 'मी' हे कधीच म्हटले नाही. सर्व अल्ला, श्रीहरीच करतो, असेच म्हटले आहे. आणि आम्हा सामान्य मानवांच्या हातून काही बरेवाईट कृत्ये घडली असता, ती 'मी' केली, असा आपण अहंकार दाखवतो, पण हा आपला अहंकार व्यर्थ आहे. तो परमेश्वरच हे सगळे करत असतो. आपण मात्र निमित्त आहोत.

आपण पूर्वजन्मीच्या महापुण्याईने ह्याजन्मी साईंच्या चरणी आलो आहोत. बाबांच्या चरणी यायला त्या परमेश्वराचीच कृपा लागते.

साईबाबांना स्वतःच्या भक्तांकडून फक्त तन आणि मन यांची आवश्यकता आहे, धनाची नाही जो त्रैलोक्याचा राजा त्याला आम्ही सामान्य मानव धन काय देणार? तन आणि मन हे जरी आपण साईबाबांना देऊ शकत असलो, तरी ते बाबांचेच आहेत, आपले नाही. आपण मात्र नावालाच मालक आहोत. याचा खरा मालक हा परमेश्वरच आहे.

जो त्रैलोक्याचा राजा, जो देवाधिदेव म्हणजेच साईबाबा यांना माझे कोटी कोटी प्रणाम !



# साक्षात्कार म्हणा अगर चमत्कार म्हणा

**– श्री. पां. शं. भुजबळ**
३७७, सोमवार पेठ, सातारा - २.

गेले दोन वर्ष झाले मी कोल्हापूर येथे श्री साईबाबांचा दरबार भरवीत आहे. तो दरबार कोल्हापूरला महिन्याचे शेवटच्या रविवारी दुपारी १२ वा. राजाराम पुरी,१३ वी गल्ली,सन्मित्र हाऊसिंग सोसायटीत १२ ते ३ पर्यंत असतो. दरबार संपले नंतर मी कोल्हापूरच्या अंबाबाईची ओटी भरून रात्री सातारला नेहमी येत असतो. असाच एका दरबाराचे वेळी सन १९८७ मध्ये मी व श्री. बळवंतराव घाटगे माझे एक भक्त आम्ही दोघेजण देवीचे देवळात ओटी भरण्यास गेलो. ओटी घातली व देवीचे गाभाऱ्यात गेलो. व पाकीटातून एक रोकडा रूपया काढला व पाकीट खिशात पुन्हा ठेवले. गाभाऱ्यात स्त्रियांचीच फार गर्दी होती. पुरूषांत मी व श्री. घाटगेच होतो. मी ओटीचे सामान पुजाऱ्यास दिले. त्यांनी ओटी भरली व ताट मला परत दिले. मी प्रदक्षिणा घातली व दुकानदारास पैसे देणेस गेलो,तर माझे पाकीट गायब झालेले मला दिसले. मी नाराज झालो. दुकानदारास पैसे दिले व पुन्हा देवळात गेलो आणि अंबाबाईस सांगितले. माझे पाकीट तू मारलेस. फार वाईट वाटले पण इलाज नाही. श्री. घाटगेंनी पुष्कळ स्त्रियांना विचारले,पण काही उपयोग झाला नाही. मी सातारला रात्री आलो आणि रोजच कोणास-ना कोणास वरील प्रसंग सारखा सांगतच होतो. असे सारखे सांगत असताना मात्र मी नेहमी म्हणायचो की, देवीने माझे पाकीट मारले. त्यावेळची तारीख २७ होती. व मी पुन्हा पुढचे महिन्याचे शेवटचे रविवारी सकाळी दि. २७ ला पत्नीसह कोल्हापूरला निघालो. गाडी कराड स्टँडवर आली. मी खाली उतरून बाथरूमला गेलो व जातानाच दारात मला काही नोटा सापडल्या. मी त्या घेऊन खिशात ठेवल्या व गाडीत येऊन बसलो. गाडी सुरू झाली, व नोटा पाहिल्या तर २७ रू. निघाले. मी पटकन पत्नीस म्हणालो,देवीने माझे पैसे परत दिले. ह्याला आपण साक्षात्कार म्हणा अगर चमत्कार म्हणा, पण मी म्हणतो की,माझी हांक देवीने ऐकली व तिलाही माझी भक्ती,श्रध्दा पसंत पडली व मी कसलाही विचार न करता सारखा सर्वांना सांगत होतो की, देवीने माझे पाकीट मारले. बाईचे रूपानेच देवीनेच माझे पाकीट मारले,हीच माझी अखंड श्रध्दा होती व त्या श्रध्देलाच देवीने साथ दिली व माझे पैसे मला परत दिले. सकाळी ९ ची वेळ बाथरूमला जाणारांची गर्दी आणि कोणास न दिसता मलाच तेवढे पैसे दिसले ह्याला काय म्हणतात,ते भक्तांनीच ठरवावे.

दुसरा प्रसंग असा की,दि. १३.५.८८ रोजी सकाळी ८.३० वा. माझी कन्या सौ. जयश्री रामदास नाळे ह्या मुलीने मला १०० रू.च्या ३ नोटा दिल्या. त्या मी जेवताना माझे लेंग्याचे खिशात घातल्या व जेवण पूर्ण केले व नेहमीचे नियमाप्रमाणे मी श्री साईबाबांचे दर्शनास देवघरात गेलो. त्यांना ऑफिसला जातो असे सांगितले. उर्द

खाल्ली व लावली व लेंगा काढून खुंटीवर अडकवला व पॅन्ट घालून ऑफिसला निघालो. मी नेहमी रोजच शनीचे देवळात जातो. दर्शन घेतो व मुलांना पेढे,गोळ्या वाटतो. मुंग्यांना साखर घालतो. चिमण्यांना तांदूळ टाकतो व गरीबास १० पैसे नित्यदान करतो व पिंपळास १ फेरी घालतो. हा माझा नेहमीचा दिनक्रम. हे सर्व ५ मिनिटात करावयाचे असते. कारण ९.१० ची बस गाठावयाची असते. शनीचे देवळाकडे वळताच मला शनी देवाने लेंग्यातील ३०० रू. नोटांची आठवण करून दिली मी घाबरून गेलो. आश्चर्यचकित झालो. देवळात गेलो. वरील विधी केले व तसाच परत घरी आलो. कारण लेंगा पत्नी अगर सुनबाई न तपासताच तसाच धुण्यास घेणार हे नक्कीच होते. व माझे ३०० रू. फाटून तुटून गेले असते पण ते माझे कष्टाचे पैसे श्रीसाईबाबांनी शनीचे देवळात शनीचे रूपाने येऊन मला आठवण करून दिली,म्हणून ते ३०० रू. मला परत मिळाले. जर आठवण झाली नसती तर मी त्या दिवशी ३०० रू. उघड्या डोळ्यांनी फुकट घालवून बसलो असतो व हा आघात,ही नुकसानी मला सहन झाली नसती. कारण दान करणे निराळे. खावू घालणे निराळे ह्यास माझे मन नेहमीच तत्पर असते व त्यातच मला आनंद वाटतो. पण हे काही न होता,जर पैसे माझे डोळ्यादेखत नष्ट झाले असते,तर माझ्या मनाची काय अवस्था झाली असती, हे श्रीसाईबाबाच जाणे, म्हणून त्यांनी ही सर्व माझ्या मनाची अवस्था ओळखून मला आठवण करून दिली, ह्यालाच मी साक्षात्कार म्हणतो. ह्याबाबत एवढेच म्हणावयाचे आहे की, श्रध्दावंतांना देव अंतर देत नाही, हेच खरे!

## श्री साईलीलाच्या सभासदांस निवेदन

'श्री साईलीला' मासिकाचे नवीन सभासद होऊ इच्छिणाऱ्या व वर्गणी संपलेल्या जुन्या सभासदांनी आपली वर्गणी श्री साईबाबा संस्थान शिरडी, मुंबई कार्यालय साईनिकेतन, ८०४ बी खोदादाद सर्कल जवळ, दादर, मुंबई—४०० ०१४ येथे प्रत्यक्ष/मनीऑर्डरद्वारे भरावी. चेक पाठवायचा झाल्यास, तो 'श्री साईबाबा संस्थान शिरडी' या नावावर असावा. मनिऑर्डर कोणत्या कारणासाठी करीत आहात, त्याचा उल्लेख मनिऑर्डरवर करणे आवश्यक आहे. मनिऑर्डरवर 'संदेश के लिए स्थान' आणि 'भेजनेवाले का नाम व पूरा पता' असे नमूद केलेले असते, त्या दोन्ही ठिकाणी सभासदांनी आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

* श्री साईलीलाच्या संदर्भात पत्र-व्यवहार करताना, श्री साईलीलाच्या जुन्या सभासदांनी त्यांचा सभासद क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

* श्री साईलीलाच्या सभासदांनी आपली वर्गणी संपण्यापूर्वी किमान एक महिना अगोदरच भरल्यास अधिक सोयीचे होईल.

## चकोर आजगांवकरकृत "श्री साईगीतायन" गीतकाव्याचा संगीतमय आविष्कार

# साई परब्रह्माचा शब्दब्रह्मांत अवतार!

श्री साईबाबांचे संपूर्ण चरित्र अद्‌भुत चमत्कार, अतर्क्यलीला व अमृतमय उपदेश यांनी रंगलेले आहे. "महाराष्ट्र जय"कार श्री. चकोर आजगावकरांनी आपल्या शब्दसाधनेने व योगसाधनेने भारलेले **"श्री साईगीतायन"** (के. भि. ढवळे प्रकाशन) हे सर्वविश्रुतच आहे. श्री. आजगांवकर हे केवळ एक शासकीय अधिकारी नसून एक सिध्दहस्त साईभक्त कवी व लेखक आहेत. नाथपंथीयोग व कुंडलिनीसाधना यांचा त्यांचा दोन तपांचा अभ्यास आहे. **"श्री साईगीतायन"** हे गीतकाव्य प्रथम नवशक्तिद्वारे १९७० मध्ये भक्तजनांसमोर प्रगट झाले. या गीतकाव्यातील आठ निवडक गीतांची सुमधुर कॅसेट नुकतीच प्रसिध्द झाली.

या गीतांचा पूज्य दत्ता बाळ यांनी **"उर्ध्वगामी प्रतिभेचा विलास"** या शब्दात उल्लेख केला आहे. तर प्राध्यापक बेलसरे व श्री. पु. रा. बेहेरे यांनी त्यातील काव्य संगीत व भक्तितत्वज्ञानाचा सत्कार केला आहे. प्रस्तावना लेखक व प्रभात सिनेटोनचे ख्यातनाम संतकवी श्री.शांताराम आठवले यांनी या गीतकाव्याचा गौरव करताना त्याला **'शारदेचा वरदहस्त लाभल्याने ते परातत्वस्पर्शी बनले असल्याचा"** अभिप्राय व्यक्त केला आहे. साईभक्त अण्णासाहेब गवाणकर यांनी तर श्रीसाईसच्चरितानंतर श्रीसाईगीतायनच" असे स्पष्ट गौरवोद्‌गार प्रकाशन प्रसंगी काढले होते. पू. अण्णासाहेब दाभोळकरांच्या चिरंजीवांनी कविसंमेलनात **"एक नितांत रमणीय भक्तिकाव्य"** असे या गीतकाव्याबद्दल उद्‌गार काढले होते.

अशा या साईबाबांच्या दिव्य जीवनाचे चित्र कुंडलिनीच्या स्पंदनानी रेखाटणाऱ्या काव्यातील निवडक गीतांना सुप्रसिध्द संगीतकार श्री. यशवंत देव यांनी सुमधुर चाली दिल्या असून सौ. अनुराधा पौडवाल व श्री. सुरेश वाडकर यांनी हे काव्य अत्यंत जिव्हाळ्याने व तन्मयतेने गायिले आहे. व्हीनस कंपनीने तयार केलेल्या या कॅसेटचे निर्माते डॉ. वसंतराव नाईक असून श्री. नरसिंह दिवेकर यांनी गीतांची निवड व संस्करण केले आहे.

श्री. चकोर आजगांवकर यांनी साईवाङ्‌मयात मोलाची भर घालून साईजीवन व तत्त्वज्ञान यांचा वाङ्‌मयाद्वारे महाराष्ट्रात अभिजात मूल्यांद्वारे प्रसार करण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या या कॅसेटचे आम्ही साईभक्तांतर्फे स्वागत करीत आहोत.

**"शिरडीस साई आले" ("श्री साईगीतायन"— कवी: चकोर आजगांवकर)**

# शिरडी वृत्त
## फेब्रुवारी १९८८

या महिन्यात शिरडीस श्री साईबाबांचे दर्शनसाठी साईभक्तांची नेहमीप्रमाणे गर्दी होती.

काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली, ती खालीलप्रमाणे--

**कीर्तन:** १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थानपुजारी-गवई-किर्तनकार-प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह.भ.प. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिरडी.

**प्रवचन:** १) ह.भ.प. विश्वनाथ महाराज सुराळेकर, सुराळाबेट.

**भजन, गायन, वादन इ.:**--१) सौ. लीला जोशी, अंबरनाथ २) श्री. प्रभुनाथ बाबा शिरडी ३) शिर्डी साई बाबा संकिर्तन समाज, निजामाबाद ४) सौ. आसावरी वायकुळ, घाटकोपर ५) श्री. विलास वायकुळ ६) कु. निनाद वायकुळ ७) कुमारी आर. ललिता, हैद्राबाद ८) कुमारी आर. लता ९) के. व्ही. गोपालकृष्ण विशाखापट्टणम १०) श्रीमती के. व्ही. सावित्रीदेवी ११) गुरूकृपा महिला भजन मंडळ, नागपूर १२) आदिनाथ नाम प्रसारक सांप्रदाय, जोगेश्वरी १३) डॉ. जे. व्ही. नारायणा १४) श्री. विनायक विठ्ठल घारपुरे, पंढरपूर १५) श्री. विठ्ठल घारपुरे १६) श्री अंबादास गोपाळ बेंद्रे, दादर १७) सौ. रेखा मडावि, भिंगार १८) श्री. प्रकाश बेर्डे, संगमनेर १९) श्री. भोलानाथ समेळ, गिरगांव.

**महाशिवरात्री:**-- सालाबादप्रमाणे मंगळवार दिनांक १६/२/८८ रोजी महाशिवरात्री निमित्त रात्रौ ९.१५ वा. श्रींच्या पालखीची गांवांतून मिरवणूक निघाली. मिरवणूक परत आल्यावर ११.०० वा. शेजारती झाली.



# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ९-०५ |
| २. | –,,– | इंग्रजी | १४-५० | ६-५० |
| ३. | –,,– | हिंदी | – | – |
| ४. | –,,– | गुजराथी | १९-०० | ६-५० |
| ५. | –,,– | कन्नड | १३-५० | ८-०० |
| ६. | –,,– | तेलगु | १८-०० | ८-०० |
| ७. | –,,– | तामीळ | – | – |
| ८. | –,,– | सिंधी | २२-०० | ७-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | १०-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | – | – |
| ११. | –,,– | हिंदी | – | – |
| १२. | –,,– | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | – | – |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | –,,– | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | –,,– | गुजराथी | ०-९० | ३-५० |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | –,,– | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | –,,– | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | –,,– | तेलगु | २-५० | ५-५० |
| २१. | –,,– | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | ४-८० | ५-५० |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | – | – |
| २५. | –,,– | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | –,,– | हिंदी | – | – |
| २७. | –,,– | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | –,,– | तेलगु | – | – |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | – | – |
| ३१. | –,,– | इंग्रजी | – | – |
| ३२. | –,,– | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |